म.ग्रं.सं. वाचनालय, शाखा ठाणे
विषय : नाटक
दा.क्र. : १८२९८

IRBK-0118298

नाटक
९८२९८
९४/३/८०
वाचनालय

# एक शून्य बाजीराव

तीन अंकी नाटक

चिं० त्र्यं० खानोलकर

IRBK-0118298

मौज प्रकाशन गृह, मुंबई चार

महाराष्ट्र राज्य पारितोषिक, ललित पारितोषिक
मौज प्रकाशन : १३४
पहिली आवृत्ती : २८ जुलै १९६६ पुनर्मुद्रण : २६ एप्रिल १९७७
© १९७७, श्रीमती शैलजा खानोलकर
किंमत : आठ रुपये मुखपृष्ठ : वसंत सरवटे

प्रयोगाच्या परवानगीसाठी पत्ता : श्रीमती शैलजा खानोलकर, स्मृती, ब्लॉक क्र० ६, केदारमल रोड, मालाड (पूर्व), मुंबई ४०० ०६४
मुद्रक : प्र० पु० भागवत, मौज प्रिंटिंग ब्यूरो, खटाववाडी, मुंबई ४०० ००४
प्रकाशक : श्री० पु० भागवत, मौज प्रकाशन गृह, खटाववाडी, मुंबई ४०० ००४

म. ग्रं. सं. ठाणे, [illegible] शाखा.
वा. क्र. ९८२९८ नों. दि. १४/३/८०
वि. नाटक

विजय तेंडुलकर
यांस

या नाटकाचा पहिला प्रयोग रंगायन, मुंबई, या संस्थेने विल्सन कॉलेजचे सभागृह, मुंबई, येथे २८ मे १९६६ रोजी केला. त्यात खालील नटनटींनी भूमिका केल्या.

□ दिग्दर्शक देशपांडे : जयवंत विचारे □ नाटककार : राजा बापट □ दंडवते : अरविंद कारखानीस □ प्रभा : जयश्री बांगर □ गौरी : विजया खोटे □ बाजीराव : माधव वाटवे □ आप्पाराव : अनंतराव वर्तक □ वसंत : शरद जयकर □ सख्या : जयवंत नाडकर्णी □ विठ्ठल : सुरेश भागवत □ सहस्रबुद्धे : शेष दाभोळकर □ आई : लीलावती भागवत □ कांतीबाई : निर्मला दाते □ प्रॉम्प्टर : अरविंद आर्यमाने □ बसाहेबांचे भूत आणि डॉक्टर : नाना शिंदे

दिग्दर्शन : विजया खोटे

# नि वे द न

हे माझे पहिले नाटक; म्हणजे हे तसे दुसरे. कुडाळ मुक्कामी असताना मी एक सबंध तीन अंकी नाटक लिहिले होते. त्याचा प्रयोगही तेथेच घडला होता. पण ते नाटक कुठेतरी गहाळ होऊन बसले आहे.

हे 'एक शून्य बाजीराव' रंगायनने सादर केले; म्हणजे या नाटकाची खूपच बूज राखली गेली! योग्य माणसांच्या हाती आपली 'कृती' जाणे हेही महत्त्वाचे.

विजया खोटे यांनी हे नाटक रंगभूमीवर उभे राहण्याच्या दृष्टीने काही मोलाच्या सूचना केल्या. मनःपूर्वकतेने हे नाटक रंगभूमीवर आणले. विशेषतः तिसऱ्या अंकाचे पुनर्लेखन मी त्यांच्या सूचना लक्षात घेऊन केले आहे. मला वाटते, त्यामुळे पुनर्लिखित तिसरा अंक अधिक प्रयोगक्षम झालेला आहे. पहिल्या व दुसऱ्या अंकांतील दाभाडे हे पात्र, दुसऱ्या अंकातील बाजीरावाच्या निर्गमनाची विशिष्ट जागा, आणि बाजीरावाची काही भाष्ये इत्यादी गोष्टी मला महत्त्वाच्या वाटल्या आणि म्हणूनच मी रंगावृत्तीच्याच वळणाने पण मूळ हस्तलिखितानुसार ही प्रत तयार केली आहे.

माधव वाटवे यांनीही केवळ स्वतःच्या भूमिकेचा नव्हे तर सबंध नाटकाचाच सखोल हिशेब मांडून प्रत्येक भूमिकेची उंची आणि खोली डोळ्यांसमोर आणून मगच बाजीरावाच्या भूमिकेला हात घातला. ते तासन्तास माझ्याशी या नाटकाबद्दल बोलत. नाट्याची त्यांची समज सूक्ष्म आहे. माझ्या कल्पनेतला बाजीराव माधव वाटव्यांनी रंगभूमीवर नाना कळांनी आणि प्रत्येक छटेनिशी साकार केला आहे.

रंगायनच्या सर्वच कलावंतांनी मोठ्या जिव्हाळ्याने या नाटकाला न्याय दिला आहे. या सर्वांचे आभार मानणेही कठीण आहे; कारण आभार मानूनही त्यांच्या नाट्यप्रेमाचे मोल जोखता येणार नाही.

—चिं० त्र्यं० खानोलकर

कै० चिं० त्र्यं० खानोलकर यांच्या पहिल्या श्राद्धदिनी त्यांची काही दुर्मिळ झालेली पुस्तके पुनर्मुद्रित करावी आणि त्यांच्या चाहत्या वाचकांना ती सवलतीने उपलब्ध करून द्यावी अशी योजना मौज प्रकाशन गृहाने आखली. त्यातील हे पुस्तक आहे. कै० खानोलकरांच्या कित्येक कविता, कथा, एकांकिका आणि अन्य प्रकारचे लेखन संग्रहित करण्याचे अद्यापि राहिलेलेच आहे. त्याचे संशोधन करून ते जमवण्याचे काम त्यांचे चिरंजीव त्र्यंबक खानोलकर आणि स्नेही जया दडकर हे निष्ठेने व चिकाटीने करीत आहेत. कै० खानोलकरांचा लिहिण्याचा वेग व निकड एवढी होती की त्यांच्या लेखनाच्या झपाट्याला एक प्रकाशनसंस्था पुरी पडणे कठीणच होते. मौज प्रकाशन गृहाने आपल्यापुरते असे ठरवले आहे की त्यांचे दुर्मिळ साहित्य तर पुनर्मुद्रित करायचेच पण अद्यापि असंग्रहित राहिलेले साहित्यही शक्य होईल तसे आणि तितके प्रकाशित करायचे. मुद्रण-प्रकाशनाच्या व्यवसायातील भरमसाट महागाई व अन्य अडचणी लक्षात घेता या महत्त्वाच्या वाङ्मयीन कामात वाचकांचे प्रसिद्धिपूर्व सहकार्य मिळवावे असे ठरवले. कै० खानोलकरांच्या वाङ्मयावरच नव्हे तर एकंदरच साहित्यावर सक्रिय लोभ करणाऱ्या वाचकांचा या योजनेला चांगला प्रतिसाद मिळेल असा भरवसा वाटतो. तसे झाले तर चांगल्या पुस्तकांच्या पुनर्मुद्रणाचा प्रश्न आज जो अशक्यप्राय बनल्यासारखा झाला आहे तो सुटण्याचाही एक मार्ग दिसेल.

उपर्युक्त योजनेतील सात पुस्तकांचे मुद्रण करायला अवधी मात्र फार थोडा, म्हणजे दीड-दोन महिन्यांचाच मिळाला. या घाईत त्याचा दर्जा व शुद्धता उणावू नये याचा शक्य तो प्रयत्न केला आहे. या बाबतीत मौज प्रिंटिंग ब्यूरोच्या सर्व कामगारांचे श्रेय मोठे आहे. मुद्रितशोधनात श्री० सुनील कर्णिक, श्री० जया दडकर व प्रा० सौ० यास्मिन शेख यांचे जे साह्य झाले त्याचा विशेष कृतज्ञभावाने उल्लेख करायला हवा. या सर्व पुस्तकांतील कै० खानोलकरांचे छायाचित्र जया दडकर यांनी काढलेले आहे. त्यांचे व चित्रकार वसंत सरवटे यांचे त्यांनी केलेल्या विविध प्रकारच्या साह्याबद्दल आभार मानतो.

—श्री० पु० भा०



# अंक पहिला

[न्यायमूर्ती शंकरराव खोत यांच्या सुप्रसिद्ध तिमजली वाड्याच्या दुसऱ्या मजल्यावरील दिवाणखाना. प्रशस्त. याच दिवाणखान्यात न्यायमूर्तींचे बसणे, उठणे, वाचणे, विचारचिंतन इत्यादी शारीरिक व मानसिक क्रिया घडायच्या. न्यायमूर्ती ज्या खुर्चीवर नेहमी बसायचे ती त्यांची खुर्ची प्रेक्षकांच्या उजव्या हाताशी एका लगतच्या उंच खिडकीकडे दिसते आहे. या खुर्चीची पाठ बरीच उंच आहे आणि पाठीला नक्षीदार जाळी असून या खुर्चीचे हात वाघ, सिंह इत्यादी श्वापदांच्या पंजांसारखे दिसावेत. सदरहू खुर्चीचे पॉलिश काळे चकचकीत आहे. खुर्चीसमोर एक काळे पॉलिश केलेले स्टूल आहे. स्टुलावर एक चिनी मातीची फुलदाणी आहे. प्रेक्षकांच्या डाव्या हाताशी स्टेजच्या पुढील भागात खिडकी दिसते आहे. ही खिडकी साधारणतः आरोपीच्या पिंजऱ्यासारखी दिसावी. खिडकीमागून येरझारे घालता येण्याजोगी दिवाणखाना आणि आतील भाग यांना विभागणारी अरुंद वाट दिसते. आतल्या भागाची काही दारेही दिसत आहेत. प्रेक्षकांच्या डाव्या बाजूच्या मागच्या कोपऱ्यातून खालून वर गेलेला जिना दिसत आहे. बाहेरून आत येण्याचे दार तिथेच असावे. आतल्या भागातून दिवाणखान्यात उघडणारे दारही डाव्या बाजूलाच आहे. दारावर निळे गडद

पडदे सोडलेले दिसत आहेत. प्रेक्षकांच्या समोरील मागच्या भागातून मधोमध एक उंच खिडकी दिसते आहे. त्या खिडकीतून नगरीतील वाडे वगैरे काही भाग दिसावा. दिवाणखान्यात मधोमध काही मोजक्याच, काळे पॉलिश असलेल्या ठाकठीक खुर्च्या, काही जाडजूड कोचेही आहेत. दिवाणखान्यात उंची गालिचा पसरलेला आहे. भिंतीवर आजे, पणजे वगैरे पुरुषांचे फोटो आहेत. प्रेक्षकांच्या उजव्या हाताशी तिरका असा नाटकाचा पडदा पडलेला आहे. हा पडदा उघडल्यावर पुढचीमागची रांग ठळकपणे दिसावी.

नाटकाला सुरुवात होते तेव्हा पुढील नाटकातील काही नट स्टेजवर फ्लशचा डाव मांडून बसले आहेत. आणि सख्या प्रेक्षकांच्या डाव्या हाताकडील खिडकीकडे झोप काढतो आहे. ग्रीनरूममधून एक पोरगेलासा नट येतो.]

**पोरगेला नट :** (घाबरलेला) ए, काय तुम्ही डाव मांडून बसलात! देशपांड्या कोकलतोय आत. चला, चला, उठा बघू.

**डावात रंगलेला एक नट :** ए, अरविंद्या, चहा आण, चहा.

**पोरगेला नट :** ए, आता चहाबिहा काही नाही हं! तुम्ही आधी उठा बघू. उठा, उठा. चला. देशपांड्या एकदम वैताग माणूस आहे, तुम्हांला काय ठाऊक नाही? उठा, उठा.

[सगळे नट नाइलाजाने उठतात आणि आत जातात. अरविंदा सख्यालाही उठविण्याचा प्रयत्न करतो. तो एकदा कुशीवर वळतो आणि पुन्हा झोपी जातो. अरविंदा डोक्यावर हात मारून आत जातो. स्टेजवर खुर्च्या अस्ताव्यस्त झालेल्या आहेत. दारावरील पडदे अव्यवस्थित दिसत आहेत. दिग्दर्शक मोहन देशपांडे रंगभूमीवर प्रवेश करतात. स्टेजवरील सावळागोंधळ पाहून भयंकर अस्वस्थ होतात.]

**देशपांडे :** सख्या, सख्या—

**सख्या :** (झोपेतच) काय लावलं आहे?

देशपांडे : मी मोहन देशपांडे.

[सख्या पटकन उठतो.]

काय सगळा अव्यवस्थितपणा? खुर्च्याबिर्च्या लाव बघू नीट. आणि ती दोरी का सुटली सेटवर?

[सख्या सगळे नीट करतो. मोहन देशपांडे लिस्टप्रमाणे प्रॉपर्टी चेक करण्यात गुंतलेले.]

सख्या : साहेब, ती मिशी या मिशीवर लावू ना?

देशपांडे : (आपल्यातच गर्क) लाव, लाव, जा.

सख्या : तसं नाय. पहिलांच काम हाय म्हनून विचारलं. बरां, जातो हां. आता मला बोलावू नका. मेकपला बसतो मी आता. (जातो.)

[दिग्दर्शक देशपांडे प्रॉपर्टी चेक करता करता खुर्चीकडे येऊन थांबतात. दचकतात. खुर्चीपाशी न्याहाळत उभे राहतात. अस्वस्थ होतात. वळतात. तोच नाटककार व एक गंभीर मुद्रेचे गृहस्थ प्रवेश करतात. नाटककार पोरगेला असून दुसरे गृहस्थ दंडवते हे मध्यम वयाचे. कोट-धोतर, टोपी असा सात्त्विक वेष. त्यांनी डोक्याला मधोमध गंध लावलेले दिसावे. पायात धुळीने भरलेल्या वहाणा आहेत. दंडवत्यांच्या प्रवेशामुळे दिग्दर्शक थोडेसे नाराज दिसतात. त्यांच्या नाखुष नजरेकडे पाहूनच दंडवते दारापाशी थबकतात. नाटककार घाईघाईने दिग्दर्शकांपाशी जातो. हा कुठेतरी आतून घाबरलेला असा सबंध अंकात दिसावा.]

नाटककार : (दिग्दर्शकांना) बाजीराव आलेला नाही ना?

देशपांडे : बाजीराव? तो कशाला आज येईल इथं?

नाटककार : सहज...सहजच चौकशी केली झालं! आणि गौरी आहे म्हणजे—

देशपांडे : (दंडवत्यांकडे पाहून त्याला दाबतो. दंडवत्यांना) काय?

नाटककार : ते माझ्याच बरोबर आलेत. या. आत या.

देशपांडे : (स्टेजच्या मध्यापर्यंत आलेल्या दंडवत्यांना) प्लीज. चपलं तेवढी बाहेर काढून ठेवा.

[दंडवते तसे करून आत येतात.]

नाटककार : (दंडवत्यांकडे बोट दाखवून) या, पुढं या ना.

[दंडवते पुढे येतात.]

(दिग्दर्शकांकडे बोट दाखवून) हे आमचे दिग्दर्शकसाहेब. आजच्या या माझ्या नाटकाचं दिग्दर्शन यांनीच केलं आहे. आणि हे आजचे एक श्रेष्ठ—

देशपांडे : (मध्येच थांबवून) आणि हे?

नाटककार : हे—हे—यांचं—यांचं नाव...(विचारात पडतो.)

दंडवते : मी...मी...(स्वतःबद्दल नक्की काय सांगावे यातच वाहवत जातात.) मी म्हणजे—एवढं महत्त्वाचं नाव नाही माझं. मी एक कार्यकर्ता आहे. म्हणजे मला पक्षबिक्ष काही नाहीत. मी पक्ष मानीत नाही. कार्य करण्यात मला आनंद वाटतो. म्हणजे आनंदच म्हणता येणार नाही...

दिग्दर्शक : आपलं नाव?

दंडवते : (कोचात बैठक मारतात. आसनमांडी घालतात.) म्हणजे मी माझं नावच सांगितलं नाही वाटतं? क्षमस्व! माझं नाव भगवंत पांडुरंग दंडवते. हे तुमचे नाटककारसाहेब भेटले—म्हणजे मीच त्यांचा परिचय करून घेतला. म्हणजे गावात एखादा अनोळखी माणूस भेटला म्हणजे मी त्याचा परिचय करून घेतोच. यांनी मला सांगितलं, मी एक आजचा श्रेष्ठ नाटककार असून—

नाटककार : (एकदम) अहोऽ अहोऽ मी असं म्हणालो नाही.

दंडवते : म्हणजे आपण विसरला असाल.

दिग्दर्शक : पाय खाली करा.

[दंडवते चटकन पाय खाली घेतात.]

आणि थोडक्यात सांगा. हा दिवाणखाना नाटकातला आहे, एवढं लक्षात

ठेवलंत तर बरं होईल. कृपा करून रागावू नका.

[एक सतराअठरा वर्षांची मुलगी हलकेच आत येते. कावरीबावरी दिसते आहे.]

**दंडवते :** कार्यकर्त्या माणसाला राग येऊन भागण्यासारखं नाही. ऑं! हे नसतील मोठे नाटककार—म्हणजे यांनाच तसं वाटत असेल तर—पण मी खोटं कधीच बोलत नाही. मग मी यांना म्हटलं, काय हो नाटककारसाहेब, नाटक म्हणजे ते अगदी लिहिलेलंच असलं पाहिजे काय? की दोन माणसांना...म्हणजे आम्ही घरात केव्हाकेव्हा बोलतो त्याचंच नाही का नाटक होणार? तर हे म्हणाले, नाटक ही फार मोठी गोष्ट आहे. त्यावर मी म्हणालो, मोठी असेल. पण ती म्हणजे तशी कठीण गोष्ट आहे का? हे म्हणजे—हे नाटककारसाहेब म्हणाले, कठीण म्हणजे? अहो, फारच. मग मात्र मला ऊर्मी आली. कठीण असेल तर ती गोष्ट आपल्याला करायलाच हवी. अशा अनेक गोष्टी केवळ कठीण म्हणूनच मी करून पाहिल्या. वीसवीस दिवस मी उपोषण केलं. महिनामहिना मौन पाळलं—

**नाटककार :** ते याही वेळी पाळाल तर बरं.

**दंडवते :** (तिकडे दुर्लक्ष करून) हो, हो! आज पुन्हा मनानं उसळी खाल्ली. मी यांना म्हटलं, तुमचं स्टेज आपल्याला दाखवा—म्हणजे चक्षुर्वै सत्यम्.

**दिग्दर्शक :** (दंडवत्यांत हळूहळू कॅरेक्टरचा भास व्हायला लागतो.) दंडवते, आपण पुढंमागं नाटकातही काम करू शकाल. आपल्यात ते गुण आहेत. आम्ही थोडे कामात आहोत. आमचं हे प्रॉडक्शन—आता तुम्ही—

**दंडवते :** नाही. तसं नव्हे. म्हणजे आपल्याला माझा अगदीच अडथळा होत असेल तर मी जाईनसुद्धा. पण हे तुमचं प्रॉडक्शन आपल्याला पाहायला मिळालं तर, म्हणजे ही भानगड तरी काय आहे ते कळेल. माझ्याजवळ कथानकं खूप आहेत. त्यांना म्हणजे तसा काही तोटा

नाही. अहो, मी म्हणजे प्रत्यक्ष समाजातच बुडालोय. म्हणजे अगदी सूरच मारलाय मी. (आजूबाजूला पाहत) खलपुरुष खूप आहेत या गावात. आणि सज्जनही आहेत. पण त्यांना उभं करायला एखादी जागा हवीच की नको?

[ती मुलगी भाषणात मग्न. तोंडावरील भीती क्षणभर बाजूला झालेली आहे.]

दिग्दर्शक : यू आर राइट! पण आपण ती चर्चा नंतर करू. तुम्ही त्या तिथं उभे राहाल का?

[मागील खिडकीकडे बोट दाखवतात. दंडवते तिकडे जातात. मग त्या मुलीकडे वळून]

प्रभा, काय ग, काही—

प्रभा : (पुन्हा कावरीबावरी) नाही, तसं काही नाही...

दिग्दर्शक : पण तुझा चेहरा—

प्रभा : तसं काही नाही...

नाटककार : ग्रीनरूममध्ये काही आउट होण्याचे प्रकार—

दिग्दर्शक : (तिकडे दुर्लक्ष करून) प्रभा, तुला अजून सवय व्हायची आहे या ॲटमॉस्फिअरची. एकदा हे अंगवळणी पडलं की मग—आणि मुख्य म्हणजे तू पहिल्यांदाच दौऱ्यावर आल्येस. नाही म्हटलं तरी तेही प्रेशर येतंच. आपले लोक खूप चांगले आहेत. पण तेही कलावंतच पडले. आणि आपली इथली ग्रीनरूमही थोडी लांबच तर काय! लागूनच असती—बैस ना. अजून नाटकाला तीनचार तास वेळ आहे. बैस तू. तुझा रोलही छोटासाच आहे.

[प्रभा खुर्चीच्या कोपऱ्यात बसते. दिग्दर्शक थोडेसे मोकळ्या अंगाने एका बैठकीवर बसतात.]

नाटककार : गौरी आली का?

दिग्दर्शक : रात्री संशयकल्लोळ होतं.

**प्रभा** : त्या केव्हाच्याच आल्यायत. फार थकल्यायत. पडून राहिल्यायत त्या.

**दंडवते** : (मागे काहीतरी न्याहाळीत असतात, ते गौरीचे नाव ऐकल्यावर घोटाळत पुढे येतात.) कोण म्हणालात? गौरी?...सौभाग्यवती—

**नाटककार** : नव्हे, सौभाग्यकांक्षिणी.

**दिग्दर्शक** : दंडवते, आपण बिलकूल संकोच करू नका. काय सांगायचंय तुम्हांला?

**दंडवते** : गौरी...(विचारातच आणखी पुढे येतात—आपल्यातच.) म्हणजे त्याच या असतील...(दिग्दर्शकाला) बसू का?

**दिग्दर्शक** : हो, हो, बसा, बसा.

**दंडवते** : (बसून) त्याच असाव्यात. म्हणजे त्याच असतील—तर म्हणजे त्याचं असं झालं—म्हणजे याच ठिकाणी—याच गावात—म्हणजे दहा वर्षांपलीकडे शारदा नाटक झालं. वा! वा! वा! शारदेची त्यांची भूमिका! म्हणजे या गौरीबाईंची. त्यांची भूमिका म्हणजे काय सांगू आता! अप्रतिम!

**दिग्दर्शक** : अप्रतिमच करतात त्या!

**दंडवते** : अहो म्हणजे केलीच. मी त्यानंतर खूप दिवस स्वतःला कोदंड समजत होतो. म्हणजे लपवायचं काय त्यात!

[प्रभा, दिग्दर्शक आणि नाटककार हसतात.]

**नाटककार** : कोदंडवते—

**दंडवते** : (ओशाळून) म्हणजे—चुकलेलं असेलही माझं—पण माझं सोडूनच द्या. (आजूबाजूचा कानोसा घेऊन) आप्पाराव इनामदार! ते म्हणजे—त्यांनी म्हणजे—त्यांनी त्यांना त्या वेळी—म्हणजे काय हो—एकदम लग्नाची मागणीच घातली.

**दिग्दर्शक** : इट्स न्यूज! म्हणजे हे माहीत नव्हतं आपल्याला.

**दंडवते** : असं आपलं माझ्या—म्हणजे माझ्या एकट्याच्याच नव्हे—प्रत्येकाच्याच कानावर आलं. आता ते म्हणजे—शंभरातून दोनचार टक्के

खोटंही असेल. पण म्हणजे ते खरं असेलही. आपली ही नाटकमंडळी येणार येणार म्हणून गावातून बोर्ड लागले, आणि या गौरीबाईंचं नाव आप्पारावांच्या (आजूबाजूला पुन्हा सावधपणे पाहून) कानावर—म्हणजे त्यांनी ते नाव वाचलंही असेल. रातोरात बोर्ड बेपत्ता! म्हणजे जाळूनच टाकले कुणीतरी. आप्पारावांचा कोप! म्हणजे कोपच तो! प्रत्यक्ष...

**दिग्दर्शक** : आप्पाराव—

**दंडवते** : हळूऽऽ. नाव मोठ्यानं उच्चारू नका. हे म्हणजे त्यांच्या एकदम कानी नको जायला. जमदग्नी पत्करला.

**दिग्दर्शक** : आमचं नाटक उभं राहू देईल ना?

**दंडवते** : हे म्हणजे—ते म्हणजे—हे असं होईलच असं काही नाही. पण म्हणजे—त्यांचं आपल्याला तसं काही सांगता यायचं नाही. पण हे आप्पाराव आहेत ना—त्यांना या नाटक इत्यादी गोष्टींत तसा रस नाही. पण तरीसुद्धा गौरीबाईंचं काम या नाटकात आहे—तर जरा म्हणजे सांभाळून.

[दिग्दर्शक चिंतेत उठतात. प्रभा अधिकच बावरते.]

**नाटककार** : (दिग्दर्शकाला) तू एकदम गंभीर? छोड दो! अरे, काय, नाटक होऊन जाईल.

**दिग्दर्शक** : मधुकर, ही गावातली वजनदार मंडळी. पडदा उघडण्याआधीच नाटकाचा मुडदा पाडायला हे लोक मागंपुढं पाहायचे नाहीत. दंडवते, तुम्हांला काय वाटतं? असं काही होईल?

[दोघेही एका कोपऱ्यात येतात.]

**दंडवते** : म्हणजे? छे हो, तसं काही नाही. म्हणजे, गावातले इतर लोक काही तितकेसे हे नाहीत. काही सज्जन माणसंही आहेत. तुम्ही मुळीच घाबरू नका. म्हणजे मी माझं वजन खर्च करून इथल्या काही लोकांना —म्हणजे—फौजदार वगैरे सरकारी लोकांना सांगून—

**दिग्दर्शक** : जरूर, जरूर. दंडवते, तुम्ही कार्यकर्ते आहात; तेव्हा—

दंडवते : हो, हो. जरूर सांगेन. पण ही फौजदार आदिकरून थोर थोर मंडळीही त्यांच्या फारशी वाटेला जात नाहीत. तेव्हा म्हणजे—

दिग्दर्शक : (पुन्हा डळमळतात.) अं! काय म्हणालात?

दंडवते : मी खुद्द (हलक्या आवाजात) आप्पारावांनाही सांगितलं असतं, पण आपल्यालाही नाही म्हटलं तरी त्यांचा थोडासा वचकच वाटतो. पण तुम्ही घाबरू नका. म्हणजे काहीतरी युक्ती सापडेलच. (किंचित विचार करून) हो, म्हणजे हे असं—असं—असं—म्हणजे हरकत नाही. (दिग्दर्शकाच्या पाठीवर हलकेच हात ठेवून) अहोऽऽ

दिग्दर्शक : (उत्सुकतेने) हं बोला—

दंडवते : (मोठ्या गंभीरपणे) त्यांना शरण जायचं.

दिग्दर्शक : (झटक्याने दूर होत) हट!

दंडवते : (दिग्दर्शकाच्या मागून जात) शरण म्हणजे शरण नको जायला. हवं तर त्यांना मी स्वतः सांगतो. त्यांची मनधरणी करतो. विनवणी करतो. म्हणजे—

दिग्दर्शक : (ठामपणे) नको. मुळीसुद्धा नको. आमच्यासाठी तुम्ही का शरण जायचं?

नाटककार : या सर्वांवर शंभर नंबरी उपाय म्हणजे आजचा प्रयोग रद्द करणे!

दिग्दर्शक : नो. नो. ही काही बाहुल्यांची भातुकली नव्हे. पोरखेळ नव्हे हा. हे नाटक आहे. त्याचा प्रयोग होणारच. ठोकळ्यांचं घरच फक्त फुंकर मारून वाट्टेल त्याला उधळता येईल. नाटकाची गोष्टच वेगळी आहे.

दंडवते : वा! वा! वा! हे म्हणजे एकदम इथून (छातीला हात लावून) पटलं आपल्याला. म्हणजे माणसानं अगदी थेट असंच असायला हवं. हे म्हणजे आपलं अगदी खूप—खूपच—नाटकावर—म्हणजे स्वतःच्या घरावर असतं तसं प्रेम आहे. आपल्याला हे आवडलं. हे...हे तुमचं घरच. वाऽऽवाऽऽवाऽऽ.

[पुटपुटत मागे जातो. प्रभा भीत भीत खाली बसते. आणि दंडवत्यां-

नाही दुसऱ्या एका खुर्चीत बसण्याची खूण करते. पण दंडवते त्या खुणेने अधिकच बावरून जातात.]

**दिग्दर्शक :** (नाटककाराला) मधुकर, तुला या रंगमंचावर काही अधिकउणं दिसतंय का? परीक्षा वगैरे पाहण्याचा विचार नाही माझा. पण नाटककार तूच आहेस म्हणून विचारतो, इतकंच.

[नाटककार इकडे तिकडे पाहतो. पण त्याला काहीच कळत नसल्याचे भाव त्याच्या चेहऱ्यावर येतात.]

**प्रभा :** (उत्सुकतेने पुढे येते.) मी. मी...(आवंढा गिळते.)

**दिग्दर्शक :** अग, नाटक तर त्यानंच लिहिलंय. त्यालाही सहजच कळेल ते. नाटक त्यानंच लिहिलंय—

**नाटककार :** काय म्हणालास? हो ना. नाटक मीच लिहिलंय. प्रभा, बाजूला हो बघू. बघतो काय राहून गेलं आहे ते.

[नाटककार स्टेजवर शोध घेऊ लागतो.]

**दंडवते :** (दिग्दर्शकाला) अहोऽ डायरेक्टरसाहेब, म्हणजे मी या गोष्टी विचारू नयेत, पण म्हणजे विचारल्याशिवाय आपल्याला चैनही पडणार नाही. हे आपण लावलेत ना—(फोटोकडे बोट दाखवून) म्हणजे या तसबिरा—त्या मला खूपच म्हणजे त्यातले ते लोक, ती माणसं मला खूपच आवडली. आवडली म्हणजे हे लोक कुणीतरी माझे आजेपणजे असल्यासारखेच वाटू लागलेत मला.

[प्रभा हास्याची बारीक लकेर देते. दंडवते ओशाळतात.]

**दिग्दर्शक :** प्लीज. आपण त्याबद्दल नंतर बोलू.

[दंडवते फोटो पाहत पाहत मागे जातात. प्रभा त्यांना कोचात बसण्याची खूण करते. पण दंडवते मागील खिडकीतून नगरीचे अवलोकन करीत असल्यासारखे खिडकीपाशी उभे राहतात.]

**दिग्दर्शक :** (नाटककाराला) काय मधुकर, पत्ता लागतोय का काही?

**दंडवते :** अहोऽऽ म्हणजे आता हे सांगणं भागच आहे.

[प्रभा लगबगीने खिडकीकडे जाते.]

म्हणजे हे सांगितलंच पाहिजे मला. त्या तिकडून ते दिसताहेत—म्हणजे या खिडकीतून ते तिकडचे वाडे दिसताहेत ना, म्हणजे त्यांतलाच एक वाडा...म्हणजे तसलाच अगदी थेट...

[प्रभा हलकेच हसते.]

म्हणजे तो पाठीमागचा पडदा आहे, हे कळतंय मला, पण तसलाच एक वाडा लहानपणी माझ्या स्वप्नात यायचा. म्हणजे त्या वाड्याच्या खिडकीवरील तो पडदाच पाहा ना—किंवा खिडक्यांची तावदानं! निळीनिळी, लालजांभळी. ठीक, ठीक. असलाच वाडा होता हो तो. म्हणजे हाच...हाच तो. त्यांतल्या एका खिडकीचं दार नेहमी उघडं असायचं बघा. ते बघा, त्या खिडकीचंही दार तसंच उघडं आहे. अगदी असंच.

[दंडवते हे बोलत असताना प्रभा त्यांच्या भोळेपणाला हसते.]

दिग्दर्शक : अच्छा. गंमतच आहे. बरं पुढं?

दंडवते : काही नाही. एवढंच. सहज आपली लहानपणची आठवण झाली.

दिग्दर्शक : त्या खिडकीतून एखादी राजकन्या वगैरे—

नाटककार : एक्झॅक्टली! खुर्चीभोवतालच्या वस्तू—काठी, जोडे, चष्मा, ॲशपॉट, पाइप, कोट वगैरेंना मी एक अर्थ देण्याचा प्रयत्न केला होता. त्या वस्तूच गायब झाल्यात. हे काय हे? आहे काय हे?

दिग्दर्शक : अरे, हो हो. आपल्याला ते ठेवता येतील. मला वाटतं, घोडगे विसरले.

प्रभा : मी...(लगबगीने पुढे येते.) मी...मी...

दिग्दर्शक : काय?

प्रभा : आपण...आपण त्या वस्तू मुंबईला विसरून आलोत.

दिग्दर्शक : (भयंकर अस्वस्थ होत) माय गॉड! म्हणजे आता काय होणार आपलं? तुला कोणी सांगितलं?

प्रभा : घोडगेच. (आजूबाजूला भीत भीत पाहते.) तेच...तेच कुणाला तरी म्हणत होते.

दिग्दर्शक : बापू, ए बापू!

नाटककार : बापू आत्ताच चहा नाही का आणायला गेला?

दिग्दर्शक : सख्या, सख्या!

[सख्या एका हातात एक कल्लेदार मिशी घेऊन प्रवेश करतो.]

सख्या : काय साहेब? मेकपवरून उठून आलो बघा. ही मिशी बायलीची बसतच नाही फिट्ट!

दिग्दर्शक : घोडगे काय करताहेत?

सख्या : घोडगेसायबांची तार—हंऽऽ (वर हात करून) बंभोला बजरंग! तार चढवलीय तार! ही प्रभा त्यांच्या नुसत्या डोळ्यांकडे पाहूनच इकडे पळाली.

दिग्दर्शक : (अस्वस्थ) तू जा. त्यांचं चालू दे.

[सख्या जातो.]

(त्राग्याने) इथं प्रत्येकानं अगदी सीरियस असायला हवं. सिन्सियर असायला हवं. इथल्या प्रत्येक वस्तूला अर्थ आहे. नाटकाचंही एक सत्य म्हणून असतं.

दंडवते : (लगबगीने पुढे येतात.) हे पाहा, म्हणजे आपलं पटलं तर पाहा. आपण सत्याबद्दल म्हणालात ना! तर ती सत्य ही गोष्ट फार मोठी गोष्ट आहे. म्हणजे महात्मा गांधींहूनही मोठी. म्हणजे तेही मोठेच. पण काही गोष्टी मोठ्यांनहूही मोठ्या असतात. म्हणजे उदाहरणच द्यायचं झालं तर या मोठ्यांहून ज्या गोष्टी मोठ्या असतात, त्या म्हणजे सूर्यप्रकाशाहूनही स्वच्छ असतात. म्हणून उदाहरण नको.

दिग्दर्शक : (वैतागून) दंडवते, कृपा करून—

दंडवते : म्हणजे हे महत्त्वाचं आहे. ते सत्याचं असो. हे ऐका. त्या गोष्टी म्हणताहात ना, त्या मी मिळवून दिल्या तर?

दिग्दर्शक : ते कसं शक्य आहे तुम्हांला?

दंडवते : म्हणजे कार्यकर्ता असलो तरी पत आहे आपली. तुम्ही यादी द्या. सामान नजर.

दिग्दर्शक : अच्छा. प्रभा, यांना ती लिस्ट दे.

दंडवते : (प्रभाकडे पाहून) या देणार?

दिग्दर्शक : हो. पण हे पाहा, तासाभरात वस्तू आणा. आणि काही बोलले असेन तर माफ करा हं!

दंडवते : छे हो! छे हो! राग नाही; राग नाही.

[प्रभा आणि दंडवते ग्रीनरूमच्या दिशेने निघून जातात.]

दिग्दर्शक : (थोडेसे मोकळे होऊन नाटककाराला) तर मी काय म्हणत होतो मित्रा! मघापासून पाहातोय—तू असा घाबराघुबरा का? आणि या तुझ्याच नाटकाबद्दल—

[नाटककार दचकतो.]

तुला काडीचाही जिव्हाळा दिसत नाही.

नाटककार : तुझे कुणीतरी कान फुंकलेले दिसतायत.

दिग्दर्शक : कानबीन कुणी काही फुंकलेले नाहीत. पण तुझा चेहराच बोलतोय—

नाटककार : चेहरा काहीच बोलत नाहीय. बोलतोय मीच. पण तुझी दृष्टी मात्र गढूळ झालीय.

दिग्दर्शक : मित्रा, हे तुझं पहिलं नाटक. आणि त्याचा हा पहिला प्रयोग. त्यातकरून हे नाटकसुद्धा फारच वेगळ्या लेव्हलवरून जातंय. मला मात्र खरं सांगायचं, तर आजच नव्हे—अगदी पहिल्यापासून—

नाटककार : (खूपच बावरतो.) ऑं!

दिग्दर्शक : हे नाटक एकंदरीत पाहता—मला तसं उगीचच वाटत असेल—

नाटककार : तुला त्या बाजीरावानं—

दिग्दर्शक : बाजीराव? मित्रा, त्याला यात विनाकारण इन्व्हॉल्व्ह करू नकोस. बाजीरावाबद्दल तुला इतका—

**नाटककार** : (अस्वस्थ होत) बाजीराव हा माणूस—

**दिग्दर्शक** : (ठामपणे) कृपा करून बाजीरावाला मधे आणू नकोस. तो या हेव्यादाव्यांपासून दूर आहे. पुन:पुन्हा हेच सांगेन मी. त्याला यात बिलकूल गोवायचं नाही.

**नाटककार** : बुजगावण्याचा बजरंग करण्याची सवयच झालीय आपल्याला. (कुठेतरी आत डळमळीचा सूर.) म्हणजे तो मोठा असेलही. पण चारचौघांवेगळं वागूनही माणूस मोठा होतो. ते फार सोपं आहे. त्यातून अनेक विचित्र अर्थ निघतात.

**दिग्दर्शक** : निघतही असतील. पण मधुकर, बाजीरावाबद्दल त्याच्यामागं वाईट बोलणं हेही विचित्र नव्हे का? कृपा करून डोंट ट्राय टु गिव्ह ॲन अगली शेप टु ए स्ट्रेट लाइन. विचित्र असेल, पण बाजीराव ही एक सरळ रेषा आहे. अनेक शून्य बिंदूंनी बनलेली!

**नाटककार** : (भयंकर अस्वस्थ) तू त्यांतला एक शून्य बिंदू! त्याच्या फारच कह्यात गेलायस तू.

**दिग्दर्शक** : असेनही. त्याच्या फार जवळ जाणंही अशक्य आहे. स्वत:लाच नामशेष—पण जाऊ दे. बाजीराव हा काही आपला या वटकेचा विषय नव्हे. नाटकाबद्दल बोल!

**नाटककार** : नाटकाबद्दल? नाटकाबद्दल काय बोलू? (गडबड उडते.) नाटकाबद्दल काय बोलायचं आता? ऑं? नाटक माझंच आहे. माझंच! पण मी आलोच हं. गौरीची काय अवस्था आहे ते पाहून येतो. (धांदलीने निघून जातो.)

**दिग्दर्शक** : (आपल्यातच) एक माणूस, एक नाटककार, एक नाटक, एक फार्स! शेवटी हे सगळंच कुणाचं तरी. नाटकसुद्धा! पोरकं, पोरकं नाटक! बाजीरावाचं? त्यानं कधी लिहिलं? एकदाही कधी बोलला नाही तो. असं कसं होईल? शेवटी मी धडपडलो एवढा तो एका बेवारशी नाटकासाठी?

[उदास होऊन एकटाच उभा. गौरी येते. पंचविशीच्या पुढची दिसते. अंग सुस्त. आळशी. चेहरा जागरणाने ओढलेला. तरीही त्यातली मादक

छटा पुरती लपलेली नाही. ती स्टेजवर जडपणे येते. अंगाला आळोखे-पिळोखे देत एका बैठकीवर झोपते. जांभई देते.]

**गौरी** : अयाईऽ ग! अयाईऽ ग! तिकडे ग्रीनरूममध्ये निवांतपणाच नाही. भयंकर थकवा आलाय. किती वर्षं ही जाग्रणं करावी लागणारायत, कोण जाणे बाई!

**दिग्दर्शक** : गौरी, काही मेकप वगैरे—

**गौरी** : मेकप? तो कशाला हवाय? नुसतीच उभे राहिले तरी लोकांना आवडते मी! मेकपचाही अडथळाच व्हायचा लोकांना. अशीच उभी राहिले की पुरे. तुमचे पैसे दामदुपटीनं वसूल. (अचानक हसते. उठून) काय की बाई एकेक!

**दिग्दर्शक** : काय झालं?

[गौरी पुन्हा हसते.]

झालंय काय तुला?

**गौरी** : निरोप आलाय मला. निरोप. (हसते.) वरचा नव्हे. इथलाच. या गावच्या इनामदाराचा निरोप. म्हटलं, तुमच्या कानांवर घालावं.

**दिग्दर्शक** : (अस्वस्थ) म्हणजे मी ऐकलं ते खरंच एकंदरीत!

**गौरी** : तुम्ही काय ऐकलंत आणखीन?

**दिग्दर्शक** : इनामदाराबद्दल. निरोप आणला कुणी?

**गौरी** : आला होता एक बारकासा माणूस. (हसायला लागते.) एकेकाचं एकेक. तो चिठी आपल्याच हातात ठेवून नुस्ता घुसमटल्यासारखा पाहायलाच लागला. म्हटलं पाहा! नाटकात तर काम करते. मग तो वरमला. एक मळकटशी चिठी देऊन पुन्हा पाहत पाहतच गेला.

**दिग्दर्शक** : चिठी वाचलीस?

**गौरी** : वाचली तर! फाडूनही टाकली! (वेगळ्याच पवित्र्यात) अहोऽऽ मी इनामदारीण होणार होते.

**दिग्दर्शक** : (काही माहीत नसल्याच्या सुरात) हो का? बोलली नाहीस कधी?

गौरी : दहा वर्षांपूर्वी या गावात आमचं शारदा झालं होतं. अर्थात शारदा होते मीच! नाटक संपलं आणि एक माणूस आजच्यासारखाच चिठ्ठी घेऊन आला. त्यात आप्पाराव नावाच्या एका माणसानं लग्नाची मागणी घातली होती मला. त्या वेळी मला हसू आलं आणि बरंही वाटलं. मी मग त्या चिठ्ठीचे चारपाच तुकडे केले आणि एकेक त्या निरोप्याच्या हातावर ठेवला. तो हडकुळा माणूस इतका भेदरला की ते तुकडे तिथंच टाकून पळतच सुटला. आम्ही सगळीच हसलो मग. नंतर रंग पुसता पुसता मी सगळा प्रकार विसरूनही गेले. इनामदारीण होणार होते. चांगलं झालं असतं का हो?

दिग्दर्शक : हू नोज? पण आज कसला निरोप आलाय?

गौरी : तुम्हांला सांगायला हरकत नाही. वाईट वाक्य होतं त्या चिठ्ठीत. आता दहा वर्षांनंतर तो काही मला लग्नाची मागणी घालणार नाही. 'एका रात्रीपुरती वाड्यावर ये. उद्धार होईल तुझा.'

दिग्दर्शक : सॉरी! (किंचित थांबून) आपल्या या नाटकाचं काय होणार?

गौरी : कदाचित ते होणारसुद्धा नाही. नेहमीच काय सगळ्या गोष्टी सुरळीत होतात?

दिग्दर्शक : सगळ्या गोष्टींचं सोडाच. पण नाटक मात्र झालंच पाहिजे.

गौरी : मग होईलसुद्धा. तो कोवळा—

दिग्दर्शक : कोवळा?

गौरी : नाटककार हो! त्याला कोवळा नाटककार म्हणायला बरं वाटतं मला. तो काय म्हणत होता माहीत आहे?

दिग्दर्शक : कशाबद्दल?

गौरी : हे निरोपाचं ऐकून. म्हणाला, "गौरी, छातीचा कोट करून मी तुझं रक्षण करीन. आप्पारावाशी चार हात करीन." (हसते.)

दिग्दर्शक : चाइल्डिश!

गौरी : त्याला वाटत असेल माझ्याबद्दल काही. कोवळा आहे तो. त्याचं

एक झालं तर दुसरा तो बाजीराव! शीः! (शहारते.) त्याची आठवण-सुद्धा नको ग बाई! रोग...आजार...

**दिग्दर्शक** : बरोबरच आहे. त्याचं प्रेम आहे तुझ्यावर!

**गौरी** : प्रेम? तुम्ही म्हणूनच हे बोलताय. बाजीरावाचं प्रेम! किळस. कंटाळा. पाप! या प्रेमाहून तुम्हांला जरी काहीही वाटलं तरी माझं पाप मोठं आहे. बाजीरावाचं प्रेम? नको, नको! मी कुठंही असले तरी येतो. माझ्या नाटकाला हजर असतो. माझं काम भिकार झाल्याचं सांगतो. म्हणतो, "गौरी, देवी वगैरे येऊन तुझा चेहरा कुरूप व्हायला हवा—तरच तुझं काम चांगलं होईल." इतका कोण हा? कशाला हे सांगायचं यानं? कसलं देणं लागत्ये मी याचं?

**दिग्दर्शक** : त्याला कदाचित तुझं देणं फेडायचं असेल! पण अशी तोंडावर सांगणारी माणसं फारच थोडी. असो. हा आप्पाराव नडणार वाटतं आपल्याला!

**गौरी** : बाजीराव आजही येईल. शेजारच्याच गावात आहे. रात्री मृच्छ-कटिक होतं ना! (आपल्याच तंद्रीत) येईल.

**दिग्दर्शक** : आला तर येईलसुद्धा! पण ते सोडून देऊ! त्या आप्पारावाचं काय ते सांग!

**गौरी** : मी वाड्यावर जाऊ म्हणता?

**दिग्दर्शक** : छे, छे! आय ॲम सॉरी! असं कसं सांगेन मी तुला? तुझा बळी देऊन नाटक करायचं नाहीय मला! आज काही वेगळंच बघू पाहतंय! अशा एकेक गोष्टी घडताहेत की हे तारू कुठल्या दिशेला वाहत जाणार आहे हेच कळेनासं झालंय. (विचारात हरवतो.)

**गौरी** : किती दिवस विचारीन म्हणतेय... (वेगळ्याच—थोड्याशा विक्षिप्त मूडमध्ये) फार फार मनात येतं. अलीकडेच हं! कुणाला तरी हक्कानं विचारावं वाटतं. कुणाला का? तुम्हालांच विचारलं तर?

**दिग्दर्शक** : (एकदम) मला? हं मला...तुझंही खरंच. विचार ना! विचार!

**गौरी** : तुमची सगळ्यांची मुलंबाळं आहेत. छानछान घरकुलं आहेत. घरकुलात तुमच्या मुलांची आई, तुमची राणी आहे. पण माझं काय आहे या जगात? काय राहणार आहे? माझं काय राहणार आहे याचं उत्तर तुम्ही काय देणार आहात ते सांगू? नका सांगू. तुमचं उत्तर आहे, निश्चितच...तुम्ही सांगणार आहात, "तुझं पाप राहणार आहे. आणि-त्या पापाची कीर्ती!" सांगा! ऐकायलाच हवंय मला. (खिन्न होते.)

**दिग्दर्शक** : प्रेशर आलंय तुझ्या मनावर! जाग्रणांनी हे असं होतं.

**गौरी** : (पुन्हा वेगळ्याच मूडमध्ये) मी लठ्ठ होणार आहे—नव्हे, होतेय. मी लठ्ठ होतेय सध्या. सांगा ना—मी अंगानं सुटल्येय ना? अहो, ऐका ना. मला वाटतंय की मी पापी आहे. खरं ना?

[दिग्दर्शक बोलत नाही.]

मी भाषणं का म्हणते आहे नाटकातली?

**दिग्दर्शक** : ओ, यस! बरी आठवण झाली. एखादी रिहर्सल घ्यायची का?

**गौरी** : काही नको! पाठ आहेत माझी भाषणं. मला कंटाळा आलाय या नाटकांचा!

**दिग्दर्शक** : गौरी! याच मूडमध्ये राहिलीस तर नाटकाचा बट्ट्याबोळ व्हायचा. आधीच सगळं डळमळीत होऊन गेलंय. त्यात तुझा हा जगावेगळा मूड. मग काय ?...तू पापी वगैरे नाहीस. पुन्हा एकदा सांगतो की हे सगळं जाग्रणामुळं होतंय. एखादं भाषण म्हण. बरं वाटेल त्यामुळं. हं. वसंत म्हणतो, "हे फुलं ठेवणं?" मग तू—"बरं वाटतं ना! वसंतदादा! दादा गेले. दोन दिवस झाले. अगदी जड जड होऊन गेलेय."

**गौरी** : (वैतागाने) पुरे करा.

[लांबून शंऽकर, शंऽकर हे शब्द ऐकायला येतात. दिग्दर्शक तिकडे कान लावतो. गौरी डोळे मिटून बसते. सुन्न झाल्यासारखी. एक वृद्ध

गृहस्थ दारावर येतात. इकडेतिकडे पाहतात. डोक्यावर साधारण जुनाच, मुळात रेशमी असलेला रुमाल आहे. कोट जुनाच. धोतर. हजामत आठवड्यात केलेली नसावी. पायांत चपलं असून ती धुळीनं भरलेली आहेत. वृद्ध गृहस्थ कुठूनतरी दुरून आल्यासारखे दिसताहेत. थकलेले. धापा टाकताहेत.]

दाभाडे : (दारावरून) शंकऽर, शंऽकर (धुळीने भरलेली चपलं घालून आत येतात.)

दिग्दर्शक : (दाराकडे धावतो.) अहो, हे काय? काय हे? ही सगळी धूळ आणलीत तुम्ही आत? बाप रे बाप! माय गॉड, हू इज धिस ईडिअट? नाटक सुरू व्हायला वेळ आहे अजून! नाटक बाहेर बसून बघायचं असतं!

[दाभाडे शंकऽऽर शंकऽऽर म्हणत चपलं बाहेर काढून शांतपणे आत येतात.]

दाभाडे : बसू का कोचेवर? (बसतातच.) शंकऽऽर! (मग डोळे मिटून श्वास घेतात. मळकटशा रुमालाने तोंड पुसतात. तोंडाने हवा बाहेर सोडून) शंकऽर, बरं वाटलं.

दिग्दर्शक : कोण आपण? का आलात इथं? कुणाला विचारून आलात? काम काय आहे आपलं इथं? काय म्हणतोय मी? (दाभाडे लक्ष देत नाहीत असे पाहून) हा म्हातारा बहिरा तर—

दाभाडे : (घसा साफ करीत) होऽ होऽ होऽ, थांबा, सांगतो, सगळं सांगतो. असे घायकुतीला येऊ नका. शीण आलाय. हाडन्‌हाड दुखतंय माझं. दोनतीन मैलांचं अंतर पायी तोडून आलोय. आंग ठणकतंय. शंकर, शंकऽऽर. वाऽऽ वाऽऽ!

दिग्दर्शक : आपलं नाव?

दाभाडे : दाभाडे. मी आप्पारावांचा मुनीम. एवढी माहिती बस्स आहे. वाऽऽ वाऽऽ! ही कोचं मात्र चांगलीच मऊ आहेत. आमच्या...आमच्या आप्पारावांकडे कोचं आहेत. पण वर नवखा माणूस बसेल की काय?

कुणी ती पैज लावावी आणि वर बसून दाखवावं. अहो, त्या कोचांकडे नुस्ती पापणी वर उचलून पाहण्याचा धीर होत नाही, मग बसायचं सोडाच! प्रत्येक कोचेवर एकेक ढाण्या वाघाचं कातडं पसरून दिलंय त्यानं—आग लागल्यासारखी दिसतात ती. माझ्या तीस वर्षांच्या चाकरीत आपण तर कधी चुकूनसुद्धा बसलो नाही त्यांत.

[गौरी लक्ष देऊन ऐकते आहे. दाभाडे आजूबाजूला पाहतात.]

कोचाची भीती वाटते असं नव्हे. भीती वाटते त्या काळाची. शंकऽर शंकऽऽर.

[खिशात हात घालतात. दचकतात.]

दिग्दर्शक : आपलं इथं काय काम ? इथं आलात कसे ?

दाभाडे : इथं ? आलो कसा ? वाट चुकून नाही आलो. पहिल्यांदा त्या तिकडे गेलो धर्मशाळेतल्या खोलीत. आप्पारावांचं नाव सांगितलं. सगळेच एकमेकांच्या तोंडाकडे पाहत राहिले. कुणी सांगेनाच काही. कुणी बोलण्याच्या अवस्थेत नसतीलच मुळी.

दिग्दर्शक : त्यांच्याबद्दल काही ऐकायचं नाहीय मला. मी विचारतोय, तुम्ही इथं का आलात, तेवढंच सांगा.

दाभाडे : सांगतो. आता म्हातारवयामुळं इकडचा शब्द तिकडे जातो एवढंच. तर खोलीच्या बाहेरच—थोडीशी कोपऱ्यातच—एक मुलगी कावरीबावरी होऊन उभी आहे. त्या बापडीनं इकडची वाटच सांगितली. शंकऽऽर, शंकऽर! गौरी म्हणून कुणी—

[गौरी डोळे मिटून घेते.]

दिग्दर्शक : तुमचं काय काम आहे तिच्याकडे ?

दाभाडे : माझं काहीच काम नाही तसं, काम आहे आप्पारावांचं. मी त्यांचा मुनीम !

[खिशातून एक घडी केलेली चिठी बाहेर काढतात. दुसरा खिसा चाचपतात. कागद साधारणतः सरकारी कागद पिंगट असतो तसा रुक्ष दिसावा.]

ही चिठ्ठी द्यायचीय त्यांना. मला थोडा उशीरच झाला. गेलो होतो दुसऱ्या एका आप्पारावांच्याच कामासाठी, ते करून आलो. तर ही चिठ्ठी—

**दिग्दर्शक** : मघा एक इसम आला होता म्हणे चिठी घेऊन. काय चाललंय हे? बरं, मी देतो. द्या माझ्याकडे!

**दाभाडे** : मघा कोण आला होता? हं, असेल आमचा गण्या. मी दुसरी चिठी आणलीय. आणखीनही येतील...शंकऽऽर. मला उत्तर हवंय, आणि शक्यतर प्रत्यक्ष त्यांच्याकडेच द्यायचीय मला.

**दिग्दर्शक** : गौरी! या—गौरी. द्या यांच्याकडे. (आणि गौरीकडे पाहून) मी ग्रीनरूमकडे जाऊन येतो. नाटकाचं महत्त्व लक्षात ठेवून काय ते उत्तर दे. नाटक जवळ जवळ तुझ्यावर आहे, समजलं? मी आलोच. (जातो.)

**गौरी** : (दुर्लक्ष करीत, जांभई देत) कोण आपण?

**दाभाडे** : मी...मी दाभाडे. ही आप्पारावांची चिठ्ठी! (देतो.)

**गौरी** : (चिठी न उघडता निष्काळजीपणे) होऽ समजलं. मघाही एक चिठ्ठी आली होती.

**दाभाडे** : ही दुसरी. याचं उत्तर दे!

[गौरी चिठी फाडायला पाहते.]

**दाभाडे** : मुली! हे बरं नव्हे. आप्पाराव हा असामी सामान्य नव्हे. प्रत्यक्ष वाघाशी खेळणारा माणूस तो. (हलक्या आवाजात) त्याच्याशी वैर म्हणजे मुली...त्याच्या वाड्यात आजवर कुणाकुणाचे मुडदे पडलेत हे प्रत्यक्ष ईश्वरालाही माहीत नसेल. आजसुद्धा कुणाचा तरी जीव जाणार बहुधा.

**गौरी** : कुणाचा?

**दाभाडे** : या गावातलाच कुणीतरी असावा. म्हणजे हे मी तुला सांगणं बरं नव्हे, पण तुझ्याकडे पाहूनच एकदम विश्वास वाटला. तर चिठ्ठी वाच आणि उत्तर दे. तोवर मी शतपावली टाकतो. विचार करून काय ते सांग!

[उठून इकडेतिकडे फिरतात. दिवाणखाना मोठ्या कौतुकाने न्याहाळतात. भिंतींवर हलकेच हात फिरवतात. एका कोपऱ्यात उभे राहतात. चोर-खिशातून एक डबी काढून हातात घेतात. न्याहाळतात; घाबरट होतात. मग डबी चटकन खिशात घालून ठेवतात.]

गौरी : (चिठी वाचून चमत्कारिक मनःस्थितीत उभी आहे.) एका रात्रीसाठी वाड्यावर ये!

दाभाडे : (जवळ येऊन) काय लिहिलंय त्यांनी?

गौरी : एका रात्रीपुरती वाड्यावर बोलावलंय. मी त्यांना रखेली वगैरे वाटल्ये की काय? हलकट! (संतापाने) आणि काय ढोंग करताय ही? तुम्हांला जसं काही माहीतच नाही.

दाभाडे : (दचकून) नाही, नाही. शंकराशपथ नाही. मुली, आप्पारावाच्या चिठीतला मजकूर त्याच्या नकळतसुद्धा वाचण्याचा धीर आम्हांला नाही. खोटं वाटलं तर खुशाल वाटो. पण तू संतापतेस काय? आप्पाराव—

गौरी : संतापतेस काय? तुमच्या मुलीला असं कुणी लिहिलं असतं तर? (चिठीचे तुकडेतुकडे करते.)

दाभाडे : खरं आहे, खरं आहे मुली, तुझं खरं आहे! पण आप्पारावांशी संबंध आहे मुली—थोडं जपून. या गावचा इनामदार आहे...

गौरी : इनामदार! असू दे! मीही इथली इनामदारीण आहे. त्यांना सांगा जाऊन—मी येत नाही, येणार नाही, कदापीही येणार नाही.

[जायला लागते.]

दाभाडे : (सुन्न) मुली, थांब! थोडी थांब! तुझं बरोबरच आहे, काहीसुद्धा चुकलेलं नाही. पण मला तुझी दया येते मुली. मी एकच गोष्ट सांगतो, सांगू नये मी, पण सांगतो. कदाचित पटेल तुला. (आजूबाजूला पाहून एक डबी काढतो.) हे बघ—हे काय आहे? शंकर, शंकऽर.

गौरी : (उत्सुकतेने पाहते.) असेल काहीतरी!

दाभाडे : (जवळ जाऊन तिच्या कानात) विष!

गौरी : (मागे सरकते.) हे कुणासाठी—विष?

दाभाडे : (तिच्या तोंडावर हात ठेवून) हळू!

[आजूबाजूला पाहतो. दारापाशी जातो. बाहेर डोकावून पाहतो. पडदा बाजूला करून दरवाजे शोधतो.]

गौरी! (जवळ येऊन) या दारांना दरवाजेच नाहीत. नुसत्याच चौकटी!

गौरी : नाटकातले दरवाजे आहेत, पण ग्रीनरूम लांब आहे. तिकडे धर्मशाळेत...

दाभाडे : ऐक! आजवर या आप्पारावानं कित्येकांना वर पाठवलंय आजसुद्धा कुणालातरी पाठवणार वाटतं. मला मात्र माहीत नाही. ह्या इसमाचं नाव. त्याचा मुडदा कुणाला दिसायचा नाही. हे मला ते कधीच आणायला सांगत नाहीत. पण आज त्यांच्या मनात काय आहे, कोण जाणे!

गौरी : माझ्यासाठीच तर नसेल ना हे?

दाभाडे : छे, छे! मुळीच नाही. बाईला ते कधीच—त्यांच्या शत्रुपक्षापैकी कुणीतरी—कोण बापडा असेल, कोण जाणे! असेल या गावातलाच! त्यांच्या त्या वाड्यात काय काय घडतं हे कुणालाच कधी कळायचं नाही! दगड आहे दगड! (आजूबाजूला पाहून कानोसा घेतात.) चिठ्ठीतला तू सांगितलेला मजकूर...बापरे! मला हे मुळीही पटणारं नव्हे, शंकरा-शपथ! हा भ्रष्टाकार आहे. आपल्याला त्या देवानं काळीज दिलंय, पण करतो काय? पोट, प्राण! खरंच दुःख होतंय मुली! हे भलतंच काही आहे, मुली! खरोखरच माझ्या लेकीवर ही पाळी आली असती म्हणजे? शंकर, शंऽऽकर!

गौरी : (थिजल्यासारखी उभी आहे.) आजोबा!

दाभाडे : हां, हां, मुली! काय सांग?

गौरी : मी तरी कुठं चारित्र्यवान—मी तरी...मी...

दाभाडे : ऑं? काय ते?

**गौरी** : काही नाही. मी एक गोष्ट मागणार आहे, मागू? (कसल्या तरी विचारात.)

**दाभाडे** : माग ना. खुशाल. पण माझ्याकडे काय मागणार तू?

**गौरी** : विष! ती डबी! द्याल मला?

**दाभाडे** : नाही. म्हणजे माझ्यावर हेच खायची पाळी येईल. तो जीव घेईल माझा!

**गौरी** : हरवलं म्हणून सांगा!

**दाभाडे** : कुणाला? त्याला? तू अजाण आहेस अजून! आणि तुला कशाला हे?

**गौरी** : (मग्न होत) आजोबा! कुणीतरी मरणार आहे नव्हे? त्याचे प्राण वाचवू आपण! खरंच, आपल्याला फार मोठं पुण्य मिळेल! फार मोठं!

**दाभाडे** : खुळी आहेस. आप्पाराव पुन्हा पैदा करील. सूर्य इकडचा तिकडे उगवेल, पण याचा निश्चय म्हणजे निश्चय.

**गौरी** : आजोबा! आयुष्यातला एक क्षणसुद्धा फार मोलाचा असतो. खरंच द्या ती डबी इकडे! त्या कुणाचे तरी आपल्याला प्राण वाचवता येतील! पुण्य मिळेल आपल्याला.

**दाभाडे** : पुण्याचा वाटा तुला मिळेल आणि माझा गरिबाचा प्राण जाईल.

**गौरी** : अखेर तुम्हांलाही दयामाया नाही. तुम्हीही तुमच्या धन्यासारखेच.

**दाभाडे** : मुली! भलताच आग्रह धरू नको! मी तुला इतका वेळ भोळी समजत होतो.

**गौरी** : मी भोळीच आहे. पण एका अनामिकाचा प्राण वाचवायचाय मला. त्या बापड्याला कळणारसुद्धा नाही. (आपल्याच तंद्रीत) कोण असेल तो? खरंच, आजवरची सगळी पापं धुऊन निघतील!

**दाभाडे** : तूही पापीच का अखेर! शंकऽर, शंकऽऽर! मग आप्पारावांकडे जायला तुला काहीच हरकत नाही. म्हणजे इथलं काहीही खरंच नाही. मयसभाच ही. मुली, शंकराशपथ दुःख होतं.

गौरी : ते कशाबद्दल?

दाभाडे : पापी असल्याबद्दल! तू...मुली...इतका वेळ बोलणारी...छे, छे...दुःख होतं...शंकऽऽर! (जाऊ लागतात. मागे वळून) तू आपोआप स्वतःच्याच पावलांनी जाशील त्याच्याकडे! पापी माणसांचं माहीत आहे मला!

गौरी : (लगबगीने जाऊन त्यांना झडप घातल्यासारखी पकडते. त्यांना घेऊन मागे येते.) ती डबी द्या इकडे. द्या ना! (चेहरा बदलतो.) नाहीतर सगळ्या जगाला ओरडून सांगेन! आजोबा—

दाभाडे : (केविलवाणे होऊन पाहत राहतात.) शंकऽर...

गौरी : आजोबा, ओरडू का?

[दाभाडे गुपचूप डबी काढून देतात.]

गौरी : (डबी केवळ्यातरी उत्सुकतेने घेऊन) आजोबा, मुळीसुद्धा घाबरू नका! तुमच्या आप्पारावांना सांगा, येईन म्हणावं लहर लागली तर.

दाभाडे : (आजूबाजूला पाहतो.) मी गरीब आहे, माफ कर! तुझ्या पुण्याआड मी येत नाही. माझाही प्राण तुझ्याच हातांत आहे. तुला डब्बल पुण्य मिळेल! (खचल्यासारखे निघून जातात.) शंकर, शंकऽर!

[खूप वेळ ते शब्द ऐकू येतात. गौरी एकटीच बसली आहे. विषाची कुपी न्याहाळते. मूड बदलत जातो.]

गौरी : हे आणखीन किती वर्षं चालणार आहे कोण जाणे! ही नाटकं, ही नाटकांतली भाषणं. सगळं शरीर अगदी कडूचार होऊन गेलंय. रक्ताचा थेंबन् थेंब उकळतोय नुस्ता. पापाचा किळसवाणा वास मारतोय त्याला. पाप!...एवढं मोठं थोरामोठ्यांचं घर सोडून या रंगाच्या ओढीनं या नाटकाच्या मृगजळात उतरले मी. इथल्या या रंगीबेरंगी लाटा-लहरींत शरीरावरची वस्त्रं भिजून चिंब झाली. पहिल्यापहिल्यानं वाटलं, शरीराचं एक मधुर स्वप्न झालंय. शरीर म्हणजे...शरीर म्हणजे एक रंगांच्या पर्जन्यधारांत भिजून बहरलेला मोराचा पिसाराच जसा काही.

ही कल्पनासुद्धा किती...पण—पण ही माझी नव्हे. ही कल्पनाही त्या बाजीरावाचीच. बाजीराव, हे तुझे शब्द अगदी जसेचे तसे राहिलेत. पण...(वेगळ्याच विचित्र मनःस्थितीत उभी. डोळ्यांसमोर कुणीतरी शिर तुटलेला माणूस उभा आहे अशा नजरेने पाहतेय.) तू? तूच तो. तुझी ती महाभयंकर मिठी. एखाद्या जंगली श्वापदासारखी—किळसवाणी तऱ्हा. हजारो नखंच फक्त सर्पाच्या फण्यासारखी माझ्यातलं स्वत्व शोषत होती. बाई ग! शी! (त्या मनःस्थितीतून सुटण्याचा प्रयत्न) रोग—त्या दिवसापासून मी टाळतेय त्याला. भिऊन पळतेय... पळत्येय सारखी. अंगावर नाना तऱ्हेचे रंग फासून नाटक करत्येय पण या रंगांच्या वरकुलात लपायला जागा कुठं आहे? हे रंगसुद्धा किती फसवे!...लोकांना काय हवंय कोण जाणे! नुस्ती रंगानं दाटून निघालेली एक बाहुली, हवी तशी नाचणारी, भाषणं पाठ म्हणणारी, सुरेख अभिनय करणारी बाहुली. या बाहुलीचं अंग सुटून चालणार नाही. नको. पुरे झालं हे सगळं. या सगळ्याचा ताण असह्य होतोय. अरे, माझ्याकडे मी एक स्त्री आहे म्हणून कुणीतरी पाहा ना! मीही आई झाले असते. माझंही एक घर असणार होतं. त्यातला राजा शूर, रुबाबदार. (मग्न होऊन पाहत राहते.) सगळ्या जगावर, माझ्यावर सत्ता गाजवणारा राजा! त्याची नजर एखाद्या नंग्या तरवारीच्या पात्यासारखी लखाखती. त्याचा आवाज दऱ्याखोऱ्यांतून प्रचंड पडसाद उठवीत जाणारा. तो श्यामवर्णी घोडीवर बसून येतोय, मला एखाद्या हलक्या पिसासारखी पटकन उचलून निघून जातोय. मी माझी राहतच नाहीय. फक्त त्याची...(खिन्नपणे हसते.) हूंः! एक स्वप्न! बहरातलं एक दिवास्वप्न! अजूनही ते चित्र दिसत असतं. दैवानं उगीच टांगून ठेवलंय ते या रंगहीन आयुष्याच्या वरकुलात. त्या वेळी तासन् तास बघत बसायची मी ते चित्र. पण तो बहर कोमेजत चाललाय आता. या देहावर सावली पडलीय ती एका कळाहीन जनावराची.

काळोखाचे तीक्ष्ण पंजे उठलेत या देहावर. कोण रक्षण करणार आहे माझं? या शरीराचा बहर एक दिवस घळून पडेल आणि मग मी— मला या लाकडी रंगभूमीवरसुद्धा उभं राहता येणार नाही. बेढब शरीरावर रंगांनाही आपली जादुगिरी करता येणार नाही. आजवर अंगावरचे रंग भुंग्यासारखे डसत असताना, लोकांनी दिलेल्या टाळ्यांवर तरंगत राहिले. मनातला पश्चात्ताप मनात ठेवला—या रंगांवरसुद्धा मला प्रेम करता आलं नाही...पण यापुढं कोण रक्षण करणार आहे माझं? (हातातील डबीकडे लक्ष जाते.) हे विष. कुंकू टिकावं म्हणून आम्ही बायका त्यामागं मेण लावतो तसंच हेसुद्धा. हे नाटक टिकविण्यासाठी आजपासून हे बाळगणार आहे. बाजीरावाहून मोलाचं. माझं रक्षण करायला कुणीसुद्धा येणार नाही. मला माहीत आहे...एका बाजीरावाशिवाय—(भेदरते.) नाही, नाही, तशीच पाळी आली तर कुठल्याही क्षणी मी हे घेऊन आयुष्य संपवून टाकणार आहे. (थकून बसते. डबी मुठीत गच्च ठेवते.) आता पुन्हा रंगलं पाहिजे. ते थंडगार, शिळे-पारोसे रंग चोपडून चेहरा वेडावाकडा केला पाहिजे...

[नाटककार येतो.]

**नाटककार** : गौरी!

**गौरी** : (दचकून) अं? कोण? तू?

**नाटककार** : तूही विचारात?

**गौरी** : विचारात होते! कसल्यातरी.

**नाटककार** : कसल्या?

**गौरी** : कसल्या कोण जाणे! (अजूनही तंद्रीत.)

**नाटककार** : कुठं पाहत आहेस?

**गौरी** : कुठंतरी.

**नाटककार** : कुठं?

**गौरी** : कुठं कोण जाणे! मी जाते. रंगायला हवंय!

**नाटककार** : बाजीराव आलाय ! गोळी चढवूनच आलाय.

**गौरी** : (तंद्री उतरते.) शीः ! सुखानं जगू देणार नाही तो मला.

**नाटककार** : मैत्रेयाच्याच मेकपमध्ये आला. तसल्याच सोंगावर त्यानं आपला नेहमीचा तो ओंगळ सूट चढवलाय. त्याला इथून हाकलायला हवं. वुइ मस्ट कीप हिम अवे ! कुत्रा ! सडलेला कुत्रा ! आला तिकडनं धापा टाकीत. कुणीतरी मिठाईचा पुडा ठेवला त्याच्यासमोर. बाजीराव तुटून पडला त्यावर. मचामचा खायला लागला.

**गौरी** : (खिन्नपणे) भूक लागली असेल त्याला !

**नाटककार** : भूक ? भुकेचं इतकं ओंगळ प्रदर्शन करायला हवं का ? बाजीराव मिठाई खातो हे दृश्यच इतकं भयंकर आहे, की आपण तर आजपासून चुकूनही मिठाई खाणार नाही.

**गौरी** : तुला कसं सांगू ? पण कसलीही भूक लागली की माणूस असाच तुटून पडतो. त्यावेळचं त्याचं रूप—(शहारते.) जाऊ देत ते.

**नाटककार** : बाजीरावाचं खाणं म्हणजे गौरी,—पिंजऱ्यातला वाघ कसा मांसाच्या ढिगावर तुटून पडतो...किंवा लांडगा—

**गौरी** : (वैतागाने) नको ! त्याचं वर्णन नको ! (निघून जाते.)

**नाटककार** : ही तर निघूनही गेली. त्या बाजीरावाला वास आलाय त्याच्या नाटकाचा. एखादं हिंस्र श्वापद आपल्या हरवलेल्या पिल्लाचा माग काढीत येतं, तसा आलाय तो. त्याच्या आयुष्याची कमाई. त्याची मिळकत. त्यानं या देशपांड्याला—आमच्या या दिग्दर्शकाला सांगितलं असेल का ? पण तो तसं कुणाला सांगणारही नाही. त्याला माझा छळ करायचा आहे. गुप्तपणं. हेच, हेच वाईट आहे या माणसाचं. हलकट इसम आहे. गबाळा, गलथान माणूस. एरव्ही तरी ते बाड असंतसंच वाळवीनं खाऊन टाकलं असतं. मी फक्त त्यावर माझं नाव घातलं तर काय झालं ? या बावळट माणसाचा कोथळा काढून गंजलेल्या पात्यानं चिरायला हवा. विनोदी नट ! पण चिडूनही उपयोगाचं नाही.

मधाशी तोल सुटला हेच चुकलं आपलं.

[दिग्दर्शक येतो.]

**दिग्दर्शक** : (विचारात हरवल्यासारखा होतो.) कठीण आहे!

**नाटककार** : (त्याच्या जवळ येऊन त्याच्या खांद्यावर हात ठेवतो.) मघाशी चुकलं माझं—सॉरी!

**दिग्दर्शक** : मघाशी? छे, खूप दिवस झाले त्या चुकीला...पण जाऊ दे! नाटकाचं काय होणार? सगळ्यांचा मूड गेलाय...

**नाटककार** : नाटक होणार!

**दिग्दर्शक** : ते तर सुरूच आहे. आपण सगळीच आतून पोकळ झालोत. एकही माणूस असा नाही की त्याच्यावर विश्वास टाकून पडदा वर उचलावा! शिडातली हवाच गेलीय.

**नाटककार** : (काहीतरी कल्पना डोळ्यांत चमकून) आहे. असा एक माणूस आहे. त्याच्यावर भरीभार टाकून पडदा वर उचलायला हरकत नाही.

**दिग्दर्शक** : आपल्यात आहे कुणी असा?

**नाटककार** : आहे! इथं आहे! बाजीराव!

**दिग्दर्शक** : पुन्हा बाजीराव! तो काय करणार?

**नाटककार** : त्याला उभा करायचा या नाटकात!

**दिग्दर्शक** : उगीचच? म्हणजे ते काय एखादं माकड आहे? कुठल्याही डोंबाऱ्याबरोबर आपलं चेष्टा करायला तयार!

**नाटककार** : तो काय वाटेल ते करून प्रेक्षकांना धरून ठेवील.

**दिग्दर्शक** : मग मी एवढं केलं ते फुकटच! माझ्या श्रमांचं एक वेळ सोडून देऊ. पण बाजीरावाला बळी का द्यायचं? त्यानं काय अपराध केलाय? केवळ विनोदी नट झाला, एवढंच त्यानं केलेलं एक प्रचंड पाप! मग त्याला नाटकात का उभं करायचं? एखाद्या वधस्तंभावर का नको?

**नाटककार** : हे पाहा, तू प्रत्येक प्रसंग अगदी प्राणावर बेतायला आल्या-सारखा अंगावर! घेतोस अरे, थोडं मोकळं वागू! वेळ निभावून

नेऊ! आमच्या सगळ्यांच्या श्रमांचं चीज मुंबईच्या प्रयोगात होईल. पण म्हणूनच हा पहिला प्रयोग कसाबसा साजरा करायचा. बाजीराव आयताच आलेला आहे, तर त्याची योजना करू. पब्लिक पण खूष!

**दिग्दर्शक :** एखाद्या मारवाडी श्रीमंतासारखा बोलतोयस तू! भयंकर विनोदी! नाटकात त्याला उभं राहायला काहीतरी जागा हवी का नको! हे नाटक आहे की सोहळा आहे?

**नाटककार :** बाजीराव आपली जागा बरोबर हुडकून काढील.

[दिग्दर्शक डोक्याला हात लावतो. स्वतःशीच हसतो. नाटककार स्वतःच्या कल्पनेवर खूष होऊन उभा. दारावर बाजीराव येतो. साधारण ठेंगणा माणूस. डोकीवर हॅट. एका हाती वेडीवाकडी काठी. दुसऱ्या हाती व्हायोलिन केस. अंगावर बेंगरूळ सूट. काळा. डोक्याला गंध वगैरे थाटात दारावर उभा.]

**बाजीराव :** (दारावरून) हॅलो! हॅलोऽऽ (फोनवरून बोलल्याचा अभिनय) हॅलो...हॅलो...ऑं? मी भूमीवरून बोलतोय!...ऑं...हे रंगभूमीवरचे लोक गेले कुठं? (ढेकर देत) वा...वा...वा...नुकतीच मिठाई खाल्ल्या-मुळं काय गोड गोड ढेकर आली ही! मिठाई खाल्लीय! आता थोडं बरं वाटतंय! हॅलो...हॅलोऽऽ! हॅलो फ्रेंड!

**दिग्दर्शक :** बाजीराव!

**बाजीराव :** पहिला नव्हे, दुसरा नव्हे आणि पेशवाही नव्हे. आम्ही फक्त एक शून्य बाजीराव! मी एक शून्य बाजीराव बोलतोय! भूमीवरून!

**दिग्दर्शक :** (सहजपणे स्वतःही फोनवर असल्यासारखा) हॅलो, काय म्हणताय? आपण कुठून बोलताहात? हॅलोऽऽ

**बाजीराव :** हॅलोऽऽ हॅलोऽऽ हॅलोऽऽ फोनमध्ये पंधरा पैसे टाकलेले नाहीत काय? मी इथून तुमचे पैसे पंधरा फक्त पाठवू शकत नाही. फोनमधून पैसे अगर चिठ्या पाठवण्याची सरकारनं अजून सोय केलेली नाही. काय बुवा सरकार तरीऽऽ

दिग्दर्शक : बाजीराव ! बाजीराव !

बाजीराव : हॅलो, हॅलो, हॅलो—हा फोन अगदीच बुवा! आणि पलीकडचे लोकसुद्धा ! हा फोन घेऊनच जावं झालं तिकडे. आपलेच कान आणि आपलाच फोन ! करता काय ? पण हा इथंच ठेवावा. स्वगत बोलताना उपयोग होईल. म्हणजे गोष्ट षट्कर्णी होणार नाही. (फोननंतर कर्ण्यावरून बोलण्याचा अभिनय) मोहनराव देशपांडे आणि इतर मंडळी ! आणि उपस्थित लोक हो ! आपण आज काय बोलणार आहात ते आपल्या ध्यानीमनी असेलच. तर आपण ते बोला !

दिग्दर्शक : आज नाटक होणार की नाही याच्याच विचारात आहे.

बाजीराव : (कर्णा मध्येच बंद पडून इतरांना ऐकू येत नाही अशा तऱ्हेचा अभिनय) हॅलोऽऽ (लाउडस्पीकरवर टिचक्या मारतो.) हॅलो...हॅलो... हॅलो...(नुसतेच तोंड हलवतो.)

नाटककार : (हसतो.)

बाजीराव : (मोठमोठ्याने तोंड हलवतो.)

दिग्दर्शक : बाजीराव !

बाजीराव : (प्रत्यक्ष नेहमीच्या बोलण्याच्या पातळीवर येतो.) फोन अथवा लाउडस्पीकर यांचा उपयोग नाही. दोघेही बेटे बंद ! ही लोकं या बंद गोष्टींवर तासन्‌तास कशी काय बोलतात कोण जाणे ! त्यांना नमस्कार ! (नाटककार हसतो.) एऽ हसू नकोस ! नुस्ता पेंढा भरलेला राजहंस आहेस. (पाच बोटे वर करतो.) पाच...पाच...पाच राजहंस होते. आमचे आजोबा सांगायचे. चार उडाले...(घाईघाईने) पूर्वेला, पश्चिमेला, दक्षिणेला, उत्तरेला. (नंतर अत्यंत सावकाश.) एक पूर्वेला उडाला...हे कोण बोलले बोलाऽऽ! राजहंस माझा निजला. दुसरा पश्चिमेला... अरसिक किती हा मेलाऽऽ. हा सूर्य मावळता मावळता पोचला. तिसरा बापडा दक्षिणेला उडतो आहे—उडतच राह्यलाय. आमचे आजोबा म्हणायचे, आम्ही प्रत्यक्ष पाह्यलाय...चवथा उत्तरेला कुठंतरी उडतोय

म्हणतात...पाचवा उडायला पाहतोय. (नाटककाराकडे किंचित पाहून) पण त्यानं पोट आणि त्यातला पेंढा यांसकट उडायचं कसं ?

[नाटककार अस्वस्थ.]

**नाटककार** : (भीती छपवण्याचा प्रयत्न करीत) आपण सुंदर बोलता. आपण मोठे आहात.

**बाजीराव** : मोठा ? सुंदर ? एक होता फुगा. गोष्ट हो—आमची आजी सांगायची—तो फुटला. आजी म्हणाली, "आता फुगा कुठं आहे रे ? तो मोठा सुंदर फुगा—आणि केवढा रे होता तो ?" नातू म्हणाला, "एवढा !" मग आजी म्हणाली, "एवढा !" मग नातू म्हणाला, "एवढा ग आजी मोठा !" मग आजी म्हणाली, "नव्हे रे मुला, हा बघ एवढा." त्यावर नातू दोन्ही हातांत हवा पकडण्याचा प्रयत्न करीत, जोरजोरानं ओरडून म्हणाला, "एवढा !" अजूनसुद्धा नातू दोन्ही हातांत हवा पकडण्याचा प्रयत्न करीत पळतोच आहे.

**नाटककार** : सुंदर...सुंदर कल्पना !

**बाजीराव** : गोजिरवाण्या गालांची, गुंजांच्या डोळ्यांची, गुटगुटीत, गोरीपान, गोबरीगोबरी छान, छान कल्पना !

**नाटककार** : वाहवा !

**बाजीराव** : तिळभर तिळाचा हलवा मणभर मानून खावा. वाहवा वाहवा वाहवा. शंभर कवड्यांत एक रावा...वाहवा, वाहवा.

**दिग्दर्शक** : मधुकर, याला इथंच असू दे ! जीव खेळवतोय तो आपलाच. चल, आपण आत होऊ !

[दोघेही जातात. बाजीरावावर निळा, मंद प्रकाश उतरतो.]

**बाजीराव** : लारीला लारीला ऽऽ ला ऽऽ ला ऽऽ

लारीलाऽऽलारी ऽऽ ला ऽऽ हरी ऽऽ हरी ऽऽ हरीला ऽऽ

दोघेही बेटे पळाले ! चामडी बचावणं हे त्यांचं परम कर्तव्य आहे. पोरे हो ! आम्ही तुम्हांसी ओळखिले. आम्ही तुमचे वारसे जेविलो.

पोरे हो! तुम्ही राहा हातूपायू तुमचे सुखी पसरुनी. आम्ही राहावे आमुचे सुखी. एकीनं तर आमचं नाटकच पळवलं. वांझेनं मूल पळविलं तरी ती वांझच राहिली...त्यात तियेचा काय दोषू! तर दोषू नसे. आमुच्या कर्मी नसे! (कान लावून ऐकतो.) ऑं? हा रडण्याचा आवाज कुठून येतोय? ओहोऽऽ माझं छकुलं ते! माझं नाटक! उगी उगी माझ्या छकुल्या नाटका, उगी राहा बाळा. तुझ्या पायांत बांधीन सोन्याचा वाळा! उगी! माझं छकुलं नाटक रडतंय! आईचा वास आला होय रे! अरे, या सगळ्या जगाला आईचा वास आहे...आलो, आलो माझ्या बाळा! (अत्यंत गंभीर होऊन हातातल्या व्हायोलिनकेसकडे पाहत) ही स्वरांची शवपेटी कुठं ठेवू? (आत्म्याला फोन करण्याचा अभिनय) हॅलो! माय डियर आत्म्या, हॅलोऽऽ...अं. लाईन एंगेज. लाइनवर कुणीतरी बोलतंय. आवाज गौरीचा. आत्म्याचं आणि तिचं संभाषण चाललंय. त्यांचा हा खाजगी संवाद चोरून ऐकणं बरं नव्हे! ही स्वरांची शवपेटी कुठं ठेवावी बरं! (हातातल्या व्हायोलिनकेसकडे पाहतो. पेटी खाली ठेवतो.) उगी, उगी बाळा, छकुल्या नाटका, उगी उगी. थांब हं! मी तुला आता काठीचा खेळ करून दाखवतो. (बसतो उकिडवा. काठी आधाराशिवाय उभी करण्याचा प्रयत्न करतो.) काठी गऽ उभी राहा. उभी राहा. राहा उभी! राहा ग बाई! उभी राहा! हट्ट करून कसं चालेल?
[दंडवते येतात.]
अं? हट्ट करून कसं चालेल! तू आपली उभी राहा! राहा ना! नाही म्हणतेस? तुला भोवरा देईन, गाडी देईन, घोडा देईन, भावला-भावली देईन! कापड, लुगडं, चोळी—सगळं काही देईन! उभी राहा! हट्ट...हट्ट करून कसं चालेल! रामाचा हट्ट चालेल! धोंड्याचा हट्ट चालेल. गौरीचा हट्ट चालेल! (चिंगीचा, कमळीचा, यमीचा, कमीचा—सगळ्यांचा हट्ट चालेल) तुझा नाही चालणार! काय म्हणालीस? मी का आता लहान आहे? हो, तर काय? तुला अजून नीट उभंही राहता

येत नाही. लहान नाही म्हणे! केवढी लागून गेलीय! अग, तुला पाहायला आलेत बाहेर! त्यांचा खोळंबा होतोय. उभी राहा!

[काठी सारखी सारखी पडते. बाजीराव तिला उभं करण्याचा प्रयत्न करतो.]

काठुबाई! उभी राहा! सांगून टाकतोय शेवटचं! हांऽऽऽ! उभी राहा! बोल, चोप हवा की चॉकलेट? (दोघांचा झगडा आता रंगात येतो.) आकाशपाताळ, समुद्रपृथ्वी, देवदानव, तारेवारे, अमृत-विष, स्त्री-पुरुष, उंदीर-मांजर एकत्र बांधीन. तुझ्यासमोर आणीन. कोठे तू एक काठी! मी साडेतीन हाती! काठेऽऽ (गर्जना.) तुझ्याशी एक प्रचंड युद्ध पुकारीन! युद्ध! एक पॅनोरॅमिक युद्ध! काठेऽऽ

[काठीबरोबर बाजीरावाचा प्रचंड झगडा होतो. बाजीराव कोसळतो.]

**दंडवते** : अहोऽऽ अहोऽऽ म्हणजे हे...अहोऽऽ

**बाजीराव** : (व्हायोलिनकेस, काठी घेऊन पटकन उभा राहतो. सद्गृहस्थाच्या पवित्र्यात. प्रकाश ओसरतो.) आपण कोण? या, याऽऽ बसाऽऽ बसा ना! घर तुमचंच आहे. या, बसा!

**दंडवते** : म्हणजे हे जे आता काही चाललं होतं ते तालमीपैकी?

**बाजीराव** : युद्ध! काठीबरोबरचं युद्ध! पृथ्वी युद्धानं काठोकाठ भरली होती. तुंबळ युद्ध! तुम्हांला एक खाजगी सांगू का? आजवरची सगळी युद्धं—दुसरं महायुद्धसुद्धा—काठीबरोबरच झाली होती.

**दंडवते** : म्हणजे युद्धाची तालीम!—म्हणजे तेच—म्हणजे हे युद्धच.

**बाजीराव** : काठीबरोबर मलखांब खेळत होतो. आता पटलं का युद्ध म्हणजे काय ते? युद्धाचं असो! आपण बसा तर खरे! आपलं काही महत्त्वाचं काम होतं का कुणाशी? (दंडवत्यांच्या कोटावर काहीतरी कचरा दिसताच बाजीराव तो टिचकी मारून झटकतो.) बसा. बसा. माणसं बघितली की आपल्याला एकदम बरं वाटतं!

**दंडवते** : म्हणजे आपण स्टेजवरून नेहमी माणसं पाहताच ना?

बाजीराव : बाप रे! स्टेजवरून फक्त भयाण सावल्याबिवल्या दिसतात आम्हांला! त्या माणसांची आठवण नको या वेळी. स्वतःला विसरण्यासाठी खुंट्यांवरचे कपडे घालून आणि स्वतःला खुंट्यांवर टांगून ती माणसं तिकिटंबिकिटं काढून येतात. नाटक पाहायला!

[प्रभा येताना दिसते.]

या या, वेलीबाई—वेल! अरे, ही आमची वेल! तू इथं आहेस होय! अग वेली! हिनं इथं का बरं यावं!

प्रभा : मला नेहमी नेहमी वेल का हो म्हणता? माझं नाव प्रभा!

बाजीराव : सॉरी! वेली ग, सॉरी! आता असं करू आपण, तिघंही इथं छानपैकी बोलत बसू! (दंडवतेकडे पाहून) आपलं नाव काय म्हणालात?

दंडवते : म्हणजे ते मी आपल्याला सांगितलं नाही? माझं नाव भगवंत पांडुरंग दंडवते! मी दिग्दर्शकसाहेबांना भेटायला आलो होतो.

बाजीराव : ठीक ठीक! येतील ते. या बसू आपण. बाहेर हवासुद्धा मोठी सुरेख पडलीय. प्रभा! तूसुद्धा ये! आपण सुखदुःखाच्या चार गोष्टी बोलू! एवढे शब्द बापडे वाया जाताहेत. त्यातले थोडे या गोष्टींसाठी ठेवू! थांबा हं मंडळी! (कोटाचे सगळे खिसे तपासतो.) हं. मिळाली. (कुपी हातात घेऊन) अत्तर हो! खास केवडा आहे केवडा!

[दंडवत्यांच्या मनगटाला अत्तर लावतो. प्रभाकडे जातो. अत्तर लावू पाहतो.]

प्रभा : (हात मागे घेऊन) हलकेच लावणार का?

बाजीराव : मग अत्तराचं मालीश वगैरे करतात की काय? वा, वा वेली!

प्रभा : तसं नव्हे, मनगटाला रंग आहे.

[बाजीराव हिरमुसला होऊन अत्तराची कुपी खिशात ठेवतो.]

बाजीराव—मला यांच्याशी थोडं बोलायचंय.

बाजीराव : वा वा! अत्तराइतकीच दळदार गोष्ट आहे. मी सांगतो, छानच. बरं दंडवते, आपण नंतर बोलू. हीसुद्धा असेल तेव्हा आणि हिच्या

मनगटावर रंगही नसेल. अच्छाऽऽ

[प्रभा कोपऱ्यात जाते. दंडवत्यांना खुणेने बोलावते. बाजीराव आपल्याच तंद्रीत बसून राहतो.]

**प्रभा** : (दंडवत्यांच्या जवळ जाऊन) तुमच्याशीच बोलायचंय मला!

**दंडवते** : म्हणजे आमचं काही चुकलंबिकलं नाही! म्हणजे आपले आम्ही कार्यकर्ते!

**प्रभा** : म्हणूनच थोडंसं बोलायचंय. मला खूप भीती वाटतेय. खूप भीती वाटतेय.

**दंडवते** : भीती? कुणाची?

**प्रभा** : या सगळ्यांची. या वेळी मुंबईची गाडी असेल का हो?

**दंडवते** : मुंबईची? हो ना! पण या वेळीच म्हणजे जरा कठीण. म्हणजे माझ्याजवळ टाइमटेबल नाही. पण...म्हणजे लोक...म्हणजे हे लोक काय म्हणतील? तुमचं काम आहे ना आजच्या नाटकात? कसली भीती वाटते तुम्हांला? (म्हणजे सांगण्यासारखं नसेल तर—म्हणजे माझा हा आगाऊपणाही होत असेल. म्हणजे तुम्ही किंवा कुणीही—मीसुद्धा—कर्तव्यात चुकू नये. भीतीच वाटते? कसली? म्हणजे—

**प्रभा** : कसली भीती वाटते म्हणून सांगू? ते लोक—त्या तिकडचे... (ग्रीनरूमच्या दिशेने पाहत) चमत्कारिक वाटतात. मुंबईला मला अशी भीती वाटली नाही. पण आज मात्र या गावी—नका—अधिक याहून काही सांगता येत नाहीय मला. उगीचच आले मी. तरी आई सांगत होती मला—जाऊ नको म्हणून.

**दंडवते** : (म्हणजे थोडंसं कळलं. त्यातलं म्हणजे—हे म्हणजे...माझं सांगणं ऐकाल का? ऐकाच असं नाही. पण—नाटक आटोपल्यावर—)

**प्रभा** : मला नाटक आटोपल्यावर न्याल? रात्री इथं राहायचं...

**दंडवते** : नका, नका राहू. नाटक आटोपलं म्हणजे लगेच येतोच. नेतोच.

**प्रभा** : खरंच न्या. उद्या सकाळला मी निघून जाईन. पुढच्या प्रयोगांना

मी राहणार नाही इथं. उगीचच वाटतं, हे लोक मारून टाकतील मला.

दंडवते : तसं म्हणजे त्यांना मारूनबिरून टाकता येणार नाही. पण धोका कशाला पत्करायचा? पण म्हणजे मला आपलं वाटतंय, तुमचा माझ्यावर कसा काय विश्वास बसला?

प्रभा : मला माहीत नाही. कदाचित चुकतही असेन मी. पण तुम्ही या हं मात्र नाटक संपल्यावर!

दंडवते : येईनच. म्हणजे शब्द गेला तो गेला. निर्धास्त राहा तुम्ही.

[दिग्दर्शक, नाटककार येतात.]

बाजीराव : (काठी आपटून) दंडवतेसाहेब! हे डायरेक्टरसाहेब!

दिग्दर्शक : अहोऽऽ, मिळालं का सामान?

दंडवते : (मोठ्या अपराधी मुद्रेने) क्षमस्व! म्हणजे ते सामान मिळणार नाही!

दिग्दर्शक : (थोडासा डळमळतो.) म्हणजे, झालं काय?

दंडवते : म्हणजे त्याचं असं झालं. म्हणजे ते—म्हणजे हे...आपले देव दिवाणसाहेब सामान द्यायला तयार होते. पण—पण म्हणजे काय? त्यांची सौभाग्यवती म्हणजे दिवाणीणबाई—

दिग्दर्शक : त्यांचं काय झालं? काय म्हणाल्या त्या?

दंडवते : त्या म्हणाल्या, "तुमच्या नाटकातले न्यायमूर्ती—म्हणजे जज्ज—मयत आहेत ना?" त्यावर म्हणजे मी त्यांना सांगितलं की होय. त्यावर त्या म्हणजे दिवाणीणबाई म्हणाल्या की, "नाही हो नाही, मी यांच्या वस्तू मेलेल्या माणसासाठी देईन की काय? नाही, नाही." त्यावर मी म्हणालो, "अहो, नाटकात मेले आहेत ते." त्या म्हणाल्या, "जळ्ळं मेलं!"—म्हणजे हे नाटक—"त्यात कशाला मेले ते? मी देणार नाही मुळीसुद्धा यांच्या वस्तू, त्यांच्यासाठी." त्यावर ते म्हणाले—म्हणजे आपले हे देव दिवाणसाहेब—"देऊन टाकू झालं. काय आहे एवढं त्यात!" मी पटकन संधी साधून म्हणालो, "माझा शब्द गेलाय दिवाणसाहेब.

द्याच." त्यावर त्या म्हणजे बाई म्हणाल्या, "नाही ग बाई. मेलेल्या माणसासाठी मी इकडचं काही म्हटल्या काहीसुद्धा द्यायची नाही." त्या म्हणजे एकदम रडायलाच टेकल्या. देव दिवाणसाहेब मला म्हणाले, "बघा बुवा दंडवते, आता मी यात काय करू? यात माझं काही चालण्या-सारखं आहे का?" दिवाणीणबाई म्हणाल्या, "तुम्ही जाऊन कपडे करा पाहू! नाटकाला जायचंय ना आपल्याला?" आणि देव दिवाणसाहेब कपडे करायला माडीवर निघून गेले. आणि मी आपला इकडे मुकाट्यानं आलो. म्हणजे या व्यवहारात आम्ही अगदी शतमूर्ख ठरलो.

**दिग्दर्शक** : आली पंचाईत!

[गौरी मेकपमध्ये येते. पुढील नाटकातील सोळासतरा वर्षांच्या मुलीचा मेकप.]

**बाजीराव** : पंचाईत? ती का म्हणून? तुम्ही विसरून आलेल्या त्या सामा-नाचं काम मी करतो. काही हरकत नाही. आजवर अशाच गोष्टींचं काम आम्ही करत आलो. यापुढंही वेळ अडू देणार नाही. देशपांडे, तुम्ही यांना थोडी मिठाई असली तर द्या—या दंडवत्यांना. आणि काठी, कोट, चपला, चष्मा वगैरे मीच असं समजा.

**नाटककार** : मला वाटतं, त्यांना तो सोन्याची बटणं असलेला कोट देणं जिवावर आलं असावं!

**बाजीराव** : छे, छे! ज्याच्या कोटाला सोन्याची बटणं आहेत त्याला हो काय? सोनं काय त्याच्याबरोबर मसणवटीत जाणार आहे? अहो, आम्हीही एक सोन्याचं नाटक लिहिलं होतं. ते ज्याला हात लावील त्याचं सोनं होणार आहे. म्हटलं, होऊ दे. तेवढेच कुणा गरिबाचे हात सोन्याचे होतील. त्या गरिबाबरोबर मसणवटीत जातील. तर सोन्याच्या कोटाची गोष्ट ही अशी आहे. सोन्याचा कोट, सुखी माणसाचा सदरा—एकच सगळं!

[नाटककार चांगलाच चरकतो.]

दिग्दर्शक : म्हणजे माझा संशय खराच! या गोष्टी लपून राहत नाहीत.

नाटककार : काय झालं?

दिग्दर्शक : बोलण्याच्या मनःस्थितीत नाही मी! शेवटी मलाच तेवढं यातून बाहेर पडावं लागणार आहे.

[पडद्याच्या खूप बाहेरून एक उंच गंभीर आवाज ऐकायला येतो.]

आवाज : आज आपण नाटक पाहणार!

[कुठून तरी आवाज येतो एवढे प्रथम कळते. मग पडद्याबाहेरून आवाज येतो हे कळताच नाटककार व दिग्दर्शक पडद्याजवळ जातात. कान लावून ऐकतात.]

दंडवते : हा आवाज आप्पारावांचा!

आवाज : (थोडा जवळ येतो.) आज आपण नाटक पाहणार!

[गौरी पडद्याजवळ जाते. किंचित पडदा बाजूला करून डोकावून पाहते.]

दंडवते : अहो, अहो दिग्दर्शकसाहेब! मी म्हणजे जातो आता. म्हणजे आता जाणंच बरं! पुन्हा एक प्रयत्न करून पाहतो.

दिग्दर्शक : (दंडवत्यांना) जा! जा तुम्ही! बघू यातनं काय होतंय! तुमचा आभारी आहे मी! तुम्ही फार केलंत आमच्यासाठी.

दंडवते : छे हो, काहीच म्हणजे काहीच केलं नाही मी. (पुन्हा प्रयत्न करतो. (जातो.))

आवाज : (थिएटरच्या मधूनच) आज आपण नाटक पाहणार!

[गौरी तोंड मागे घेते. तल्लीन होते. भारावते. बाजीराव मधोमध उभा. एखाद्या तटस्थ चित्रासारखा. चेहऱ्यावर कोणताही भाव नाही. नाटककार पडद्याच्या एका टोकाशी. दिग्दर्शक पडद्याच्या दुसऱ्या टोकाशी.]

आवाज : अजून कुणीच आलेलं नाही.

[गौरी पुन्हा किंचित पडदा दूर करून डोकावते. बाजीराव तटस्थच आहे. त्याच्यावर निळा, मंद प्रकाश उतरतो. बाजीराव चलित व्हायला लागतो.]

**बाजीराव** : हाच तो आवाज!

हा आवाज माझ्या ओळखीचा!

हा आवाज आहे एका देवमाशाचा.

हाच, हाच तो देवमासा मला एकदा सांगत होता—

सलाम कर!

म्हणालो, शिंगावर घेशील तर करतो.

म्हणाला, घेईन.

चढलो त्याच्या शिंगावर.

केला सलाम! पण याला नाही.

मी सलाम ठोकला तो थेट याच्या शिंगावरून ईश्वराला.

याला आला राग, यानं शिंग हलवलं.

मी थेट येऊन पडलो या वैराण वाळवंटात.

समुद्र झाला एकदम भयाण!

चिक्कार भयाण!

भयंकर भयाण! प्रचंड भयाण.

तुफान. तुफाऽऽन.

[निळा प्रकाश ओसरतो. बाजीराव पुन्हा तटस्थ. तसाच स्टेजच्या मधोमध उभा. गौरी पडद्याकडून मागे येते.]

**गौरी** : राजा! खरंच राजा! शूर, रुबाबदार...

**बाजीराव** : सा रम्या नगरी महान् स नृपतिः—

**गौरी** : (रागात) ही नगरी तुझी नव्हे. तू तसाच उभा राहा!

**दिग्दर्शक** : खुर्च्या ठोकरीत होता. भयंकर माणूस असावा! आप्पाराव!

**गौरी** : होय, त्याला काय वाटेल ते शोभेल!

**बाजीराव** : रिकाम्या प्रेक्षागृहातील एक रिकामी खुर्ची बोलली. खुर्चीनं सलाम केला!

**गौरी** : (रागाने) बाजीराव! (रागाने मुसमुसते.)

**नाटककार** : (एकटा पडल्यासारखा लांबून बोलतो.) आजचा प्रयोग रद्द करावा हे वरं.

**दिग्दर्शक** : (उरलेसुरले बळ शब्दांत आणून) अजूनही प्रयत्न करायचाय मला!

**गौरी** : मला तर आज काम करावंसंच वाटत नाही.

**दिग्दर्शक** : गौरी? म्हणजे—

**गौरी** : खरंच. (हरवते.)

**दिग्दर्शक** : (ओरडून) गौरी, नाटक झालंच पाहिजे. नाटक ठरल्या वेळी झालंच पाहिजे.

[डोक्यावर लालभडक कोशा, मिश्यांचे बहारदार कल्ले वळवलेले, पिळदार शरीर, खाकीचा पितळेची बटणं असलेला कोट, तलम धोतर, कोल्हापुरी वहाणा, बंदूक घेतलेला असा आप्पाराव प्रवेश करून भिंतीवर दाणकन मूठ मारतो. स्टेज किंचित हलून जाते. दिग्दर्शक अस्वस्थ.]

**आप्पाराव** : काय रे चोरांनो! नाटक केव्हा सुरू होणार? आम्हांला नाटक पाहायचंय. काय म्हणतोय मी? बोला की रे बावळटांनो, बोला!

[गौरी बेभान होऊन पाहतच राहते.]

मनात विचार केला होता आम्ही, की यावं सावकाशीनं. रुबाबात. पण मग आमचा विचार बदलला. आमच्या गावात आमच्याच लहरीनुसार नाटक झालं पाहिजे.

**बाजीराव** : समुद्राची प्रचंड लाट किनाऱ्यावर आली. माझ्या छकुल्या नाटका, आता गवताच्या एखाद्या पात्यासारखी मान लपवून घे!

**दिग्दर्शक** : आपलं नाव काय?

**आप्पाराव** : आम्हांला नाव विचारणारा तू पहिलाच भेटलास! गावातल्या डोंगराला काय म्हणतात रे चोरा?

**बाजीराव** : डोंगर. (इवल्याशा वस्तूचा हाताने निर्देश करतो.)

**आप्पाराव** : तसंच आम्हांला आप्पाराव म्हणतात! (मिश्यांवरून मनगट पालथे फिरवतो.)

नाटककार : डोंगराएवढं नाव आहे आपलं.

आप्पाराव : अबेऽऽ हट! नावच की काय? ते नाव धारण करणारे आम्ही-सुद्धा डोंगराएवढे आहोत. वाड्यावर ये आमच्या.

बाजीराव : क्षमा असावी महाराज. पण या आपल्या नावामुळंच तुमचा वाडा आमच्या माणसाला सापडायचा नाही.

आप्पाराव : (काही न समजून) तो कसा रे चोरा?

बाजीराव : तुमच्या नावाची पाटी डोंगराएवढी आणि त्यामागं तुमचा तो इवलासा वाडा!

आप्पाराव : गप ऱ्हा! मरशील वायाच! दोन लाथा घालीन तर तुमचं हे स्टेज चिमणीच्या घरट्यागत कोसळून पडेल.

[दिग्दर्शक सुस्कारा टाकतो. गौरीच्या चेहऱ्यावर मग्न भाव.]

आमचा वाडा आमच्यासारखाच प्रचंड आहे. कातळांतले दगडी चिरे तोडून बांधलाय आम्ही तो. आमच्या वाड्याच्या भिंताडांना गिलावा माहीत नाही. ते हवंच कशाला? नाटकाचं बोला!

दिग्दर्शक : ते योग्य वेळी सुरू होईल!

आप्पाराव : योग्य वेळी? ती ठरवणारा तू कोण? आमच्या गावात आम्ही ठरवू ती वेळ!

बाजीराव : झाडाचं पिकलेलं पानसुद्धा या गावात अगदी त्याच वेळी पडतं महाराज!

आप्पाराव : अकरा वाघांची कातडी आमच्या वाड्याच्या दिवाणखान्यात आम्ही टांगून ठेवलीत.

बाजीराव : तुमचं स्वतःचं धरून?

आप्पाराव : (संतापून ओरडतो.) हे अजून कधी आम्ही ऐकलं नाही. हे कसं सहन करायचं आम्ही!

[जवळची एक खुर्ची उचलतो. दिग्दर्शक व नाटककार धावून खुर्ची पकडतात. आप्पाराव खुर्ची ठेवतो.]

गौरी : बाजीराव!

बाजीराव : माफ करा. मी प्रत्यक्ष आपल्या कातड्याबद्दल बोलत नव्हतो. पण काही काही लोक वाघाचं कातडं पांघरतात.

आप्पाराव : तुझं कातडं नदीच्या घाटावर वाळत घालतो बघ!

बाजीराव : आमचं कातडं आमच्या या देहावरच छान वाळतंय आप्पाराव!

आप्पाराव : नाटकाचं बोला काय ते!

दिग्दर्शक : कुणाशी बोलताहात? गावातली दंडेली इथं नाही चालायची! नाटकाची वेळ अजून झालेली नाही. नाटक वेळेवर सुरू होईल!

आप्पाराव : नाटक आत्ताच सुरू व्हायला पाहिजे. नाहीतर पाहा, प्रसंग आमच्याशी आहे. (हात वर उचलतो.)

बाजीराव : हे जाणतोच. प्रसंगाचं गांभीर्य कळतंय.

नाटककार : आप्पाराव, मी या नाटकाचा लेखक या नात्यानं आपल्याला विनंती—

दिग्दर्शक : मधुकर, कृपा करून विनंती करायचीच असली तर नाटककार या नात्यानं करू नकोस. कोण? नाटककार कोण?

नाटककार : मी नाटककार.

बाजीराव : (वर हात करून) तो एकच.

आप्पाराव : (ओरडतो.) एऽऽ भांडणतंटे बंद!

नाटककार : हे चालायचंच! तेव्हा आपण बाहेर जा! नाटक थोड्याच वेळात सुरू होईल.

दिग्दर्शक : नाटक सुरू होणार नाही.

आप्पाराव : नाटक सुरू होणार नाही? पाहतो कसं होत नाही ते! नाटक सुरू होत नाही म्हणजे काय?

बाजीराव : आप्पाराव, गोष्ट सांगतो गोष्ट! एक होतं घड्याळ. मोठ्ठालं. ते होतं एका रिकाम्या वाड्यात. एक दिवस ते पडलं बंद! वाड्याचा मालक आला तर घड्याळ बंद. मालकाला आला राग. त्यानं नुस्तं डोळे

वटारून पाहिलं त्या घड्याळाकडे—घड्याळाच्या वर्तुळात भीतीनं काटे उभे राहिले. वर्तुळासकट लागलं घड्याळ फिरायला. गराराऽऽ गराराऽऽ (आप्पारावाच्या चेहऱ्याकडे विचित्रपणे पाहतो.) आप्पाराव—

**आप्पाराव :** काय? (थोडा मागे सरकतो.)

**बाजीराव :** (विचित्र आवाजात) आप्पाराव, हा मुखवटा आपल्याला कुठं मिळाला?

**आप्पाराव :** (घाबरटपणे) मुखवटा? (किंचित मागे.)

**बाजीराव :** (होकारार्थी मान हलवतो. आप्पारावाच्या डोळ्यांकडे बोट दाखवून) सर्कस! भयानक सर्कस! या दोन मृत्युगोलांत ही एकच मुलगी काम करतेय. (गौरीकडे पाहतो.)

**आप्पाराव :** (खूप मागे जाऊन) बाज्या, बस कर तुझा तमाशा! आम्हांला हे सहन होत नाही. बाज्याऽऽऽ (ओरडतो.)

**बाजीराव :** तमाशा! आप्पाराव, तुम्ही मला देवमाशासारखे दिसताहात. त्याचाच आवाज हा!

[पुढील संवाद तमाशाच्या वळणाने व्हावा. त्यात सख्याही भाग घेतो.]

एखाद्या शेपटीच्या फटकाऱ्यानंसुद्धा तो हे फळ्यांचं स्टेज समुद्रात फेकून देईल! आप्पाराव, आजच वशिला लावून ठेवतो. त्यांतल्या एखाद्या फळीवर या पामरास उभं राहायला तरी जागा द्या! (फळीवर तरंगल्याचा अभिनय.) या तमाशातल्या नाटकाचं नाव 'फळीवरील माशांचा तमाशा'. एक मासा उडी मारतो. एक मासा शेपटीवर उभा राहतो. (एक सलाम करतो.) एक मासा भाषण करतो. एका माशाचा लाउडस्पीकर बिघडतो. एक मासा पुल्लिंगी, दुसरा एक स्त्रीलिंगी. एक मासा आपल्या आईला ममी म्हणतो. मम्मी! त्याच्या आईचं नाव असतं कमी! माहेरचं यमी! एक मासा टाटा करतो. टाऽऽटा! त्याचा आजापणजा म्हादा-विठा. एक मासा बिचारा मासाच असतो.

[बाजीराव गरिबासारखा बसतो. आप्पाराव मोठ्याने गडगडा हसतो.]

बाजीराव : मोठ्यानं हसू नका. एक मासा हसत हसत बाहेर यायचा.

आप्पाराव : फळीवरील माशांचा तमाशा? आणि खरोखरीचे मासे त्यात काम करणार?

बाजीराव : ही गौरी आहे ना, ही त्यातल्या ममीचं काम करणार. आणि हे दिग्दर्शकसाहेब त्या फळीचं काम करणार. आणि नाटककारसाहेब! काय हो, तुम्ही कसलं काम करणार? ते नुस्तेच टाटा करणार. टाटाऽऽ! मी त्यातल्या नाटकाचं अथवा तमाशाचं किंवा ह्या दोघांच्याही आईचं काम करणार!...पण तुमचा हा मुखवटा—

आप्पाराव : (दाराकडे जातो.) मुखवटा काय? हेच ते. अकला कमी तुम्हा नाटक्यांना! ऐकणार आहेस माझा पराक्रम? एकच किस्सा सांगतो. एकदा माझ्या खळ्यात न्हायला बिबटा वाघ उभा. रातची वेळ होती लेका! गोठ्यातल्या गोधनाला त्याचा वास आला. लागलं ते शेण टाकायला. घरदार झालं घुबडागत गप—जागच्या जागी. खळ्यातल्या कुत्र्यानं एकदाच ख्यँक केलं. म्हटलं, झालंय काय? राह्यलो उंबऱ्यात उभा. हांऽऽ हा तर आमचा दोस्त! घरातनं बंदूक आणीपर्यंत थांबणार काय म्हणलं. छ्याऽऽ, उतरलो खळ्यात आणि घातला हात दोस्ताच्या दाढेखाली. काढली जीभ ओढून बाहेर—(गौरी शहारते.) जास्वंदीच्या पाकळीगत.

बाजीराव : तात्पर्य काय, कुणालाही जीभ अथवा दाढा असू नयेत.

आप्पाराव : फार चुरूचुरू बोलतोयस रे? (त्याच्या अंगावर धावतो.)

नाटककार : हे पाहा आप्पाराव! नाटक लौकरच सुरू होईल! आपण शांत व्हा!

आप्पाराव : माफी मागा आमची!

नाटककार : मी आपली क्षमा मागतो!

बाजीराव : क्षमा? नाही! माफीच मागा त्यांची! माफी म्हणालेत ते.

आप्पाराव : चार बुकं आम्हीही शिकलोत. नाटक लौकर सुरू करा. बाकीचं जाऊ दे खड्ड्यात. थिएटरला आग लावीन, आग. माहीत नाहीय

तुम्हांला अजून.

[आप्पाराव दारापाशी जातो. गौरी पुढे होते. आप्पाराव दुर्लक्ष करून निघून जातो. आतले काही नट अच्युत, सख्या वगैरे मंडळी स्टेजवर येतात.]

सख्या : काय तो आंप्पाराव ! माणूस आहे का काय तो ?

अच्युत : आपली छाती नाही स्टेजवर यायची !

दिग्दर्शक : मी नाटक रद्द करीत आहे.

नाटककार : नाटक होणार आहे.

दिग्दर्शक : बाजीराव, खरं सांग, नाटक कुणाचं आहे ?

नाटककार : माझं !

गौरी : आजचं नाटक आप्पारावांचं !

अच्युत, सख्या : आपणा सर्वांचं ! हो म्हणजे काय ? एवढं केलं—

दिग्दर्शक : मी जाऊन बाहेर प्रेक्षकांत बसतो. बाजीराव, तू आहेसच. मी निघालो. इथं उभं राहणंही नको झालंय मला ! इथं एका फार मोठ्या मूल्याचा भंग होतोय.

बाजीराव : शिवधनुष्याचा भंग होतो तिथं मूल्याचं काय घेऊन बसलास ?

दिग्दर्शक : ते धनुष्य तुझं तूच सांभाळ. आम्ही निघालो. नाटक पाहायला !

[उदास होऊन चौफेर पाहतो. निघून जातो.]

प्रेक्षकांतून आवाज : नाटक सुरू करा रे !

[नाटकातली अच्युत, सख्या वगैरे पात्रे तोल गेल्यासारखी निघून जातात. नाटककार बाजीरावाशी बोलण्याचा दुबळा प्रयत्न करतो. मग निघून जातो.]

गौरी : बाजीराव, आप्पारावांना विनाकारण दुखवलंस तू !

बाजीराव : आप्पारावांना दुखवलं ? कुणी मी ?

गौरी : हो, हो. तू !

बाजीराव : वा वा ! तुझ्यापर्यंत त्या दुःखाच्या कळा आल्या,—अर्थात ते

खरं असावं. गौरी, माफ कर ! आमचं दुःख आम्ही परत घेतो.

**गौरी** : बाजीराव, हे संपणार तरी कधी तुझं दुखणं !

**बाजीराव** : संपेल कधीतरी !

**गौरी** : लौकर संपलं पाहिजे आता हे ! कशाला प्रेम करतोस माझ्यावर ?

**बाजीराव** : मी श्वासोच्छ्वास का करतोय ?

**गौरी** : नीट बोलावं माणसानं ! नेहमीच वाकडं वाकडं काय ?

**बाजीराव** : सरळ बोलेन तर धंदा बसेल माझा. ही काठीसुद्धा वाकडीच आहे पाहा. प्रेमाचं राहू दे ! अत्तर हवंय का अत्तर ? ते खिशातच अत्तर आहे माझ्या. केवडा ! तुझ्या आवडीचं. (कुपी काढतो.)

**गौरी** : अत्तर !

**बाजीराव** : अत्तरच. प्रेमाचं तात्पर्य !

**गौरी** : राहू दे ते तुझ्यापाशी !

**बाजीराव** : अच्छा !—आम्ही आणि आमचा हा खिसा.

[कुपी खिशात ठेवतो. गौरी निघून जाते.]

आता मी एकटाच इथं ? माझ्या छकुल्या नाटका...हे तर सगळेच पळाले.

**प्रेक्षकांतून आवाज** : नाटक केव्हा सुरू होणार ? (लोकांच्या शिट्या.)

**नाटककार** : (प्रवेश करून) नाटक लौकरच सुरू होईल !

**प्रेक्षकांतून आवाज** : म्हणजे घड्याळाप्रमाणं की कॅलेंडरप्रमाणं ?

**नाटककार** : आत्ताच सुरू होतंय. मी एक महत्त्वाची घोषणा करीत आहे. आजच्या या नाटकात आजचे ख्यातनाम विनोदी नट 'बाजीराव' हे काम करणार आहेत.

[बाहेरून लोकांच्या टाळ्या. शिट्या. त्यावर आप्पारावांचा दमदाटीचा आवाज : "गप ऱ्हा रे ! गप ऱ्हा !" लोक शांत.]

**नाटककार** : बाजीराव, तुम्ही काय वाट्टेल ते करा ! उड्या मारा, हसवा लोकांना. माझी परवानगी आहे. काय हवं ते करा.

[बाजीराव त्याच्याकडे चमत्कारिकपणे पाहतो.]

**नाटककार :** लोक हो ! पुन्हा ऐका ! आजच्या या नाटकात सुप्रसिद्ध नट, विनोदाचे सम्राट बाजीराव काम करणार आहेत.

[बाहेरून पुन्हा टाळ्या.]

बाजीराव, मी निघालो. जबाबदारी आपल्यावर आहे.

[बाजीराव पुन्हा चमत्कारिकपणे पाहतो. नाटककार बोलण्याचा दुबळा प्रयत्न करीत निघून जातो.]

**बाजीराव :** जबाबदारी माझ्यावर ! मी विनोदी नट ! सुप्रसिद्ध, ख्यातनाम ! अच्छा ! छकुल्या नाटका, तू माझेच आहेस ! मी तुझी आई आहे. आतले लोक रंग लावताहेत ! बाहेरचे लोक वाट पाहताहेत.

[एक माणूस येऊन घंटा वाजवतो.]

**बाजीराव :** छकुल्या नाटका ! ऐकलंस ? आहे, आहे. घाबरायचं नाही. बाहेरचे लोक तुला पळवतील. पण मी आहे ना ! पाहतो कसे पळवतात ते ! जहाजाचा कप्तानच निघून गेलाय. मला इथं उभं राहायला जागा कुठं आहे ? बाळा ! ती खिडकी आहे ना ? तिच्यामागं मी उभा आहे. तिथंसुद्धा उभं राहायला जागा नाहीय. पण मी तारेवर उभा आहे असं तू समज. मीही आजवर तेच समजत आलोय.

तर मी तारेवर उभा आहे.

हळूहळू ढग जमायला लागलेत.

आतले ढग रंगून तयार आहेत.

बाहेरचे ढग गच्च दाटून आलेत.

आता लौकरच आतले ढग बाहेर येतील.

छकुल्या नाटका, तू माझ्या पंखांत सुखरूप आहेस.

मी इथं तारेवर उभा आहे. पंख पसरून आहे.

पंख आहेत मला.

[धूपवाला येतो. धूपदाणीवर हात धरून. बाजीराव खिडकीमागे जातो.]

मी तारेवर उभा आहे.

[दंडवते घाईघाईने येतात.]

**दंडवते** : म्हणजे विचारून आलो. पुन्हा नाही म्हणाले. माझ्याजवळचं हे गीतारहस्य आणलंय. माफ करा, इतर वस्तू नाहीत, म्हणजे—

[सख्या तिसरी घंटा देत असतो, तो दंडवत्यांना हाकलून देतो. तिसरी घंटा होते.]

बाजीराव : *तुम्हि रंग करा रे अपुला*
*लावा रंग रंगल्या गालां*
*गाल रंगल्या गालांऽऽ रे.*
*उदो अंबेऽऽ उदोऽऽ उदोऽऽकारें गर्जतोंऽऽ*
*अमुचा बुकाच पुरता झाला रे*
*काळा अगदी काळाऽऽ*
*मळवट लावा भाला रे*
*लावा सगळे भालाऽऽ*
*हा रंग भयानक साला रे*
*रंग भयानक सालाऽऽ*
*जळाल रे सांभाळाऽऽ*
*तुम्हि रंग करा रे अपुलाऽऽ*

[पडदा हळूहळू उघडतो.]

# अंक दुसरा

[तोच दिवाणखाना.

नाटक सुरू होऊन गेले आहे. एक गृहस्थ शोकासनावर बसलेल्या न्यायमूर्तींच्या ज्येष्ठ चिरंजीवास भेटून पाठमोरा होऊन जाताना दिसतो.

न्यायमूर्तींचा ज्येष्ठ चिरंजीव वसंत एका पांढऱ्याशुभ्र शोकासनावर मान खाली घालून छातीवर हातांची घडी घालून बसलेला आहे. दाढी किंचित वाढलेली आहे.

वरच्या मजल्यावरून न्यायमूर्तींचे सर्वांत लहानगे अपत्य कुमारी सुलभा (वय वर्षे सोळासतरा. हे काम गौरी करते आहे.) हाती एक दळदार ताजा टवटवीत गुलाबगुच्छ घेऊन अत्यंत जड पावलांनी प्रवेश करते.

बाजीराव प्रेक्षकांच्या डाव्या हाताशी खिडकीत उभा आहे. प्रेक्षकांच्या अगदी पुढल्या दोन रांगा ठळकपणे दिसाव्यात. आप्पाराव अगदी पुढल्या रांगेत हाती बंदूक घेऊन बसलेले आहेत.

[सुलभा फुलदाणीत गुच्छ ठेवते. मरगळलेली फुले काढून टाकते.]

**वसंत** : सुलभा, ती गुलाबाची फुलं तू त्या फुलदाणीत का म्हणून ठेवीत आहेस ?

[सुलभा फुलांतच मग्न.]

**वसंत :** सुलभा, ती गुलाबाची फुलं तू त्या फुलदाणीत का म्हणून ठेवीत आहेस?

[सुलभा फुलांतच मग्न.]

**वसंत :** सुलू, काय म्हणतोय मी?

[सुलभा फुले पाहण्यात मग्न.]

**वसंत :** ऐकू येतंय का? एऽऽ सुलूऽऽ

**सुलभा :** काय म्हणतोय आमचा दादा?

**वसंत :** हे बरं दिसतं का?

**सुलभा :** हो, बरी दिसतात ही फुलं!

**वसंत :** तुला, वेडबीड लागलंय की काय?

**सुलभा :** वेड? ते लागू नये म्हणून तर—ही फुलं ठेवली मी. दादा गेले. आज दुसरा दिवस. दादांना फुलं आवडायची. हीच, हीच गुलाबाची फुलं आवडायची त्यांना! फुलं ठेवण्याचं काम माझ्याकडे होतं. चुकून दुसऱ्या कुणी फुलं ठेवली तर त्यांना राग यायचा. दादा नेहमी म्हणायचे, सुलू गऽ तुझे हात फुलांना लागले की—(खिन्न) आज दुसरा दिवस! फुलं तर फुलताहेत. दिसतात बघ कशी? का रे दादा? ती सुकलेली फुलं का ठेवायची त्या फुलदाणीत? दादांना अगदी ताजी-ताजी फुलं आवडायची! (फुलांवरून हात फिरवते.) दादा म्हणायचं... दादा म्हणायचे, सुलू, फुलांना तुझे हात लागतात की तुझ्या हातांना फुलं लागतात...(जड आवाजात.) बरी दिसतात नाही रे ही फुलं?

**वसंत :** आता सांत्वनासाठी लोक येतील, त्यांना काय वाटेल? ही फुलं, ताजी, टवटवीत फुलं बघून काय म्हणतील ते लोक आपल्याला?

**बाजीराव :** (तोल सावरण्याचा अभिनय) सकाळ झाली आहे. या भूतलावरील पुष्पवाटिका फुलल्या आहेत. कित्येक माणसं मेली असतील. कित्येक मरणाच्या वाटेवर असतील. म्हणून काय झालं? फुलांनी फुलू नये की काय? (गौरीकडे पाहून) हे तनुलतिके सुलभे, त्या पुष्पपात्रातील एक गुलाबपुष्प इकडे देतेस काय?

म. ग्रं. ... 
दा. क्र....
दि. .........

[लोकांत शिट्ट्या. आप्पाराव खाकरतो. सुलभा बाजीरावाकडे किंचित पाहते. मग मानेला झटका देते.]

**वसंत** : (थोडा घाबरलेला) सुलभा, हे खरंच बरं दिसणार नाही.

**सुलभा** : बरं काय नि वाईट काय? मीसुद्धा काही मोठ्या सुखानं ठेवली नाहीत ही फुलं इथं!

**वसंत** : सुलूऽऽ, मी सांगतोय, ती फुलं—होऽऽ होऽऽ ती गुलाबं तू फेकून दे बाहेर.

**सुलभा** : तूच दे फेकून. माझे हात गुलाबं ठेवण्यासाठी आहेत. फेकणारे हात तुझे, तू दे फेकून! दे ना, फेकून दे म्हणते ना!

**वसंत** : रागावू नकोस, सुलू, रागावू नकोस. दादांच्या दुःखानं काय बोलावं तेच कळेनासं झालं आहे. अगदी दादांचीच शपथ. मी अगदी हतबुद्ध होऊन गेलोय. (मांडीवर कोपर टेकून तळव्यावर डोके ठेवतो.)

**बाजीराव** : बुद्धं सरणं गच्छामि! धम्मं सरणं गच्छामि!

**वसंत** : (दचकतो. मग बाजीरावाच्या त्या बोलण्याचे त्याला फटकन हसू येते. मग उगीचच हसलो ही जाणीव होते.) सुलभा, तर मग कालची गंमत औरच! मोठी मजेदार! (आसनावरून उठू पाहतो.)

**बाजीराव** : महाराज, आपण शोकासनावर बसला आहात! उठू नका!

**वसंत** : (गोंधळून) आं? हो हो, तर—तर काय? काय? सुलू—आपलं सुलू...(भाषण विसरतो.)

**बाजीराव** : प्रॉम्प्टर प्लीज! बी रेडी प्रॉम्प्टर! नेहमीच दुःखातिरेकानं भाषणं विसरली जाण्याची शक्यता असते. प्रॉम्प्टर—

**प्रॉम्प्टर** : (विंगेतून) काल खुर्च्या अपुऱ्या पडल्या!

**बाजीराव** : काल खुर्च्या अपुऱ्या पडल्या.

**वसंत** : काल खुर्च्या अपुऱ्या पडल्या. कुणाशी काय बोलावं हेच कळत नव्हतं. किती लोक! एकजात झाडून सारे वकील! वाटत होतं की या नगरीत झाडून सारे वकीलच आहेत. एकेक वकील येऊन त्या

खुर्चीसमोर उभा राहत होता. डोळे मिटून एक दीर्घ निःश्वास टाकीत होता. एक वकील तर चक्क रडला. हे बाकी आश्चर्यंच!

बाजीराव : वकील रडले नसतील. त्यांच्या डोळ्यांतून पाणी आलं असावं. अरे, माझा तोल जातोय की काय?

सुलभा : वसंतदादा! म्हणजे तुला गंमतच वाटत होती ना?

बाजीराव : म्हणजे डॅडींचा डेथ तू चक्क एंजॉय करीत होतास रे दादा!

वसंत : (गोंधळतो. स्वगतासारखे पुटपुटतो.) यातून सहीसलामत बाहेर पडलो म्हणजे झालं.

[गौरी त्याच्या काहीतरी कानांत सांगते.]

तसंच काही म्हणता येणार नाही. पण दादा कुणीतरी फारच मोठे होते/ आणि त्यांचा या नगरीवर विलक्षण दरारा होता, हे आपल्याला फारच मोठं वाटतं. म्हणजे ही गोष्ट हेवा करण्यासारखी नाही का सुलू? दादा आमचे पिताजी होते हे आम्हांला कालच पहिल्यांदा कळलं!

बाजीराव : बापरे! हे वाक्य भयंकर विनोदी केलेलं आहे. दादांना काय वाटेल? दादा तुमचे पिताजी होते हे तुम्हांला प्रथमच काल कळलं असं नव्हे वसंतराव! काल तुम्हांला ते तुमचे पिताजी असल्याबद्दलचा अभिमान वाटला! दादा! माणूस मरून त्याच्यामागं कायकाय बोललं जाईल ते प्रत्यक्ष परमेश्वरच सांगू शकेल. कारण तो अजून मेलेला नाही.

[दारावर एक तरुण कॉलेजविद्यार्थी भयंकर गोंधळून उभा आहे. एंट्री घ्यावी की घेऊ नये की घ्यावी या विचारात वाहत जाऊन हाती असलेला बाजा तो ओठांशी नेतो. बाजातून एकदोन सूर निघतात.]

सुलभा : विठ्ठल, ये ना आत!

[वसंत आसनावर नीट बसतो. कुठचा हात उचलून त्याला आत बोलवावा या विचारात तो दोन्ही हातांनी त्याला आत बोलावतो.]

बाजीराव : विठ्ठला! तुझ्या देहास या नाटकात विठ्ठल अशी संज्ञा आहे.

तुझ्या तोंडी जे काही शब्द असतील ते तू तुझ्या सर्व शक्ती पणास लावून साजरे कर!

[विठ्ठल भीत भीत आत येतो.]

सुलभा : बाजा का थांबवलास?

विठ्ठल : खरंच...रिअली...हे आपल्याला नाही जमत. हे...हे...नाही जमत आपल्याला. मात्र दुःख झालंय. ते होतंच. म्हणजे माणसाच्या नर्व्हजवर परिणाम होतो. आपल्याला नर्व्हज आहेत हेही एकंदरीत बरंच आहे...दुःख झालंय. हा दिवाणखाना कसा तरीच दिसतोय.

बाजीराव : रंग ओला आहे. हात लावू नका!

विठ्ठल : रंग ओला आहे? (गौरी डोळा घालते.) हां हां. (भाषण विसरतो.) हे एकंदरीत कसंतरीच. आपल्याला... हे...हे जमत नाही.

बाजीराव : प्रॉम्प्टर—

सुलभा : (चटकन) विठ्ठल! तू बैस ना खाली. सगळ्यांनाच कुठं रडता येतं? (त्याच्या खिशाला एक गुलाबाचे फूल लावते.)

विठ्ठल : आऽहाऽऽ! हा फुलंबिलं आहेत म्हणून बरं आहे.

सुलभा : तू आलास म्हणून बरं झालं. दोन दिवस एखाद्या पावसाळी ढगासारखी होऊन गेले होते. त्यातून बाहेर पडायचंय मला.

बाजीराव : ढगातून, ओल्या निळसर ढगातून उतरलेली उन्हं काय सोनेरी दिसतात. वा! (गौरीकडे पाहतो.)

सुलभा : (दुर्लक्ष करून) दादा मला नेहमी व्हायोलिन वाजवायला सांगायचे. दादांचं काय व्हायचं माहीत आहे? माझं व्हायोलिन ऐकून ते खळखळा हसायचे. ते म्हणायचे, चांगलं काही ऐकलं म्हणजे मनाचा एकदम गिरसप्पा होऊन जातो. अजून ते हास्य ऐकू येतंय मला. तो धबधबा, ते सूर, ते हास्य...दादा! (एकदम विषण्ण.)

विठ्ठल : सुलू, तुझा नूर पुन्हा गेला हं! अशा वेळी आपल्याला अवघडायला होतं. खरंच...रिअली...हे—हे आपल्याला जमतच नाही.

(तोंडात बाजा घेतो.)

**सुलभा** : नाहीय, मलासुद्धा जमत नाहीय. पण मी फार आवडायची त्यांना! तुला खोटं वाटेल—हसशीलसुद्धा तू मला!—अजून ते चॉकलेट आणून द्यायचे, हलकेच माझ्या तोंडात ठेवायचे. पण जाऊ देत ते.

[सुलभा मान खाली घालून उभी. विठ्ठल अस्वस्थ. इकडून तिकडे येरझारे घालतो. बाजीराव त्याला बाजा वाजवण्याची खूण करतो. विठ्ठल मग जोरजोराने वाट्टेल तसा बाजा वाजवतो.]

**वसंत** : (विलक्षण संतापून) विठ्ठल! विठ्ठल! (पाहतो बाजीरावाकडे.) आता मात्र कळस झाला. समोरचे लोक थुंकतील आमच्यावर. हे काय मरणाचं नाटक चाललंय! आता लोक यायला लागतील; हा तमाशा दिसेल त्यांना. हे त्यांना दिसता कामा नये.

**विठ्ठल** : नाही. (वाजा बंद.) मी काय करू सांगा! ब्रेनवर प्रेशर यायला लागलंय. मला यात तसं काही कळत नाही—आमच्यावर हा प्रसंगच आलेला नाही. गर्दीबिर्दीतून तसं एखादं प्रेतबीत जायला लागलं तर आपल्याला वाईट वाटतं. पण वाईटच वाटतं असंही नव्हे. पण ते बरंही वाटत नाही. मग मी चारमिनार आणि चक्क मसाल्याचं पान तोंडात ठेवून पोरीबिरींची तोंडं पाहत भटक भटक भटकतो. नाही तर हा बाजा आहेच. हे आमचं हे असं! तर सुलूचं काही वेगळंच.

**सुलभा** : विठ्ठल, नुसा विठोबाच आहेस तू अजून! अजून तुला नीट बोलायलाही येत नाही. चल बघू वर. उगीचच दादाला वैताग आणू नकोस!

**विठ्ठल** : उगीचच ही माणसं मरूनबिरून जातात आणि आमच्या नर्व्हजवर—

**सुलभा** : चल म्हणते ना वर!

**बाजीराव** : पांडुरंग, पांडुरंग! विठ्ला, हे दुःखाबिख्खाचं प्रकरण तुमचं नव्हे. तुम्ही जा आपले वर! पण वर जाऊन पुढचे संवादविवाद डोळ्याखाली घालाबिला! तुम्ही तरुण आहात. अभ्यास करावा. दुःखाबिख्खाचं आम्ही पाहतो. ते करतोसवरतो. तुमचं तर परवाच बारसं झालं. इथून

मला आईनं परवापरवाच लावलेली बाळाच्या गालावरची तीट दिसते आहे. तुम्ही आणखीन पाचपंचवीस पावसाळे घालवले की तुमच्या गालावरची तीट धुऊन निघेल!

[विठ्ठल गालांवर हलकेच हात नेऊन पाहतो. गौरी त्याचा हात पटकन बाजूला करते.]

**सुलभा** : चल, वर चल बघू! आमच्या दादाची माणसं आता यायला लागतील.

[खालून एक मुलगी येऊन दारावर उभी. सुलभाच्या कॉलेजमधील एक मैत्रीण. हे काम प्रभाने केलेले असून ती भेदरलेली आहे.]

**बाजीराव** : ये. हे नाटक तुझं घरच आहे ग वेली. तुझा वेलविस्तार वाढो! तुझ्या तोंडी जी काही वाक्यं असतील ती पानीफुली येवोत! मी तुझ्यासाठी रंगदेवतेची प्रार्थना करतो. तूही नवस कर! तिची खणानारळांनी ओटी भर! पाच वातींचा दिवा लाव! पाच घरं जोगवा माग होऽऽ वेलीऽऽ

**सुलभा** : मालती, ये! ये ना आत!

[मालती आत येते आणि भाषण विसरते.]

**बाजीराव** : प्रॉम्प्टर—प्लीज बी रेडी!

[प्रेक्षकांतून 'नाटक पंक्चर!' अशी आरोळी. प्रभा अधिकच गोंधळून गौरीपाशी जाऊन उभी राहते.]

**प्रेक्षकांतून आवाज** : नाटक पंक्चर!

[गौरी प्रभाला 'बोल, बोल' म्हणून खुणा करते.]

**प्रेक्षकांतून आवाज** : नाटक पंक्चर!

**बाजीराव** : हवा गेल्यावर आता मूकनाट्य सुरू होत आहे.

**मालती** : (नुसतेच तोंड हलत राहते.)

**प्रेक्षक** : ऐकू येत नाही. ही काय थट्टा? आम्ही पैसे दिलेत!

**आप्पाराव** : (उठून पुढे येतात.) गप राहा रे! बावरलीय ती! तोळामासा

जीव तिचा. बैस ग, बैस. आठवून सावकाश भाषण म्हण हं!

**मालती :** (घाबरून बसते.) हो. कालच येणार होत्ये. कालच येणार होत्ये. कालच येणार होत्ये...कालच...

**बाजीराव :** वेलीबाई, काय हे? तीच तीच वाक्यं पुन्हापुन्हा म्हणताय. सुलभाताई आणि विठ्ठलराव, या आमच्या वेलीबाईला तुमच्याबरोबर वर न्या. (त्यांच्याबरोबर वर निघालेल्या प्रभाला) वेली ग वेली! तुझी पानं तू सांभाळ. तुझा विस्तार तू सांभाळ. डोकीवरून पदर घे! पानी-फुली डवरून ये.

[प्रभा, सुलभा आणि विठ्ठल वर जातात. बाजीराव येऊन एका खुर्चीवर बसतो.]

**वसंत :** (जिन्याच्या दिशेने) सख्याऽ, सख्याऽऽ

**सख्या :** (वरून) आलो, आलो.

[सख्या मिश्या सावरीत खाली येतो.]

**सख्या :** काय मालक?

**वसंत :** काय म्हणतोस?

**सख्या :** तुम्हीच हाक मारलीत नव्हे?

**वसंत :** वा वा! हाकेसरशी आलास? होतास कुठं इतका वेळ?

**बाजीराव :** पुढचे संवाद डोळ्याखाली घालीत होता.

[लोक हसतात.]

शोकनाट्यातला शब्दन् शब्द खड्यासारखा प्रेक्षकांना लागून त्यांच्या डोळ्यांतून घळाघळा पाणी निघालंच पाहिजे!

**सख्या :** (मोठ्या कष्टाने) वर होतो वर, तिकडे वर!

**बाजीराव :** मग आता खाली या!

[लोक हसतात.]

**सख्या :** मालक—

[मिशी सावरतो. मग नाटकाच्या मूडमध्ये येण्याचा प्रयत्न करतो.]

**वसंत :** जा, वरून साताठ खुर्च्या घेऊन ये!

सख्या : त्या कशासाठी मालक ?

वसंत : सख्या, सख्या, तुला काहीच कसं कळत नाही ? सख्या, तुझ्यापुढं हद्द झाली !

सख्या : म्हणजे काय झालं मालक ?

वसंत : अरे, आमचे बाप इथं मरून पडले असताना, तू चक्क नाक वर करून काय झालं म्हणून विचारतोस ?

[सख्या इकडेतिकडे पाहतो.]

वसंत : काय पाहतोस ?

सख्या : काही नाही, काही नाही.

बाजीराव : मरून पडलेले बाप.

[लोक हसतात.]

अरे स्पष्ट सांग तसं ! त्यात लाज कसली ?

सख्या : पण त्यासाठी...(पटकन तोल सावरून) नव्हे, आपलं...मालक, खुर्च्या कशासाठी ?

वसंत : अरे, काल किती लोक आले ?

बाजीराव : (उठून पुकारतो) शोकप्रदर्शन, एक आणा—शोकप्रदर्शन एकेक आणा. वेळ सकाळी आठ ते संध्याकाळी सहा. नंतर ईव्हिनिंग वॉक घ्यायला लोक मोकळे...(बसतो.)

वसंत : (हसू शिकस्तीने आवरून) जा, जा लौकर !

सख्या : खुर्च्या सातच आणायच्या का ?

वसंत : हो. सातच आण—किंवा आठही चालतील.

सख्या : (जायला निघालेला मागे परतून) मालक, मी तुम्हांला काही विचारायला आलो होतो का ?

वसंत : नाही, मी तुला बोलावलं म्हणून तू आलास.

सख्या : (पटकन आठवून) हां. रावसाहेब गेले.

वसंत : ती गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्वच्छ आहे.

सख्या : रावसाहेब गेल्यापासून आपल्याला काहीसुद्धा सुचत नाय. असे मालक! असे रावसाहेब! असे...असे...असे...आपले न्या—न्या—न्यायमूर्ती पुन्हा होणार नाहीत! काम करा, करू नका! रावसाहेब कधी शब्दानंही बोलले नाहीत. (मिशी सावरीत) रावसाहेब शांत!

बाजीराव : याची मिशी अधूनमधून जमिनीवर पडली तर प्रत्यक्ष राव-साहेब न्यायमूर्ती मालक ती उचलून याच्या हाती द्यायचे. असे मालक दुर्मिळ.

[लोक हसायला पाहतात. पण आप्पाराव घसा साफ केल्याचा आवाज काढतो. लोक गप्प.]

सख्या : (रागावल्याचे दिसत आहे, पण राग आवरून) मालक!

वसंत : (बाजीरावाकडे पाहून) रावसाहेबांबरोबर आम्ही मेलो असतो तर बरं झालं असतं. (सख्याकडे पाहून) सख्या / आता तू वर जाऊन यथाशक्ती खुर्च्या आणशी.

[सख्या बाजीरावाकडे पाहत पाहत मिशी सावरीत सावरीत जातो.]

बाजीराव : (आसनावर बसलेल्या वसंतकडे पाहून) वसंतराव—

वसंत : काय?

बाजीराव : मी म्हणतो, तुम्ही तालीम घ्या!

वसंत : ती तर घेतलेलीच आहे.

बाजीराव : म्हणजे तालीम म्हणतोय मी. असा वेळ फुकट घालवणं बरं नव्हे. आमचे एक जुन्या जमान्यातले प्रख्यात देशभक्त नट असा स्टेजवर वेळ मोकळा सापडला की सूत कातीत बसायचे. आता तुम्हांलाही ते करायला हरकत नाही. पण तुम्ही फक्त तालीमच घेणं बरं.

वसंत : होय, होय. तालीमच घेणं बरं!

बाजीराव : म्हणजे काय होईल माहीत आहे? इथं येणाऱ्याशी कसं बोलावं हे आपल्याला उत्तम तऱ्हेनं कळेल!

वसंत : प्रसंग गंभीर आहे!

बाजीराव : निदान—निदान इतकं कळलं तरी ठीक.

सख्या : (एक घडीची खुर्ची घेऊन खाली येतो.) मालक, एक विचारू? (मिश्या सावरतो.)

वसंत : एकच विचार. दोन अथवा तीन किंवा त्याहून अधिक काही विचारू नकोस!

सख्या : आपल्याला मी कोणत्या नावानं हाका मारू!

वसंत : (बाजीरावाकडे पाहत) मलाच कुणाच्यातरी नावानं हाका माराव्याशा वाटताहेत.

सख्या : मालक, मालक, सांगा—सांगा, मी आपल्याला कोणत्या नावानं हाका मारू?

वसंत : पसंत असल्यास तू मला मालकच म्हणत जा!

सख्या : मालक! मालक! मालक! (सख्या येरझारे घालतो.)

बाजीराव : मालक.

सख्या : मालक.

बाजीराव : मालक.

सख्या : मालक.

वसंत : सख्या, हा थिल्लरपणा पुरे. सख्या, ती खुर्ची घडीची आहे ती उचलून ठेव.

सख्या : मालक, ही खुर्ची मी कुठं ठेवू? त्या तिकडे ठेवू? की या इकडे ठेवू? ही खुर्ची त्या तिकडच्या कोचांची जागा बदलून तिकडे ठेवू? की ते कोच त्या इकडे ठेवू? आणि मगच ही खुर्ची तिकडे ठेवू?

बाजीराव : इकडे *तिकडे चोहिकडे*

*आनंदी आनंद गडे...*

[लोक हसतात. सख्याही हसतो.]

वसंत : (भान जाऊन ओरडतो.) सख्या—सख्या—सख्या ऽऽऽ

[सख्या तटस्थ होऊन पाहतच राहतो.]

सख्या : सख्या...

वसंत : (भानावर येत) प्रत्येक गोष्ट इतक्या विचारानं करशील/तर आयुष्य-भर ही खुर्चीच घेऊन उभा राहशील!

बाजीराव : सख्या, ती खुर्ची उघड, त्यावर बैस आणि मगच काय तो विचार कर!

वसंत : सख्या, ती खुर्ची त्या तिथं उघडून ठेव|आणि मग-[illegible]स दुसरी आणायला जा! आणि आयतेच परमेश्वरानं दोन हात दिलेत अनायासे, तर दोन्ही हातांतून दोन खुर्च्या आण!

[सख्या खुर्ची ठेवून वर जातो.]

वसंत : हा सख्या म्हणजे नुस्ताच मठ्ठ आहे. बाकी या दुःख, शोक वगैरे गोष्टींत आमचाच मुडदा पडण्याची वेळ आली आहे.

बाजीराव : म्हणूनच कुणी आपल्या वडिलांचे ज्येष्ठ चिरंजीव होऊ नये.

वसंत : अगदी नाटकातही.

बाजीराव : वसंतराव, त्याहून तुम्ही माझ्याशी गप्पा मारल्यास कसं? माझाही त्या तारेवर उभं राहून मघापासून अगदी कावळा होऊन गेला आहे.

वसंत : मग तो हाकलण्यासाठी आपण त्या काठीचा का बरं उपयोग करीत नाही? आपण मागं एकदा म्हणाला होता की काठीचा आणि तुमचा काहीतरी संबंध आहे म्हणून.

बाजीराव : गप्पांस विषय उत्तम. सांगतो. मंडळी, ऐका बरं!

प्रेक्षक : सांगा सांगा!

बाजीराव : (विंगेकडे पाहून) प्रॉम्प्टर, ॲक्टरमंडळीस एंट्र्या आमच्या गप्पांनंतर घ्यायला सांग! तर वसंतराव आणि प्रेक्षक मंडळी, आपण गप्पा मारू! तर ही काठी आणि आम्ही यांचा अगदीच काही यथा काष्ठं च काष्ठं च संबंध आहे असं समजू नका! तसा आमचा संबंध फार पूर्वीचा. या गोष्टीला म्हणजे या काठीला फार मोठा इतिहास आहे. वारसाहक्कानं ही आमची काठी आणि ही आमची शरीरयष्टी आमच्या

वाडवडिलांकडून आमच्याकडे आली. कुण्या एका थोर महंतानं ही काठी आमच्या पणजोबांस दिली. ही काठी म्हणजे काही किरकोळ गोष्ट नाही. चांगली घराणेदार चीज आहे. आम्ही हिचा सांभाळ करायला हवा. अशा काठ्यांचाच आजवर आम्ही सांभाळ करीत आलोत. आम्ही हिचा सांभाळ करणार. इतिहास वगैरे गोष्टी फालतू म्हणोन सोडून देऊ. कसं?

**वसंत** : तसंच. पण त्या गोष्टी विसरून काय होणार आहे?

**बाजीराव** : खूप होणार आहे. मी माझ्या पायांखालील तार आणि झालेली दोन महायुद्धं, शेकडो होऊ घातलेली महायुद्धं विसरून जाईन. इतिहास विसरा, काठी सांभाळा, "म्हणजे सर्व ठीक होईल." असं या काठीचे मालक सांगून गेलेत. तर असो. वसंतराव, तुम्ही गरज लागली की राग, लोभ, द्वेष, स्वार्थ बाजूला ठेवून मला विश्वात्मक भावानं हाक मारा. मी तिथं त्या तारेवर उभा आहे.

[बाजीराव खिडकीत जाऊन उभा राहतो. वसंत त्यांच्याकडे हसत हसत पाहत उभा.]

**सख्या** : मालक!

[वसंत दचकून त्याच्याकडे पाहतो.]

मालक, आपण मला किती खुर्च्या—आपण मला किती खुर्च्या आणायला सांगितल्यात?

**वसंत** : (अत्यंत गंभीरपणे) दोऽऽन.

**सख्या** : मालक, काय म्हणालात?

**वसंत** : रिकामाच आलास?

**सख्या** : (जायला लागतो. पण मागे येऊन) होय. खरं बोलावं असं रावसाहेब सांगून गेलेत. .काम वाटल्यास करू नका, पण खरं बोला. मी पान खात आणि ताईसाहेबांचं आणि विठ्ठलरावांचं वाजा-व्हायोलीनचं म्युजीक ऐकत उभा व्हायलो. (नम्रपणे उभा. हुंदका देतो.)

वसंत : हा केवळ खरं बोलण्यासाठी आमच्या पिताजींच्या घरगडी म्हणून राहिला. पण अजून सांत्वनासाठी कुणीच कसं येत नाही? केवळ या रिकाम्या खुर्च्यांवरच भागणार का?

बाजीराव : ओहोऽऽ (खाली पाहत) हा या अफाट नगरीचा मेन रोड. काय पण हा रस्ता अगदी सरळ निघाला आहे! हा तर अगदी राजरस्ताच जसा काही वर्षांपासून नाकासमोर निघालाय!

सख्या : (न्यायाधीशांच्या खुर्चीकडे जाऊन) रावसाहेबांचं कर्तृत्वच तसं. काय सांगू मालक! त्या तिकडच्या खुर्चीवर बसून लांब कुठंतरी पाहत असायचे. कसला विचार करायचे कोण जाणे! रावसाहेब! रावसाहेब! (खुर्चीकडे बसून खुर्चीचे पाय धरतो. ओक्साबोक्सी रडतो. सुटलेल्या मिश्या बसवतो. वसंताला हसू येत आहे. हसू दाबून तो सख्यापाशी येतो. सख्या उठतो.) रावसाहेब, अजूनही आपण या खुर्चीतच बसलाहात काय हो? (घसरणारी मिशी घट्ट पकडून) मला अजूनही दिसताहेत ते.

वसंत : सख्या, कळलं रे, तुझं दुःख कळलं मला. (मान खाली घालतो. हसू दाबून) आम्हांला मोठ्यानं रडणंही शोभणार नाही. नाही तर आम्ही छाती फोडून मग हंबरडाही फोडला असता.

बाजीराव : दुःख करावं तर असं—या सख्याच्या अश्रूंबरोबर याच्या मिश्याही गळत होत्या.

[लोकांच्या टाळ्या. सख्या खूष.]

वसंत : सख्या, आता जा वर! पण काय रे, आमच्या मातोश्री काय म्हणतात?

सख्या : आईसाहेब बापड्या बसून आहेत. हांऽऽ मृत्युपत्राचं काही विचारीत होत्या.

वसंत : कुणाच्या?

सख्या : रावसाहेबांच्या. मी म्हटलं, आता कसलं येतं त्यांचं पत्र! पण त्या बापड्या जुन्या वळणाच्या. त्या आपल्या पत्राची वाट पाहताहेत.

**वसंत** : डोंबल तुझं. जा आता.

[सख्या जातो.]

**बाजीराव** : (खाली वाकून) म्हणजे या रस्त्यावर रहदारीसुद्धा सुरू आहे. काय पण लोक दिसताहेत इथून. प्रत्येक माणसाच्या डोक्याला स्वतःचा असा एक आकार आहे. व्यक्तीला डोकं असतं की नाही कोण जाणे, पण डोक्याला मात्र व्यक्तित्व असतं हे आपल्याला आजच कळलं. वा, वा! हे तरुण जोडपं फिरायला निघालंय. फिरा फिरा, जोडीनं फिरा. त्यानं तिच्या भालावर आलेली बट हलकेच बाजूला केली. छान! (काठी तारेवर आपटल्याचा अभिनय.) एऽऽ भिकारी, काय म्हणालास? नया पैसा हवाय एक? थांब, थांब! (वर पाहून) वसंतराव, एक नया पैसा असला तर द्या बुवा. एकच फक्त नया पैसा. खाली एक भिकारी थांबलाय. (खाली पाहून) एऽऽ एऽऽ, थांब. तिथंच थांब. (वसंतला) वसंतराव, नया पैसा!

**वसंत** : (खिसे चाचपून नकार देतो.) सॉरी.

**बाजीराव** : (खाली वाकून) एऽऽ रस्त्यावरील गृहस्था! एऽऽ भिकारी! भिकारी असलास म्हणून काय झालं? तूही गृहस्थच आहेस. समजलं ना? पण ते तू विसरला आहेस. हे बघ! रस्त्याच्या मधोमध का उभा राहिला आहेस? रस्त्याच्या कडेला उभा राहा! कायदा गाढव असला तरी तो आपण पाळावा. कारण गाढव पाळणं तू भिकारी असल्यामुळं तुला आर्थिक दृष्ट्या झेपणारं नव्हे. काही पथ्यं पाळणं भाग आहे. हा वाडासुद्धा बघ आपल्या बापाचं सुतक पाळतोय.

[वसंत मजेने हसत त्याच्याकडे पाहत असतो. वसंताकडे पाहून]

वसंतराव, पाळा पाळा, सुतक पाळा.

[वसंत दचकतो. मुद्रा गंभीर करून, शोकमग्न पवित्रा घेऊन बसतो.]

**बाजीराव** : ही पाहा एका वृद्धाची महायात्रा चाललीय. टाटा, जीवेत शरदः शतम्! वसंतराव, उभे राहा. मृताचा सन्मान करावा आपण.

[वसंत चटकन उभा राहतो. पण मग लक्षात येऊन बसतो. सख्या खाली येतो.]

सख्या : आपण मला खुर्च्या आणायला सांगितल्या हे ठीक. पण दुसरं काय?

वसंत : डोंबल तुझं.

सख्या : म्हणजे दोन खुर्च्या. (जायला लागतो.)

आप्पाराव : (प्रेक्षकांच्या पहिल्या रांगेतून) नोकरांना कसं नोकरासारखं वागवायला पाहिजेलाय. दोन लाथा घाल त्याच्या कंबरड्यात आणि दे हाकलून त्याला. आमच्याकडे असा एखादा नोकर असता, तर आम्ही त्याला खतासारखा वापरला असता.

[प्रेक्षकांतून एक हास्याची लाट.]

बाजीराव : सागराला नुक्तीनुक्ती भरती येत आहे. नुक्तीच एक लाट किनाऱ्यावर येऊन आदळली. सागराचा नदीला काही निरोप तर नसावा ना?

[वसंत उठून भीत भीत सख्याच्या मागे जाऊन उभा राहतो. नाटककार, गौरी वगैरे पात्रे विंगेत येऊन उभी राहतात.]

आप्पाराव : त्या फडतूस इसमाची मघापासून न कळणारी वटवट सुरू आहे. त्यालाही गचांडी मारून वेडापार करायला हवं. उलट्या खोबडीचा आणि किळसवाण्या तोंडाचा हा इसम काय वाट्टेल ते भकतोय. ए, आमच्या वाड्यावर ये. व्हाणेखाली काला करतो तुझा. तो नोकरसुद्धा पाहा कसा पाहतोय चोर!

[सख्या अस्तन्या वर करून मिशीकडे हात नेतो.]

बाजीराव : सख्या, मिश्यांना पीळ देऊ नकोस. मोह टाळावा.

सख्या : (मिश्यांवरून चटकन हात खाली घेतो.) आपलं डोकं भडक हाय, सांगून ठेवतो! इथून उडी घेईन. तालमीत होतो मीसुद्धा...हां ऽऽ (गुरगुरतो.)

आप्पाराव : (मोठ्यानं हसतो.) हे बघ, हे काय आहे रे? बार भरलेला आहे.

[सख्याला वसंत मागे खेचतो.]

हा गाव आमचा आहे.

[सख्या, वसंत निघून जातात.]

बाजीराव : तो एक देवमासा आहे. समस्त प्रेक्षक हो! हा एक तारेवरील शून्य बाजीराव दोन्ही कर जोडोन प्रार्थना करतो, की हा तुम्हांला गिळून टाकील.

आप्पाराव : त्या हलकट माणसाला गोळी घालायला हवी.

बाजीराव : गोळी घालणं ही फार क्षुल्लक गोष्ट आहे. मला माहीत आहे, आपण गोळी झाडू शकत नाही. आपण त्या गोळीहून शतपटीनं मोठे आहात. मला अगदी मनापासून वाटतं की, आपण निदान—निदान आपल्या मोठेपणाला साजेल असं काहीतरी झाडा! आपण लाथा झाडल्यास योग्य होईल. माणसानं लाथा झाडण्याच्या बाबतीत तरी स्वतःच्या पायांवर उभं राहावं. निदान मोठ्या माणसांनी तरी!

आप्पाराव : अरे हरामखोरा! (बंदूक उचलतो.)

(दंडवते येऊन बंदुकीसमोर हात जोडून उभा राहतो.)

दंडवते : मी दंडवते बोलतोय.

आप्पाराव : गप्प व्हा रे दंडवत्या!

दंडवते : (नम्रपणे) माझी एक विनंती आहे! आप्पाराव, आपण नाटकातल्या पात्रावर काय बंदूक रोखताय?

बाजीराव : मग काय घरातल्या आरशावर बंदूक रोखायची?

प्रेक्षक : आप्पाराव, ओढा चाप, घाला गोळी! अरे, आहे काय? होऊन जाऊ दे—उडवा त्याला आप्पाराव!

दंडवते : आप्पाराव, नको नको. जीवनात माणसानं अविचारानं वागू नये. कृपा करा! त्यालाही जगण्याचा हक्क आहे. आपण सारी प्रभूची लेकरं. हे दोरीच्या सापाला मारण्यासारखं आहे.

बाजीराव : दोरीच्या सापात आणि खऱ्या सापात हाच फरक आहे. खरा साप मरतो आणि दोरीचा साप मरत नाही. आम्ही अमर आहोत. खरे साप मेलेले आहेत.

आप्पाराव : (डरकाळी फोडून) एवढा उद्दामपणा!

प्रेक्षक : पेटवा, बंदूक पेटवा बंदूक—होऊन जाऊ दे आप्पाराव!

दंडवते : नको, नको आप्पाराव! लोकांचं मनोरंजन करणाऱ्या एका नटाची नाहक हत्या करू नका! मी पाया पडतो तुमच्या!

बाजीराव : हा एक गोजिरवाणा, लहानगेला, शाकाहारी मासा! हा एखाद्या कुमारिकेच्या गर्भाशयाहून अजाण आहे. एक मंजूळ बापडा बुडबुडा! बा इवल्या माशा! तू हे मंजूळ, मंजूळ बुडबुडे का म्हणून सोडीत आहेस? असं वाटतं की तुला हलकेच उचलून तळहातावर घ्यावा!

दंडवते : मी शाकाहारी आहे, पण म्हणजे मी मासा नव्हे!

प्रेक्षक : बाजीरावावर गोळी झाडा! गोळीऽऽ

पोरसवदा आवाज : अय्या, भलतंच मजेदार.

बाजीराव : आप्पारावांनी या किनखाबी शब्दांखातर तरी गोळी झाडावी. (स्वतःच्या छातीवर हात टेवून) हे माझं हृदय म्हणजे उंटाच्या पोटातील पाण्याच्या पिशवीसारखं आहे. आप्पारावांनी गोळी झाडली तर या समुद्रातील माशांची तहान तरी भागेल.

*समुद्री चहुकडे पाणी*
*पिण्याला थेंबही नाही.*

प्रेक्षक : होऊ देत आप्पाराव, उडवा बार.

दंडवते : हे बरं नव्हे—हे बरं नव्हे! हे विघातक आहे—विघातक...हे बरं नव्हे.

[भयंकर गडबड होते.]

**आप्पाराव :** एऽऽ बुडबुडे सोडणाऱ्या माशा, जा. तू जा. (बाजीरावाकडे पाहून) एऽऽ बुडबुडा, नाटक सुरू होऊ दे. गप्प व्हा रे—(गावकऱ्यां-उद्देशून) गप्प व्हा म्हणतो ना!

[लोक हळूहळू गप्प होतात.]

**पोरसवदा आवाज :** मेलं सगळंच बंडल!

[बाजीराव खिडकीत जाऊन उभा राहतो. वरून व्हायोलिन-बाजाचा आवाज.]

**वसंत :** वाजवा, वाजवा. (माडीवरच्या व्हायोलिन-बाजास उद्देशून) व्हायोलिन वाजवा. बाजे वाजवा. नगारे, ढोल वाजवा. तुतारी फुंका. फुंका, फुंका—या वाड्यावर तुताऱ्या फुंका! हसा, गाणी गा. नाचा, तमाशा करा! विडा शृंगारा. उदबत्त्या, धूप घाला. अत्तरांचे दिवे जाळा. पितार्जीचं सुतक अगदी मनसोक्त मजा करून पाळा. आमचे पिताजी मरून अवघे दोन दिवस म्हणजे फक्त अठ्ठेचाळीस तास झाले नाहीत तोच हा त्यांच्या मृत्यूचा आनंदसोहळा! जशी काय आम्ही त्यांच्या मरणाची वाटच पाहत होतो. जन्मदात्याचं सुतक पाळतोय आम्ही!

[मान खाली घालतो. गडबडीने जाऊन आसनावर बसतो. हात खालीवर घडी करून ठेवतो. मान खालीच.

सहस्रबुद्धे अत्यंत जडपणे येऊन एका खुर्चीवर टेकतात. दोनतीन सेकंद स्तब्धता.]

**सहस्रबुद्धे :** वसंतराव, आम्ही आजवर हे अनुभव घेतले. म्हातारे झालो. पर्णवत पिकलो. तृणवत आयुष्याचा अनुभव घेऊन या मूर्खांच्या जगात वावरलो. वसंतराव, सांगायची गोष्ट म्हणजे काऽही खरं नसतं. उगीचच, व्यर्थ बरं का हे—व्यर्थ! होणारच. दुःख होणारच. पण दुःख करीत बसण्यात कालाचा अपव्यय आहे. नियतीचं सूत्र महाकठीण. पण आप्तजनांना दुःख होणारच. माझं ऐका वसंतराव. रावसाहेब न्यायमूर्ती हे प्रत्यक्ष थोर पुरुष. म्हणजे विभूती म्हणतात ती अशाच व्यक्तींना बरं का. तर त्यांना म्हणूनच

हे अलभ्य मरण आलं. अहो, आहात कुठं? शंभर नंबरी.

वसंत : (हळूच) काऽय?

सहस्रबुद्धे : अहो, शंभर नंबरी सुवर्ण झालं त्यांचं, सुवर्ण! असा माणूस विरळा बरं का, विरळा. नाही तर आम्ही! पिकलो ते पान म्हणवून घेण्यासाठी. एवढं आयुष्य लोटलं, आणि अखेर आम्ही तुमानी घालणाऱ्या पुतण्यांचे काका झालो! याहून आयुष्यात आम्हांला श्रेष्ठ पदवी मिळाली नाही. तर सांगायची गोष्ट म्हणजे, त्यांचं महाफळ ईश्वरानं त्यांच्या पदरी टाकलं. त्यांना उत्तम मरण आलं. आता मौन सोडून द्या पाहू. मी सांगायला पाहिजे असं नाही. आपण सुज्ञ आहात. न्यायमूर्तींचे प्रत्यक्ष चिरंजीव आपण. मी एक सामान्य माणूस. संस्कृत विषय शिकवण्यातच संपलो आम्ही. रावसाहेब व मी सहाध्यायी म्हणून त्यांचा आमचा घरोबा. नाही तर हा वाडा आम्ही रस्त्यातूनच येता-जाताच पाहिला असता.

वसंत : काका, पण त्यांच्या आठवणी विसरता येणं कठीण आहे.

[वरून व्हायोलिनचे सूर, मध्येच वाजा.]

सहस्रबुद्धे : (तिकडे दृष्टिक्षेप टाकून) बर त्या तिकडे काही गाण्याबजावण्याचे प्रकार—म्हणजे त्यात आमच्या विठोबाचाही वाजा वाजतोय.

वसंत : (शरमल्यासारखा वर पाहतो.) आमची सुलूसुद्धा आहेच.

सहस्रबुद्धे : असली म्हणून आमची त्याला काही हरकत नाही. पण हे मात्र—पण सुलभा न्यायमूर्तींचं मोठ्या आवडीचं कन्यारत्न. अहो, एकदा प्रत्यक्ष मी त्यांच्या मोटारीत होतो—तसे ते कधी कधी आम्ही रस्त्यात दिसलो की पायी चालायला द्यायचे नाहीत—तर सांगायचं काय, वाटेत त्यांनी आपल्या ड्रायव्हरला मोटार उभी करायला सांगितली. मला मोठंच आश्चर्य वाटलं. न्यायमूर्ती रस्त्यात उतरले. स्वतःच्या पायांनी एका दुकानात गेले आणि कसलीशी वस्तू कागदात बांधून त्यांनी पुन्हा मोटारीकडे पावलं वळवली. काय म्हणून आम्ही सहज

नेत्रपल्लवी केली तर म्हणाले, "चॉकलेट्स". आमच्या तोंडाचा आ वासलेला पाहताच म्हणाले, "सुलूसाठी! अजून ती लहानच वाटते आम्हांला!" तर सांगायचं काय, तर हे जे काही त्यांचं तिच्यावर पितृवात्सल्य होतं ते म्हणजे आश्चर्यवत...

सख्या : (येऊन) काय मालक?

सहस्रबुद्धे : वसंतराव! तो आलाय बघा. (तोंडाचा चंबू करून आत हवा घेतात.)

वसंत : (भानावर येत) हो, अरे सख्या, वरच्यांना म्हणावं...त्यांना म्हणावं, खाली सहस्रबुद्धेकाका आलेत.

सहस्रबुद्धे : छे, छे! नको, नको. सुलभा हसतेय तेच ऐकून आम्हांला मोठा आनंद झाला. नको, नको. त्यांचं चालू देत. अहो, ती लहान मुलं... आमचा हा विठ्ठल आणि सुलू, यांचं कुठं काय जुळलं बघा. नवी पिढी आहे, चालणारच. तर सांगायचं काय, हा विषय मी एकदा न्यायमूर्तींकडे सहज असा द्राविडी प्राणायामाच्या वळणानं काढला. न्यायमूर्तींना मोठाच संतोष वाटला. खुशीत असले म्हणजे पटकन मिटकी मारण्याची त्यांना सवई. तर एक मिटकी मारून ते म्हणाले, "वाऽऽ! सुलूनं हे आम्हांस सांगितलं नाही!" मग ते डुलतच राहिले पाहा. आम्ही हा विषय आज इथं काढू नये, पण या प्रसंगी असले प्रसंग आठवतातच.

वसंत : आठवणारच! पुढं—

सहस्रबुद्धे : तर रावसाहेब बोलून गेले, "सुलभाच्या नावावर वीस हजार रुपये ठेवलेत मी. तिला फुलासारखी सांभाळा." खरोखरच श्रेष्ठ पुरुष!

वसंत : वीस हजार?

सख्या : वीस हजार?

सहस्रबुद्धे : हां. हां. वीस हजार! म्हणजे रावसाहेबांचं केवढं वात्सल्य म्हणतो मी हे!

बाजीराव : वात्सल्य! वीस हजार वात्सल्य. रुपये रावसाहेब. तमाम लोकहो, ऐका, वीस हजार वात्सल्य!

सख्या : माफ करा...पण इथं जे काही रावसाहेब आपल्याशी बोलले तेव्हा मी तिकडच्या कोपऱ्यात होतो.

वसंत : काय बोलले?

सख्या : रावसाहेब या—या काकांना म्हणाले—

सहस्रबुद्धे : अहो, ही क्षुद्र जातीची, कनिष्ठ दर्जाची माणसं. यांचं काय ऐकता—

वसंत : ऐकायला हरकत नाही म्हणतो मी—

सहस्रबुद्धे : हो, हो. हरकत नाही. सांग, सांग काय ते. असत्य मात्र सांगू नको. या वाड्यात उभं राहून असत्यकथन करणं हे महत्पाप आहे. प्रत्यक्ष न्यायमूर्तींचा हा वाडा आहे.

बाजीराव : ईश्वरास स्मरून खरं सांग, तुळशीला स्पर्श कर. खोटं बोलणार नाही असंसुद्धा म्हणू नकोस. सत्य सांगेन असं म्हण. गोमयास स्पर्श कर. गाईचं ते सगळंच पवित्र. अपवित्रः पवित्रो वाऽऽ

सख्या : काका, रावसाहेब म्हणाले होते—

सहस्रबुद्धे : काय सांगितलं त्यांनी?

वसंत : तेच सांगतो आहे तो. सांग, सांग.

सख्या : ते म्हणाले होते या काकांना—

सहस्रबुद्धे : मला नोकरमाणसं काका म्हणत नाहीत. काकासाहेब म्हणतात.

वसंत : अहो, पण ऐकू या आपण. तुम्ही मधेमधे—

सहस्रबुद्धे : तसं नव्हे, मला काय म्हणतात ते मी सांगितलं. ही कनिष्ठ दर्जाची माणसं म्हणजे यांना अकला कमी!

वसंत : सख्या, हं...कर सुरुवात.

सख्या : तर रावसाहेब या काकांना...नाही...काकासाहेबांना म्हणाले होते की, प्रेम वगैरे ठीक आहे. विठ्ठल...विठ्ठलरावसुद्धा काही वाईट नाहीत. मी...म्हणजे रावसाहेब...तीन हजार रुपये देईन म्हणाले...तीन हजार रुपये देईन म्हणाले नाहीत, ते म्हणाले—

सहस्त्रबुद्धे : पाहा, पाहा. हा काय सांगतोय ते त्याचं त्यालाच कळेनासं झालं आहे. म्हणूनच मी म्हणतो या माणसांच्या बोलण्यावर—

वसंत : ते काय म्हणाले?

सख्या : ते—रावसाहेब म्हणाले, ताईसाहेबांच्या नावावर तीन हजार रुपये आपण ठेवलेत. तिच्या लग्नासाठी. हुंडा वगैरे देण्याच्या आपण विरुद्ध आहोत.

सहस्त्रबुद्धे : सख्या, हा शुद्ध फाजीलपणा आहे. वसंतराव, सोडून देऊ झालं. प्रसंग कोणता, आलो कशासाठी, आणि विषय निघाला तिसराच. तर असा एकंदरीत प्रकार. रावसाहेब श्रेष्ठ पुरुषांच्या पंक्तीतले एक, हेच शेवटी खरं! [जातात. मागून सख्या जातो.]

बाजीराव : (खिडकीतून खाली उतरतो.) वसंतराव! आता आपल्या आईची एंट्री होणार आहे. तिचं बोलणं या इथं उभं राहून ऐकणं म्हणजे तिचा अपमान करण्यासारखं आहे. (प्रेक्षकांस) लोक हो, क्षमस्व! तुम्हीच केवळ तिचं भाषण ऐकू शकाल. तुम्ही पैसे दिलेत. आपली छाती नाही इथं उभं राहण्याची. कुणी पैसे देतं, कुणी जन्म देतं...मी विंगेत जातो. [जातो. लोकांच्या टाळया. एक साधारण स्थूल बाई अत्यंत उद्विग्न मन:स्थितीत प्रवेश करते.]

आई : वसंता, अजून कुणीच नाही आलेलं?

वसंत : मला वाटतं, आता कुणी येऊही नये.

आई : लोक येणारच. जनरीत म्हणून काही असतेच की नाही? ते जाऊ दे म्हणते मी. पुढं व्हायचं कसं आपलं?

वसंत : आपल्याला काय कमी आहे?

आई : सगळं काही आहे. हा एवढा वाडा. तुम्ही सगळी. काऽही कमी नाही. [वरून व्हायोलिनचे सूर. सोबत वाजा. आई वर पाहते.]

वसंत : आई, ऐक, ऐक वर. दादांच्या दुःखानं व्याकूळ होऊन आमची सुलभा मोठा सोहळा साजरा करत्येय. बरं वाटतंय ना आई तुला?

आई : मला काय कळतं रे त्यात ? पण तिलासुद्धा काही बरं वाटत नसेल. अरे, त्यांची आवडती होती ती. मला वाटलं होतं, आता हिचं कसं होणार! पण एका अर्थी हेच बरं आहे.

वसंत : पण हे तुला बरं वाटतं ना ? बरं वाटतं ना ?

आई : बरं वाटायचं काय त्यात ? करावी लागतात एकेक नाटकं! मला माझीच भीती वाटायला लागलीय रे वसंता. घोरच पडलाय मला. हा एवढा मोठा तिमजली वाडा अगदी उरावर उभा असल्यासारखं झालंय. कोण पाहणार याची वेवस्था! तुम्ही उठाल आणि जाल आपापल्या धंद्यामागं. मला खायला उठेल हा—

वसंत : आई, बैस ना तू.

आई : बसू ? मी उभीच राहिले आजवर या दिवाणखान्यात. पहिल्या-पहिल्यानं वाट पाहत, त्यांची. मग सुलूच्या जन्मापासून सतरा वर्षं हे कधी प्रसन्न होतात याची. आता मात्र उभं राहायला जागाच नाही रे मला. वसंता—

वसंत : आई, उगीचच एकेक काळजी तुला. आम्ही आहोत ना!

आई : आहात, तुम्ही आहात. दिगंबर आणि रमेशला अजून यायला सवड झाली नाही. हे वडलांवरचं प्रेम! मग आईला सांभाळणार होय रे तुम्ही! कोण कुणाचं नव्हे. ती बया मी एकटी असताना येईल. ते असताना निदान तिला माझ्याकडे यायची गरज नव्हती. पण आता ती येईल. लुबाडून जाईल. सगळा डागडागिना, चीजवस्तू घेऊन जाईल ती बया—

वसंत : कोण ? ती कांतीबाय ? ती आली म्हणून—पण ती येईलच कशी या वाड्यात ? दादा होते तोवर...पण दादा असतानाही ती कधी आली नाही इकडे. आई, तू उगीचच मनस्ताप करून घेतेस. स्वस्थ बैस बघू. कसलीच चिंता करायची नाही.

आई : वसंता, या गोष्टी इतक्या सोप्या नाहीत बरं, इतक्या साध्या नाहीत.

तुला कळायच्या नाहीत त्या. मी सांगूही नयेत त्या तुला. पण राहवत नाही रे. शेवटचे दोन शब्द तरी बोलायचे त्यांनी माझ्याशी—शेवटचे दोन शब्द.

**वसंत :** पण आई, सगळं अकस्मात घडलं ना? सुरू तर म्हणत होती, त्यांना मुळी काही सांगायला वेळच मिळाला नाही. अचानक, ध्यानीमनी नसताना...

**आई :** आले ते त्या बयेकडूनच आले. चांगली मजा करून आले. आता हे कशाला सांगू मी? उपयोग काय त्याचा? पण कढ येतात. बोलावंसं वाटतं. एकेक आठवतं. हा वाडा आता वैरी होणार आहे माझा, वैरी—

**वसंत :** हे खरंच आहे आई, हे सगळं खरंच आहे. पण आता ते उगाळण्यात काही अर्थ आहे का?

**आई :** नाही. ते कळतंय मला वसंता, ते कळतंय मला. पण माझा छळ केल्यानी रे त्यांनी. मला मुका मार दिल्यानी. एवढे मोठे न्यायाधीश. फार मोठे. पण मला न्याय दिल्यानी नाही. आता मात्र संपलं. संपलं सगळं. त्या बयेनं मात्र साधून घेतलंन—

**वसंत :** आई, आई असा ताप करून घेऊ नको. माणूस कितीही मोठा असला तरी काही वीक पॉइंट्स म्हणजे...काही बाबतींत असायचाच असा.

**आई :** माणूस? खूप माणसं बघितलीस होय रे? माणूस? माणसाचं सांगतोय मला! अशी वागतात अन् तशी असतात! इतक्या वर्षांत चकार शब्दानं कुणाला सांगितलं नाही मी. ~~तू सगळ्यांत मोठा. पण~~ मोठा होता होता विसरलास तू तुझ्या आईला. कधी विचारलंस त्यांना? मला तरी? काय रे, तुला यातलं जसं काही ठाऊकच नव्हतं. माणसाचं सांगतोय! (क्षणकालाने) एकदाचं आठवतं—असेच कुठून तरी आले कपाळाला आठ्या घालून. तिथं त्या खुर्चीवर बसले होते. मी पाहिलं, एकटीच होती स्वारी. बाहेर आले. म्हटलं, विचारावं तरी. जिवाला बरं नसेल...

[वसंत उठून दारापर्यंत जाऊन येतो.]

**वसंत** : पुढं काय झालं आई?

**आई** : जवळ जाऊन उभी राहिल्ये. अरे, बघायचं तरी होतं त्यांनी? खूप वेळ मागं उभी होत्ये. शेवटी अधिक आठ्या घालून काय म्हणाले माहीत आहे? म्हणाले, तुझ्या अंगाला कंटाळवाणा वास मारतोय. निघून जाऽऽ, निघून जाऽऽ.

**वसंत** : आई, खरंच आहे. तुला त्या वेळी खूप वाईट वाटलं असेल. कल्पना आहे मला. पण दादांना—त्यांनाही न्याय द्यायला हवा आपण. एवढा मोठा माणूस! त्यांच्याही व्यक्तिमत्त्वाचा काही विचार करायला हवा. तू म्हणशील, मी दादांची बाजू घेतोय. पण—

**आई** : मला काही वाटणार नाही. मला अभिमान वाटतो तुमचा. खरंच, अभिमान वाटतो. पण मलाही त्यांची बाजू घेता आली असती तर? खूप बरं झालं असतं. पण नाही रे, तसं मला खूप आहे. हा वाडा, ही इस्टेट, दागदागिना, तुम्ही, पण—नाही, यापेक्षा काही...माझ्या मनात...

**वसंत** : आई, तुझंही बरोबरच आहे. मला यात बोलताच येत नाही. सगळंच विचित्र आहे—पण तू आता आत जा. स्वस्थ पड. आता त्याचा काहीसुद्धा उपयोग नाही. उगीचच स्वतःचंच मन यात फाटून निघतं.

[वसंत पुन्हा दाराकडे जाऊन येतो.]

**आई** : मला न्याय देणारं कुणीच नाही काय रे? तूही माझं ऐकून घेत नाहीस! अरे, मी आई आहे तुझी. ~~थोरला~~ मुलगा आहेस तू माझा! वैरी, वैरी...आहात तुम्ही सगळी—वैरी आहात. त्या बयेनं भारून टाकलंय तुम्हांला. भारून टाकलंय. अरे, मी आई आहे तुमची. तुम्हांला मीच जन्म दिलाय. त्या बयेनं नव्हे—

**वसंत** : (भेदरतो.) आई, आई, आई. असं काय बोलतेस तू? आई, असं काय पाहतेस? आई, खरंच तसं मी—म्हणजे तुझं हे पर्वताएवढं दुःख—मोठं—खूप मोठं दुःख कळतं मला. आई—आई, तू भानावर ये ना.

आई : चांगली शुद्धीत आहे मी. अनेक वर्षं, सुलूच्या जन्मापासून तापलेल्या तव्यावर होरपळतेय मी. कुठं ती भेटली यांना न कळे. मुकाट्यानं सहन केलं. या इथं कुंकू होतं तोपर्यंत पण. आता हुंदक्यांचा हंबरडा होणार असं वाटू लागलंय. मी एक दिवस कोर्टात उभी राहून न्याय मागणार होत्ये त्यांच्याकडे. पण मला फसवलनी रे. निघून गेले. सवाष्णपणाचा तोराही संपला. सगळंच हिरावून घेतलंनी—

वसंत : (आईच्या हाताला धरून) आई, तू घरात चल.

आई : (कनवाळूपणे) वसंता, तू राहशील माझ्याबरोबर ?

वसंत : हा आहेच मी आई, आहेच मी! आई, हा इथंच आहे.

आई : आतापुरता नव्हे, मी असेपर्यंत राहशील ?

वसंत : आई, तसं कसं राहता येईल मला ? नाशिकला प्रचंड पैसा असून इथं कसा राहू मी ? द्राक्षांचे मळे—

आई : तेही बरोबर. तुला राहता यायचं नाही माझ्याबरोबर. मी गरीब झाल्येय रे वसंता. थेरडी झाल्येय मी. म्हातारी. दूर हो, दूर हो. वसंता, दूर हो म्हणत्ये ना ? (वसंतचे हात झिडकारून टाकते.)

वसंत : आई, आई—आई असं पाहू नकोस! आई, ते तुझे डोळे भयानक दिसताहेत, आई. (दूर होतो.)

आई : घाबरलास ? घाबरलास ? थेरडीला घाबरलास ? मला न्याय दे ! वसंता, मला न्याय दे ! तू त्यांचाच मुलगा आहेस. बघ, बघ ! वसंता, माझ्या गालांवरच्या सुरकुत्या लोंबताहेत. बघ रे वसंता, हातापायांच्या काड्या झाल्यात. माझी मानसुद्धा पाहा ना कशी कापतेय. वसंता, अंगाला वास मारतोय माझ्या ! अंगाला घाण येतेय ! वसंता, वसंताऽ—या थेरडीला न्याय दे. न्याय दे. त्या बयेला फासावर चढव—(थकते.)

वसंत : (भयंकर अस्वस्थ) बाप रे, कुणीतरी धावा. आई वेडी झाली. आमची आई वेडी झाली...

[वरून बाजा-व्हायोलिन.]

आई : वाडा पळतोय बघ वसंता. वाडा पळतोय. (घुसमटल्यासारखी हसते.) वाडा हलतोय रे! वाडा पडणार वाटतं. माझ्या उरावर कोसळणार वाडा—वाडा—माझ्या वैऱ्याचा वाडा—

[वसंत तिला आत नेतो. किंचित्काल स्तब्धता. बाहेरून एक पोक्त बाई येते. ही कांतीबाई. तिने शुभ्र वस्त्र परिधान केलेले आहे. माथ्यावरून पदर आहे. सावकाश पावले टाकीत, बाहेरच्या दारापाशी येते. मग किंचित थांबून आत येते. कोचाकडे किंचित उभी. चेहऱ्यावर अपार वेदना. मग न्यायाधीशांच्या खुर्चीकडे जाऊन उभी राहते. पदराने तोंड झाकून घेते. मग मागे फिरते. फुलदाणीतला एक गुलाब हलकेच खुडते. नेऊन खुर्चीच्या पायांपाशी ठेवते. वाकून नमस्कार करते. मागे फिरते. खालच्या मानेने झटकन निघून जाते.]

बाजीराव : (विंगेतून) सबंध वाडाच ओला होऊन राहिलाय. ओला. वाडाच वितळत आहे.

[वाड्यातून उसासे ऐकू येतात. चमत्कारिक प्रकाशाची उघडझाप होते.]

न्यायाधीशांचा आवाज : खून?

आरोपीचा आवाज : तुम्ही खून केलात माझा.

न्यायाधीशांचा आवाज : मी?

आरोपीचा आवाज : होय तुम्ही! फाशी दिलंत मला, विनाकारण!

न्यायाधीशांचा आवाज : मी फाशी देणार कोण? मी फक्त न्यायदेवतेचा कौल दिला. मी न्यायदेवतेचा सेवक.

आरोपीचा आवाज : नाही. मांग आहात तुम्ही. तुम्हीच मारलंत मला.

न्यायाधीशांचा आवाज : नाही. मी केवळ पुस्तकातला न्याय दिला. माझी ही माणसं, ऐक, ऐक माझ्यामागं काय बोलताहेत! मला कोण न्याय देणार? सख्याऽऽ, सख्याऽऽ, तूच न्याय दे आम्हांला. माझ्या त्या खुर्चीवर बैस, आणि न्याय दे! सख्याऽऽ

['तुम्ही खून केलात माझा' हे आवाज वाढत जातात. प्रकाशाची

उघडझाप वाढत जाते. बाजीराव धावत येतो.]

बाजीराव : थांबा, वाडेराव न्याय मिळेल, थांबा!

[प्रकाशाची उघडझाप हळूहळू थांबते. बाजीराव खिडकीत जाऊन उभा राहतो.]

बाजीराव : एरव्ही काही नाही, आमची ती वेल कुठल्यातरी वळचणीतून पसरतेय. चिरडून जायची. म्हणून म्हटलं, वाडेराव, थांबा! पळायचं नाही. नाटकाला अचानक पूर आला होता. पात्र थोडं रुंदावलं होतं. म्हटलं, आमच्या पायांखालची तारसुद्धा निसटते की काय? (खाली पाहून) काय रे? तू अजून इथंच उभा? आणि तुझ्यामागं हे लोक कोण जाणे सगळे...काय म्हणतोस? तेही भिकारीच? भिकारी तरी किती आहेत या जगात? काय म्हणालास? आम्हांला भीक नको, न्याय हवाय? आं? कसला न्याय? आम्ही भिकारी का झालोत? अच्छा! इथं आता न्यायदानाचा सीन होणारच आहे. तुमचा प्रतिनिधी म्हणून न्यायासनासमोर उभा राहतो. तुमचं गाऱ्हाणं मांडतो. होईल तो निकाल तुमच्या कानी घालतो...सख्याऽऽ

[सख्या मिशी सावरीत येतो.]

बाजीराव : सख्या, एंट्री विसरलास? एवढी महत्त्वाची एंट्री. पुढचं नाटक आता तुझं आहे. न्यायाधीशानंच तुला न्यायाधीश बनवलंय. विसरलास कसा?

सख्या : डायलाग पाठ हायेत, पण एंट्री विसरलो खरा.

बाजीराव : शक्य आहे. चल तर, आसनस्थ हो!

[सख्या न्यायाधीशांच्या खुर्चीवर बसू लागतो.]

आप्पाराव : (उठून) आम्हांला हे मंजूर नाही. एका सामान्य चाकराला न्यायाधीशाच्या खुर्चीवर बसवणं हे केव्हाही अयोग्यच. नाटकातला असला म्हणून काय झालं? नोकर तो नोकरच. त्यानं त्या खुर्चीवर बसायचं म्हणजे शंकराच्या पिंडीवर उंदीर बसवण्यासारखं आहे.

[सख्या उठतो व बाजूला उभा राहतो.]

बाजीराव : (पुढे येतो.) कुठच्याही नंदीनं त्यावर येऊन बसावं, माझी काही हरकत नाही.

आप्पाराव : मी नंदी काय रे भामट्या?

बाजीराव : देवमाशाला नंदी म्हणताच राग आला. त्याचंही बरोबरच. एकच शिंग असताना आपल्याला नंदी म्हणावं म्हणजे काय? आप्पाराव, आपण बसणार का?

आप्पाराव : मग सोडीन की काय! त्या नोकराला न्यायाधीशाच्या घरच्या खुर्चीवर बसवणारा तो नाटककार—घरची असली म्हणून काय झालं, न्यायाधीशाची खुर्ची ती—त्या नाटककाराला गोळीच घालायला हवी.

बाजीराव : गोळी—नाटककारावर? छट्! पाइप तोंडात बाळगणारा कुठचाही टीकाकार त्याला धुराबरोबर उंच उडवून देईल याची खात्री बाळगा. आपण बसावं महाराज! पण—काही अटी आहेत.

आप्पाराव : अटी? त्या कोणत्या?

बाजीराव : न्यायासनावर बसताना आपल्याला जवळपास शस्त्र वापरता येणार नाही. बंदूक किंवा टोकदार मिश्या या गोष्टीसुद्धा यात येतात.

आप्पाराव : मिश्या? (भडकतो.)

बाजीराव : आपल्याला मिश्या उतरून ठेवाव्या लागतील!

आप्पाराव : (ओरडतो.) खाली उतर...कुत्र्या! तुला—(पुढे काय बोलावे हे समजत नाही.)

प्रेक्षक : आप्पाराव, होऊन जाऊ दे. त्या नाटक्यानं आपल्या मिश्यांबद्दल बोलावं! काढा पेट...घाला गोळी साल्याला.

बाजीराव : (सख्याच्या मिश्या एका हाताने उचलून त्या प्रेक्षकांसमोर धरतो.) अस्सल खानदानी मिशी. किंमत रुपये दोन.

आप्पाराव : मिशी बाजूला ठेव. न्याय देण्याचं काय ते बोल.

बाजीराव : (मिशी वर धरून) न्यायाची किंमत इतकीच ठरू नये! आपण न्यायासनावर बसणार आहात?

आप्पाराव : बसणार म्हणजे काय? आम्ही काय नामर्द आहोत?

बाजीराव : चलावं महाराज! बंदूक बाजूला ठेवून न्याय द्या! आणि या खुर्चीवर बसल्यावर आपोआपच खरं बोलाल हे ध्यानी ठेवा! कदाचित आपल्याला तं अडचणीचं नाही ना व्हायचं?

आप्पाराव : (गांगरतो.) बसूनच पाहिलं पाहिजे!

बाजीराव : चलावं महाराज! नदी समुद्राला सामोरी जात आहे!

[आप्पारावाला बाजीराव हात देऊन वर घेतो.]

आप्पाराव : आम्ही बंदूक घेऊन बसणार!

बाजीराव : म्हणजे ती पोकळ आहे का?

आप्पाराव : ते तुला कशाला? ग्रामस्थ हो! नाटकात काम करतोय असं समजू नका! तो सामान्य नोकर त्या आसनावर बसतो म्हणजे काय?

प्रेक्षक : आप्पाराव! काही हरकत नाही. आपल्याला काय वाटेल ते करण्याचा अधिकार आहे.

आप्पाराव : खरंच आहे ते! आम्हांला काय वाटेल ते शोभेल! (सरळ जाऊन खुर्चीवर बसायला लागतो.)

बाजीराव : थांबा! प्रत्यक्ष न्यायदानाला अजून सुरवात व्हायची आहे. तोवर आपण साध्याच आसनावर बसा!

आप्पाराव : कुठं बसायचं आम्ही?

[बाजीराव त्याला एका कोचावर बसवतो.]

बाजीराव : (खिशातील अत्तराची कुपी काढून) हवंय का?

आप्पाराव : हे काय आहे? (थोडा बिचकतो.)

बाजीराव : अत्तर आहे! (त्याच्या मनगटाला लावून) केवडा आहे केवडा!

आप्पाराव : (त्याच्यावर खूष होतो.) वाऽरे बहाद्दरा. वाऽऽ! (अत्तराचा वास घेतो.)

[बाजीरावाच्या सूचनेप्रमाणे सख्या पडदा पाडतो. पडदा पडता पडता आप्पाराव ओरडतो, "अरे, पडदा पाडू नका! पडदा पाडू नका!"

पडदा पडल्यावर गौरी आप्पारावासमोर उभी. आप्पाराव तिच्याकडे पाहत नाही. गौरी फुलदाणीतला एक गुलाब आणून आप्पारावाला देते.]

ाप्पाराव : बाजी, नाटक कसलं करताय हे? पडदा कशाला पाडलास? (गुलाब फेकून देतो.)

ाजीराव : नांगरलेल्या जमिनीवर पाऊस आणि नाटकावर पडदा पडल्या-वाचून पेरलेलं उगवून येत नाही.

ाप्पाराव : ही भाषा कळत नाही आम्हांला!

ाजीराव : या नाटकावर पडदा पडला नसता तर या गौरीने आपल्याला हा गुलाब दिला असता का? गौरीच्या रूपानं केवढं हे गुलजार हिरवं-गार रोपटं उगवून आलं!

[गौरी फणकाऱ्यानं निघून आत जाते.]

आता लौकरच खटल्याला सुरवात होईल! तोवर आपण शांत बसा. आत जाऊन मी माझे प्रश्न तयार करतो. (आप्पारावाने फेकलेला गुलाब उचलतो.) कुस्करूं नका हीं सुमनेंऽ! यांतल्या प्रत्येक पाकळीला अर्थ आहे...आपण विंगेत बसावं.

दग्दर्शक : (प्रवेश करून) बाजीराव! खरंच! आम्हांला अजून खूप शिकायचंय! बाजीराव, माझे शब्द तोकडे पडतील!

ाजीराव : अरे, त्यात काय? शब्द बापुडे वाया जातात...

[दोघेही आत जातात.]

ाप्पाराव : लौकर या रे! पडदा लौकर उघडायला सांगा! (आपल्यातच) एकंदरीत झालं हे ठीक झालेलं नाही. कसे काय फसलो आम्ही, कोण जाणे! आता आमचं हसं झालं नाही म्हणजे मिळवली. या नाटक्यांचं खरं नव्हे. (क्षणभर थांबून) आम्हांला या बाज्यासारखा एखादा खुष-मस्कऱ्या मिळाला तर काय मजा येणार आहे. हा प्राणी आम्हांला बोलण्यात चीत करीत होता, पण आम्हांला त्याचा बिलकूल राग येत

आप्पाराव : बसणार म्हणजे काय? आम्ही काय नामर्द आहोत?

बाजीराव : चलावं महाराज! बंदूक बाजूला ठेवून न्याय द्या! आणि या खुर्चीवर बसल्यावर आपोआपच खरं बोलाल हे ध्यानी ठेवा! कदाचित आपल्याला ते अडचणीचं नाही ना व्हायचं?

आप्पाराव : (गांगरतो.) बसूनच पाहिलं पाहिजे!

बाजीराव : चलावं महाराज! नदी समुद्राला सामोरी जात आहे!

[आप्पारावाला बाजीराव हात देऊन वर घेतो.]

आप्पाराव : आम्ही बंदूक घेऊन बसणार!

बाजीराव : म्हणजे ती पोकळ आहे का?

आप्पाराव : ते तुला कशाला? ग्रामस्थ हो! नाटकात काम करतोय असं समजू नका! तो सामान्य नोकर त्या आसनावर बसतो म्हणजे काय?

प्रेक्षक : आप्पाराव! काही हरकत नाही. आपल्याला काय वाटेल ते करण्याचा अधिकार आहे.

आप्पाराव : खरंच आहे ते! आम्हांला काय वाटेल ते शोभेल! (सरळ जाऊन खुर्चीवर बसायला लागतो.)

बाजीराव : थांबा! प्रत्यक्ष न्यायदानाला अजून सुरवात व्हायची आहे. तोवर आपण साध्याच आसनावर बसा!

आप्पाराव : कुठं बसायचं आम्ही?

[बाजीराव त्याला एका कोचावर बसवतो.]

बाजीराव : (खिशातील अत्तराची कुपी काढून) हवंय का?

आप्पाराव : हे काय आहे? (थोडा विचकतो.)

बाजीराव : अत्तर आहे! (त्याच्या मनगटाला लावून) केवडा आहे केवडा!

आप्पाराव : (त्याच्यावर खूष होतो.) वाऽरे बहाद्दरा. वाऽऽ! (अत्तराचा वास घेतो.)

[बाजीरावाच्या सूचनेप्रमाणे सख्या पडदा पाडतो. पडदा पडता पडता आप्पाराव ओरडतो, "अरे, पडदा पाडू नका! पडदा पाडू नका!"

पडदा पडल्यावर गौरी आप्पारावासमोर उभी. आप्पाराव तिच्याकडे पाहत नाही. गौरी फुलदाणीतला एक गुलाब आणून आप्पारावाला देते.]

आप्पाराव : बाजी, नाटक कसलं करताय हे? पडदा कशाला पाडलास? (गुलाब फेकून देतो.)

बाजीराव : नांगरलेल्या जमिनीवर पाऊस आणि नाटकावर पडदा पडल्या-वाचून पेरलेलं उगवून येत नाही.

आप्पाराव : ही भाषा कळत नाही आम्हांला!

बाजीराव : या नाटकावर पडदा पडला नसता तर या गौरीने आपल्याला हा गुलाब दिला असता का? गौरीच्या रूपानं केवढं हे गुलजार हिरवं-गार रोपटं उगवून आलं!

[गौरी फणकाऱ्यानं निघून आत जाते.]

आता लौकरच खटल्याला सुरवात होईल! तोवर आपण शांत बसा. आत जाऊन मी माझे प्रश्न तयार करतो. (आप्पारावाने फेकलेला गुलाब उचलतो.) कुस्करूं नका हीं सुमनेंऽ! यांतल्या प्रत्येक पाकळीला अर्थ आहे...आपण विंगेत बसावं.

दिग्दर्शक : (प्रवेश करून) बाजीराव! खरंच! आम्हांला अजून खूप शिकायचंय! बाजीराव, माझे शब्द तोकडे पडतील!

बाजीराव : अरे, त्यात काय? शब्द बापुडे वाया जातात...

[दोघेही आत जातात.]

आप्पाराव : लौकर या रे! पडदा लौकर उघडायला सांगा! (आपल्यातच) एकंदरीत झालं हे ठीक झालेलं नाही. कसे काय फसलो आम्ही, कोण जाणे! आता आमचं हसं झालं नाही म्हणजे मिळवली. या नाटक्यांचं खरं नव्हे. (क्षणभर थांबून) आम्हांला या बाज्यासारखा एखादा खुष-मस्कऱ्या मिळाला तर काय मजा येणार आहे. हा प्राणी आम्हांला बोलण्यात चीत करीत होता, पण आम्हांला त्याचा बिलकूल राग येत

नव्हता. केवळ लोकलज्जेस्तव आम्हांला दाखवावं लागत होतं की आम्हांला राग येतोय. आम्हांला देवमासा म्हणत होता. वा वा! आम्ही असलोच तर देवमासे असू. वाघ, सिंह असू. (मनगटावरील अत्तर हुंगीत) राजे आहोत आम्ही राजे!

[दाभाडे पडद्याच्या एका बाजूने दबकत दबकत आप्पारावासमोर उभे राहतात.]

**आप्पाराव :** तुम्ही?

[दाभाडे मानेनेच 'होय, होय' करतात.]

**आप्पाराव :** (जवळ बोलावतो, खुणेनेच. दाभाडे जवळ जातात.) काय झालं?

**दाभाडे :** ती वस्तू...(आजूबाजूला पाहत) कुठंतरी हरवली.

**आप्पाराव :** हरवली? तुम्ही कसे नाही हरवलात?

**दाभाडे :** (भयंकर बावरून) मी पुन्हा जाऊन आणली. (डबी काढून दाखवतात.)

**आप्पाराव :** (डबी त्यांच्या हातातून घेतो. खिशात ठेवतो.) आणि त्या बयेनं उत्तर काय दिलं?

**दाभाडे :** लहर लागली तर येईन म्हणाली.

**आप्पाराव :** (मुद्रेवर भयंकर संताप) लहर लागली तर? मग मघाची ती फुलं? नाटक करते काय आमच्याशी? आम्ही कोण वाटलो ग तुला?... (भानात येऊन) हं, तुम्ही—बरं, बरं, जा. तुम्ही जा, दाभाडे, वाड्यावर जा! माडीवरची ती खोली शृंगारून ठेवा. जा.

**दाभाडे :** मी...मी...हे योग्य...

**आप्पाराव :** दाभाडे—(उग्रपणे पाहतो.) योग्यायोग्यतेचा विचार करायला आम्ही समर्थ आहोत. तुम्ही जा.

[दाभाडे घाबरून पडद्याकडच्या विंगमधून हलकेच बाहेर पडतात.]

**आप्पाराव :** लहर लागली तर येईन! (डबी न्याहाळतो.) हा पडदा हे लोक कधी उघडताहेत नकळे! हल्ली हल्ली एकटे बसलो की आमच्या छातीत धडधडायला लागतं.—का कोण जाणे! आम्ही आमच्याच नकळत

कुणाला भीत आहोत तेच कळेनासं झालंय आम्हांला! ती कसली ती भीती विसरायला या बाजीरावासारखा एखादा खुषमस्कऱ्या—

[बाजीराव सख्याशी आतून बोलत येतो.]

**आप्पाराव** : बाजी, इकडे ये असा—

**बाजीराव** : इकडे ये असा? म्हणजे कसा? दोन पायांनी लुटूलुटू की लंगडी घालीत सुटू? लहानपणी चांगली लंगडी मीच घालायचा.

**आप्पाराव** : (उठून त्याच्याकडे जातो.) तू आजपासून आमचा दोस्त.

**बाजीराव** : डोंगर महंमदाकडे आला हे ठीक! पण डोंगर महंमदावरून चालत गेला तर मात्र झालाच त्याचा चेंदामेंदा.

**आप्पाराव** : तो डोंगरबिंगर जाऊ देत खड्डयात. आजपासून तू आमचा दोस्त. आम्ही तुला या घटकेपासून आमच्या पदरी ठेवलंय. आजपासून तू आमचा आणि आम्ही तुझे.

**बाजीराव** : असं कसं? मी काय आणि तुम्ही काय? दोघेही त्याचे. (वर बोट दाखवतो.) तेव्हा त्याची परवानगी घेऊन येतो...पुढच्या जन्मात.

**आप्पाराव** : आमची आज्ञा म्हणजेच त्याची परवानगी. तू आमच्या वाड्यावर राहायचं. वाट्टेल तेवढं, वाट्टेल तेव्हा खायचं, प्यायचं, मजा करायची. आम्हांला खदखदा हसवायचं. आज आम्ही लोकलाजेस्तव हसू शकलो नाही. आणि आमच्या धाकानं लोकही हसू दाबून राहिले. आजपासून तू आमचा खुषमकऱ्या. तू हसव आणि आम्ही हसणार.

**बाजीराव** : बाकी यात झालाच तर आमचा फायदाच आहे. फायदा म्हणजे असा की, बाळाला जन्म देता देता आईला बाळ जसं फुकट, तसंच तुम्हांला हसवता हसवता आम्हांला आमचं हास्य फुकट. पण यात एक बारीकशी अडचण आहे. घराला लहानशी वळचण कशी असते तशी अडचण.

**आप्पाराव** : अडचण? ती कसली आणखी?

**बाजीराव** : तुमच्या पदरचे आम्ही. आमच्या पदरचं हास्य. येथवर व्यवहार पटला. पण यात वेळप्रसंगी रडायचं कुठं? आणि रडवायचं

कुणाला ? तर ही रडण्या-रडवण्याची अडचण सोडवा. की झालो आम्ही तुमचे आणि तुम्ही आमचे. तर बोला आप्पाराव—

**आप्पाराव** : रडायचं ? ते का म्हणून ?

**बाजीराव** : हसायचं—ते का म्हणून ?

**आप्पाराव** : हसायचं—हसायचं—आपलं सहज...(गोंधळतो.)

**बाजीराव** : मग रडायचं आपलं सहज.

**आप्पाराव** : पण पैसा घेऊन रडण्यापेक्षा पैसा घेऊन हसणं काय वाईट ?

**बाजीराव** : प्रश्न आहे तो हाच. दोन्हीही त्याज्यच. पैसा घेऊन रडण्यापेक्षाही पैसा घेऊन हसणं महाभयंकर! आप्पाराव, ते असो. न्यायदान—

**आप्पाराव** : बाजी, मी तुला घर बांधून देतो, तुझं लग्न करून देतो, तुला गुरंढोरं, शेतीवाडी, सगळं देतो. काय हवं ते—

**बाजीराव** : हवं ते द्याल तेही खरंच; पण मुंगी साखर खाता खाता मेली, तशातलं व्हायचं. अहो, लोक हसतात, हसोत बापडे. त्यांनी त्यासाठी रांगेत उभं राहून पैसे दिलेले असतात. हा व्यवहार आहे. लोक खरोखरीचे सुखी असते तर हसले नसते. जगात सुखी माणूस नाही आप्पाराव, फक्त त्याचा सदरा आहे. एकांतात मी कधीच हसत नाही. अहो, तो माझ्या हसण्याचा आवाज ऐकून मरेन मी. मी एकदा एका वेश्येकडे गेलो होतो—आयुष्यात प्रथमच गेलो, आणि ते शेवटचं ठरलं. दारावर गेलो, तर ती आत एकटीच बसून हसत होती. इतकं भयाण, भयंकर हास्य आपण जगात आणि जन्मात कधी ऐकलं नाही. वाटत होतं, कसलं तरी तीक्ष्ण शस्त्र घेऊन स्वतःचंच हृदय ती चिरीत बसलीय. बापरे! वणव्याला थोडा तरी आवाज असतो, पण त्या तिच्या हास्याला स्मशानशांतीचाच फक्त आवाज सापडला होता. त्या दिवसापासून माझ्या काळजातला हसण्याचा आवाजच गेला बघा! मी नाटकात हसतो. नाटकातलं हसणं तेवढं खरं, आप्पाराव. आप्पाराव, चला! न्यायदानाचं काम—

आप्पाराव : बाजी, तुझं आपल्याला काहीसुद्धा पटलेलं नाही. आम्ही ज्याला आपलं म्हणतो, त्याचा जीवसुद्धा घ्यायला आम्ही मागंपुढं पाहत नाही. आमच्या मर्जीतून उतरणं म्हणजे नामशेष होणं. आम्ही विनंती करतोय तुला—आम्ही आजवर विनंती कोणाला केलेली नाही. सोडलेत ते हुकूम आणि बंदुकीच्या गोळ्या!

बाजीराव : तर मग तुमचे वाडे तुम्ही सांभाळा. आमची विदूषकी आम्ही सांभाळतो. बंदूक तुमची. त्यातल्या गोळ्या तुमच्या. आणि त्या बंदुकीच्या चापावरचा हातही तुमचाच. मी माझाच आहे. मेलो तरी माझाच राहीन. आमचं मरण कुणाला नडणार नाही. आमच्यासाठी कुणी रडणार नाही. आणि आम्ही मेलो म्हणून विशेष काही घडणार नाही. हिंदू आहोत म्हणून आमचं प्रेत कुठल्या तरी खड्डयात सडणार नाही. कुणीतरी आम्हांला अग्नी देईलच. आमच्या वाडवडिलांची आमच्याजवळ असलेली ही एकच वस्तू—(काठी वर उचलून) हिला नीट उभंही राहता येत नाही. हिला आधार देण्यासाठी आम्ही. ही बिचारी कसली रडतेय आमच्यासाठी?

[एक नट हातात आरोपीचा पिंजरा घेऊन येतो.]

आप्पाराव : (दचकतो.) ते काय आहे?

बाजीराव : हा पिंजरा. पुढच्या न्यायदानाचा सीन ही मंडळी मांडताहेत. तुम्ही जरा तिकडे बसता, विंगेत?

आप्पाराव : (गुरगुरत) तिकडे बसा! इकडे बसा! काय पोरखेळ चाललाय हा! बरं बरं, होऊ दे तुझ्या मनासारखं...नाटक करतात लेकाचे! (आत जातो.)

# अंक तिसरा

[आतल्या बाजूला टेपरेकॉर्डर टेस्ट केला जातो आहे.]

**पहिला आवाज :** आम्हांला न्याय द्या, न्यायाधीशमहाराज.

**दुसरा आवाज :** तुम्ही आम्हांला फाशी दिलंत. तुम्ही खून केलात आमचा. खून.

[आप्पाराव अस्वस्थपणे बाजूला जाऊन उभा राहतो. बंदुकीकडे पाहतो.]

**पहिला आवाज :** आम्हांला न्याय द्या, न्यायाधीशमहाराज.

**दुसरा आवाज :** तुम्ही खून...खून केलात आमचा.

**आप्पाराव :** एऽऽ, कोण बोलतंय? (भेदरल्यासारखा उभा.)

**आतून एक आवाज :** बस, बस. हाच तुकडा फिक्स करायचा...हां हां, हाच.

**आप्पाराव :** म्हणजे हे नाटकातलंच! (बसतो.) ए, कोण आहे रे तिकडे? पडदा उघडा लौकर.

[गौरी प्रवेश करते. आप्पारावाच्या किंचित जवळ जाऊन उभी राहते.]

**गौरी :** पाहावंसं नाही वाटत?

[आप्पाराव दुर्लक्ष करतो.]

बोलावंही नाही वाटत?

[आप्पाराव शांतपणे उठून दुसऱ्या एका कोचावर जाऊन बसतो.]

राजे! राजे आहात तुम्ही. (जवळ जाते.)

आप्पाराव : दुरून बोल. रंगाचा वास मारतोय तुझ्या बोलण्याला. दूर, दूर उभी राहा!

गौरी : चुकून भलतंच उत्तर गेलं. मी आपल्याला प्रत्यक्ष पाहिलं नव्हतं त्या वेळी. त्या चिठ्ठीच्या मालकाचा हा रुबाब—

आप्पाराव : (कडाडतो.) चिठ्ठीचे मालक? तुझ्या हातातनं फाडल्या गेलेल्या त्या चिठ्ठीचेच नुसते मालक असतो तर केव्हाच वारलो असतो आम्ही.

गौरी : क्षमा करा. क्षमा करा. मी यापुढं कायमची, कायमची तुमची—

आप्पाराव : कायमचीच—(थांबतो. बंदुकीकडे पाहतो.) हो...आम्ही यापुढं त्या बाजीलाच आमच्या पदरी ठेवणार आहोत. कायमचा. वा! बाजी काय झकास माणूस आहे लेकाचा!

गौरी : (बाजीचे नाव ऐकताच अंगावर वीज कोसळावी अशी अवस्था.) तो? रोग! पछाडील तो तुम्हांला! आप्पाराव, घाण—घाण आहे ती—

आप्पाराव : नुक्ता गर्भवासातून बाहेर पडलेला मांसाचा गोळा कितीसा स्वच्छ असणार? हे आमचे हात चांगले मस्त शूर शिकारी आहेत. कितीही ओंगळ असेना का एखादा प्राणी, आम्ही त्याला चांगला धुतल्या तांदळा-सारखा साफ करू शकतो. बाज्या मस्त आहे लेकाचा. पण तुझ्याहून आमच्या तोंडातली पिंकसुद्धा बहाद्दर आहे. बाजीला आम्ही आमच्या पदरी ठेवणार आहोत.

गौरी : आप्पाराव, मी—मी येणार आहे तुमच्याकडे. पण बाजी—

आप्पाराव : तू येच. उद्धार होईल तुझा. (बंदुकीकडे पाहतो.)

गौरी : उद्धार कसला होणार आहे माझा! इतकी पापं घडलीत. हे आणखीन एक!

आप्पाराव : पाप वगैरे गोष्टींची आम्ही कदर केली नाही कधी. आमच्या वाड्यावर आम्ही पापसुद्धा गळाभर बुडून करतो—मनापासून. हे रंग कसले तुमचे? ही नुस्ती रंगरंगोटी. आम्ही जगातले सगळे रंग खेळलोत. वाघ जिवंत फाडताना उडणारं ताज्या गरम रक्ताचं कारंजं पाहिलंयस का

कधी? रंग कसा पायजेल? वाघाच्या ताज्या गरम रक्तासारखा. वाघाच्या अंगावरचे पिवळेधम्मक पट्टे पाहा एकदा. डोळे कवडीमोल होऊन जातील तुझे. तू ज्यांच्याशी रंग केलास ते लोक पापी होते. तूही पापी आहेस. आम्ही जन्माचेच पुण्यवंत! आमच्या वाटेत आडवं येणारं पाप कापरासारखं जळून खाक होईल. आम्ही जे वाघ मारलेत तेही पापी नव्हते. ते पापी असते तर आमच्यासमोर मरायलाही आले नसते.

**गौरी** : (मोहित होऊन उभी.) राजे आहात. खरंच. आपलं मन—

**आप्पाराव** : (बंदूक वर उचलून) हे आमचं मन...हा बाज्या कुटं गेला लेकाचा? ए बाजीऽ, पडदा उघड की. बाहेरचे लोक कुरकुरायला लागलेत. एऽऽ गप ऱ्हा! (पडद्याबाहेर जातो.)

[गौरीवर निळा मंद प्रकाश.]

**गौरी** : बाजीराव! प्रेम करतोयस तू माझ्यावर? का रे बाबा? जगातलं एक भयंकर दुःख तुझ्या रूपानं माझ्यासमोर उभं आहे. तुझं प्रेम खोटं म्हणत नाही मी बाजीराव, खोटं म्हणत नाही. पण मला नको आहे ते! कलावंत म्हणून श्रेष्ठ आहेस तू. तूच म्हणतोस ना? नाटकात नटाच्या पंचेंद्रियांचं एक दिव्य इंद्रधनुष्य व्हायला हवं. होतं, बाजीराव, तू नाटकात उतरलास की तुझंही तेच होतं. पण तेच नाटक पांघरून तू माझ्यावर प्रेम का करतोस? मला माहीत आहे, तुझं हे वेड सुटायचं नाही आणि मला तुझं प्रेम स्वीकारता येणार नाही. (क्षणकाल विचारमग्न.) या तुझ्या शोकनाट्यावर मला माझ्या हातांनीच पडदा टाकावा लागणार आहे. (डबी पदराखालून बाहेर काढते.) तुझ्यासकट तुझ्या प्रेमाला समाधी मिळेल. तुलाही धन्यताच वाटणार आहे हे कळलं तर!...मला माहीत आहे बाजीराव, तुझ्या आयुष्यावर माती लोटणं हे वाटतं तेवढं सोपं नव्हे ...आप्पारावांकडे फक्त मीच राहणार आहे. यापुढं नाटक करीन ते फक्त आप्पारावांना जिंकण्यासाठीच. पण त्याआधी या बाजीरावाच्या नाटकावर पडदा टाकायचाय मला...थ्रिल...माणूस मारण्यात थ्रिल आहे.

[निळा प्रकाश ओसरतो. बाजीराव प्रवेश करून गौरीच्या हातातली डबी पाहतो. तिकडे दुर्लक्ष करतो.]

**बाजीराव** : (जात असलेल्या गौरीला थांबवून) ओहो, कुठं निघालीस? आजचं तुझं काम साफ पडलं. एखाद्या प्लेगच्या उंदरासारखं पडलं! बाई ग, मेकप करून वर्षं कमी करता आली असती तर गुलाल पडताच सरणावरची प्रेतंही उठून बसली असती. सोळा वर्षांची दिसण्यासाठी या वेडाबाईनं रंगाचा एक हंडाच पिऊन टाकला.

[गौरी फणकाऱ्यात निघून जाते.]

**आप्पाराव** : बाजी! (आप्पाराव पडद्यातून येतो.)

**प्रेक्षक** : पडदा उघडा की. अहो, पडदा केव्हा उघडणार?

**आप्पाराव** : बाजी, पडदा उघडा बुवा आता. (प्रेक्षकांना) उघडेल रे उघडेल पडदा. दम धरा. बाजी, पडदा उघडा लौकर.

**बाजीराव** : पडदा उघडलेलाच आहे. हा दिसतोय तो कालपुरुषाच्या सावलीचा अंधार. किंवा मला वाटतं, पडदा उघडल्यावर रावसाहेब न्यायमूर्तींचं जे पिशाच्च न्याय मागण्यासाठी येणार आहे त्याची ही काळीनिळी सावली असावी!

**आप्पाराव** : ही वायफळ बडबड बंद कर! चल, तो पडदा उघड. नाही तर लोक आम्हांलाही नाटक्याच समजायचे.

**बाजीराव** : आपण न्यायासनावर बसा तर खरे! तुम्हांला आमच्या नाटकातले लोक प्रश्न विचारतील त्याची तुम्ही उत्तरं द्यायची. खुर्चीत जवळजवळ तुम्ही बसलेले नाही असं समजून उत्तरं द्यायची.

**आप्पाराव** : बाज्या, कंबरड्यात लाथ घालीन. तू कोण समजलास आम्हांला?

**बाजीराव** : आमचं कंबरडं. तुमची लाथ. वाकेन पण मोडणार नाही आप्पाराव. वेत आहे हा वेत. प्रेमासमवेत...म्हणजे नाटकाच्या... नाटकातल्या प्रेमाच्या समवेत—सामवेद झालाय आमचा.

**आप्पाराव** : (वैतागून) पडदा उघडा लेकांनो, पडदा उघडा...लोक...

[बाहेर गडबड सुरू.]

**आप्पाराव :** (पडद्याजवळ जाऊन) एऽ गप ऱ्हा! पडदा उघडेल—

[सख्या मिशी सावरीत येतो.]

**सख्या :** काय बाजीराव?

**बाजीराव :** लोकांची तयारी झाली का?

**सख्या :** ते एंट्री...एंट्री—(आप्पारावाकडे पाहत हलकेच डोळा घालून) घ्यायला घाबरताहेत. भासणं डोक्यातनं गेलीत साफ.

**बाजीराव :** अरे, मी त्यांना एवढं सांगितलं ते काय तर?

**आप्पाराव :** अरे, आम्ही म्हणजे तसे काही खात नाही त्या तुमच्या नाटक्यांना. हरामखोर. भिजलेल्या मेंढरागत उभी आहेत ती नटं. या म्हणावं लौकर लौकर...जा रे सख्या.

**बाजीराव :** मेंढरांना वाघाची भीती वाटतेय महाराजा.

[गौरी येते. चंद्रकळा नेसलेली आहे. हातांत दोन पेले. आप्पारावाकडे जाते. मागून संशय आलेली प्रभा येते. भेदरून दूर उभी. गौरी पेला विचारपूर्वक पुढे करते.]

**आप्पाराव :** (हाताने पेला दूर सारतो.) सख्या, पडदा लौकर उघड.

**बाजीराव :** आप्पाराव, हा रंगदेवतेचा प्रसाद आहे. घ्या तो. आप्पाराव, अंगणात वाघ, खिडकीत अत्तराचे दिवे, मनगटावर गजरा, शय्येवर पौर्णिमेचा चंद्र आणि हृदयात याचा जाळ म्हणजेच आपल्यासारख्यांचा रुबाब. हे काय हे, दूर काय सारताय? स्वतःच्या हातांनी स्वतःचं नशीब—

**आप्पाराव :** आमचं नशीब आमच्यासमोर उभं राहतं ते फक्त वाघाचं रूप घेऊन. या असल्या काचाकवड्या आम्ही उकिरड्यावर फेकून देत असतो. तो पेला या बाजीला दे!

**गौरी :** त्याचाही पेला आहे. (दुसरा पेला बाजीरावापुढे धरते.)

**बाजीराव :** (अत्यंत भक्तिभावाने पेला घेतो.) अखेर या एका पेल्यावर आमचं नाव होतं. (पेल्यात पाहत उभा. तोल सावरण्याचा अभिनय.)

आप्पाराव : सख्या, पडदा उघड!

[सख्या पुढे सरकतो.]

गौरी : सख्या, थांब!

[सख्या मिशी सावरीत मागे येतो.]

बाजीराव, बाजीराव, पिऊन टाक ते.

[बाजीराव तसाच उभा.]

आप्पाराव : सख्या, पडदा उघड म्हणतो ना!

प्रेक्षक : (बाहेरून) पडदा उघडा. पडदा उघडा. (गलका होतो.)

[आतले नट बाहेर येतात. गौरी सख्याला मागे ओढते. पण इतर माणसे पडदा उघडतातच. पडदा उघडताच गौरी मागे जाते. जिन्याच्या वरच्या पायरीवर उभी राहते. इतर पात्रेही वाट मिळेल तिकडे विंगांतून निघून जातात. सख्या दारापाशी उभा. प्रभा एका कोपऱ्यात. बाजीराव पेल्यात पाहत तटस्थ उभा. आप्पाराव मिशीच्या कल्ल्यांवरून मनगट पालथे फिरवतो. लोकांच्या टाळ्या.]

आप्पाराव : (गुरगुरतो.) टाळ्या कसल्या रे वाजवता? इथं काय तमाशा चाललाय का? एऽ बाज्या, पिऊन टाक ते सरबत.

बाजीराव : यातलं ते दूरस्थ नक्षत्र पाहत होतो. वा! वा! वा!

आप्पाराव : एखादी माशी पडली असेल त्यात. नक्षत्रं कसली मोजतोस? चल. न्यायाला सुरवात होऊ दे.

बाजीराव : (मान लववून) सख्या, इकडे ये.

[सख्या समोर येऊन उभा.]

बाजीराव : न्यायाधीश होणार होतास?—होय की नाही?

सख्या : होय. पण आयत्या वेळी हे आप्पाराव...

आप्पाराव : जादा वटवट नको.

सख्या : हां, हां. यापुढं काय करायचं? (मिशी सावरतो.)

बाजीराव : (मिश्यांकडे पाहत) हेच करायचं. आणि बेलीफ व्हायचं.

प्रत्येकाचं नाव पुकारायचं. आणि हे बघ, पहिला न्याय तू मागायचा.

**आप्पाराव** : बाज्या, हा चावटपणा पुरे कर आता!

**बाजीराव** : हा चावटपणा नव्हे. न्यायदानाला आपण चावटपणा म्हणता आहात, हे बरं नव्हे महाराज. सख्या, विचार, 'न्यायमूर्तीसाहेब, मी या नाटकात न्यायाधीश होणार होतो, पण अखेरीला बेलिफीच वाट्याला आली; याचा अर्थ काय?'

**सख्या** : हां, विचारतो. (पिंजऱ्यात जातो.) न्यायमूर्ती—मी बदलीफ होणार होतो...नाय बा. हे जमणार नाय. हे आपल्याला पाठ करायला लागतं. मी मगच विचारतो. तोपर्यंत बाकीच्यांना विचारू दे.

**बाजीराव** : बरं तर! जा तर प्रथम न्यायाधीशांच्या बायकोचं नाव पुकार! त्या अगोदर प्रॉम्प्टरचं नाव पुकार.

**सख्या** : प्रॉम्प्टरसाहेब—

[प्रॉम्प्टर भीत भीत पुढे येतो.]

**बाजीराव** : भिऊ नको!

**प्रॉम्प्टर** : आं?

**बाजीराव** : भिऊ नको! मुला, सावध राहा. यापुढचं नाटक तुझ्यावर अवलंबून आहे. मुला, सावध राहा! रात्र न्यायाची आहे! न्यायाधीश कोण होणार होतं? आणि आता कोण झालंय ...

[आप्पाराव खाकरतो.]

तू इथं या खुर्चीमागं उभा राहा. सख्याची भाषणं तू वाचून दाखव. सख्या, जानकीबाईचं नाव पुकार.

**सख्या** : जानकीबायऽऽ

**बाजीराव** : आणखीन एकदा.

**सख्या** : (मोठ्याने) आनखीन एकदा—

**बाजीराव** : सख्या!

**सख्या** : हां आपलं, जानकीबाय.

[जानकीबाई—न्यायमूर्तींची पत्नी—येते. आप्पारावासमोर जायला थोडीशी दचकते.]

**बाजीराव** : प्रॉम्प्टर, बी रेडी प्लीज!

**सख्या** : प्राम्प्टर बी...आपलं—आपलं रेडी—

**बाजीराव** : (पेला उचलतो.) मी यातलं नक्षत्र पाहत थोडा दूर उभा राहतो.

[पद्मासन घालून बसतो. समोर पेला.]

**प्रेक्षकातून** : हे नाटक आहे की चेष्टा?

**आप्पाराव** : एऽऽ, गप ऱ्हा. बोला जानकीबाई, काय म्हणणं आहे आपलं?

**प्रॉम्प्टर** : तसं नव्हे, तसं नव्हे.

**आप्पाराव** : ए, तू गप ऱ्हा ना!

**प्रॉम्प्टर** : पण...पण...

**आप्पाराव** : गप ऱ्हा म्हटलं ना! विचारा हो, काय म्हणणं आहे आपलं?

**प्रॉम्प्टर** : (तिच्याकडे पाहत सांगतो.) न्यायाधीशमहाराज, मी आज मुलूच्या जन्मापासून अशी तापल्या वाळवंटातल्या मासोळीसारखी तळमळतेय. मला न्याय हवाय.

[भेदरलेली जानकीबाई नुसते हो, हो म्हणते.]

**आप्पाराव** : हां, आम्ही देऊ शकतो. बोला—एऽऽ, हिला बोलू दे लेका. तू कशाला ती पोथी वाचतोयस?

**प्रॉम्प्टर** : हे नाटक आहे ना?

**आप्पाराव** : मग असलं म्हणून काय झालं? आम्ही नाटकसुद्धा करू शकतो!

**जानकीबाई** : मला न्याय द्या. न्यायाधीशमहाराज, मला न्याय द्या! पुरुष हे असे कसे? बरं इकडची स्वारी म्हणजे तशी काही सामान्यातली नव्हे. इकडून असं न्यायाधीश असायचं आणि दुसरी बाई ठेवायची, हे का?

[हे भाषण द्रुतगतीने म्हणते. आप्पाराव तिला दम देतो. मग हेच भाषण शांतपणे.]

आप्पाराव : हे का ?

प्रॉम्प्टर : तसं...(पटकन गप्प होतो.)

आप्पाराव : हे का ?

प्रेक्षक : आप्पाराव, उत्तर द्या !

आप्पाराव : हे असंच. हो, हे असंच. हेच उत्तर याला. पुरुष म्हणजे तो पुरुषासारखाच वागायला पायजेल. वाघानं कसं वाघासारखंच वागायला पायजेल. माकडानं माकडासारखं. बाई, तुझा नवरा न्यायाधीश होता; पण तो पुरुष होता. वा ! वा ! आपल्याला हे फार आवडलं. एकाच बाईबरोबर किती वर्षं संसार करणार ? बहाद्दर माणूस होता तो !

[प्रेक्षकांत टाळ्या. हशा. गडबड.]

आप्पाराव : (मंद मंद हसतो. पण लगेच तोल सांभाळून उठून प्रेक्षकांसमोर उभा राहतो.) टाळ्या बंद ! टाळ्या घ्यायला मी काही दीडदमडीचा नट नव्हे हा.

[तेवढ्यात प्रॉम्प्टर जानकीबाईकडे जातो.]

प्रॉम्प्टर : पुढं बोल. ए, एऽ, तुझं पुढचं भाषण—

जानकीबाई : पुढं काय बोलू कपाळ ?

प्रॉम्प्टर : कपाळ नव्हे !

आप्पाराव : एऽ, तिला पुढचं वाचून दाखव !

[प्रॉम्प्टरला दम देतो. तो पुन्हा पहिल्या ठिकाणी येतो.]

प्रॉम्प्टर : न्यायाधीशमहाराज, मी लुबाडले गेले हो. माझ्या सर्वस्वाची त्या कांतीबाईनं माती केली. माझ्या सुखावर निखारे ठेवले तिनं !

[जानकीबाई तसे म्हणते.]

आप्पाराव : बाई अखेर बाईसारखी वागली. मग त्यात काय चुकलं तिचं ? तू अपराधी आहेस. लग्नाची बायको आहेस तू त्या पुरुषाची. तू अशी कांगावा का करतेयस ? पतिव्रताधर्माचं हे वाटोळं करतेयस तू. यामुळंच सध्या पाऊस वेळेवर पडत नाही, पीकपाणी बिघडलंय, वादळं होताहेत.

लग्नाच्या बायकोनं कसं वागायला पायजेल—चूपचाप! तिची कुणी मान कापली तरी ती नवऱ्याच्या चरणावरच पडायला पाहिजेल. म्हणजे काय? आम्ही खरोखरच न्यायाधीश असतो तर तुला फासावर चढवलं असतं. आपल्या नवऱ्याविरुद्ध न्याय मागणं म्हणजे काय! पोरखेळ वाटला हा तुला? जा, तोंड काळं कर इथनं.

**प्रॉम्प्टर** : जाऊ शकत नाही ती.

**आप्पाराव** : का रे भामट्या, का जाऊ नको सांगतोस तिला? दुसरं पात्र. सख्या, पुकार—नाव पुकार—

**प्रॉम्प्टर** : पण पुढचं भाषण...

**आप्पाराव** : एऽ, जा तू.

[जानकीबाई जायला लागते.]

**प्रॉम्प्टर** : एऽऽ, जातेस कुठं? अहो बाजीराव—

**बाजीराव** : (पेला घेऊन उभा.) आलो. त्या नक्षत्रावरून हा पुन्हा भूमीवर आलो.

**प्रॉम्प्टर** : तिनं जायचं का?

**बाजीराव** : हो. ती जातेय याचाच अर्थ तिला न्याय मिळालेला आहे. किंवा न्याय मिळालेला नाही. जानकीबाई, जा तुम्ही.

[आप्पाराव चुळबुळायला लागतो. जानकीबाई निघून जाते.]

**बाजीराव** : सख्या, पुढचं नाव—

**सख्या** : प्राम्प्टरसाहेब...

**प्रॉम्प्टर** : सहस्रबुद्धेकाका.

**सख्या** : सहस्रबुद्धेऽऽकाऽऽकाऽ

**बाजीराव** : पुन्हा एकदा.

**सख्या** : सहस्रबुद्धेकाका—

[सहस्रबुद्धे येतात.]

**बाजीराव** : या, या. पुढं या. काका, पुढं या.

[सहस्रबुद्धे भीत भीत पुढे येतात.]

बाजीराव : आयुष्यात प्रत्येकालाच कधीतरी असं न्यायासनासमोर उभं राहावं लागतं. राहावं उभं आपण. मुंबईत आपण बसच्या क्यूत उभे राहतोच की नाही? या. अहो, आपले न्यायाधीशमहाराज आहेत ते. त्यांना काय घाबरायचं?

प्रॉम्प्टर : मी सहस्रबुद्धे. संस्कृतचा मास्तर—

सहस्रबुद्धे : मी...मी...(आवंढा गिळतात.)

आप्पाराव : बोला, लौकर बोला. हुंड्याबद्दल बोलायचं आहे तुम्हांला. आम्ही मघा नाटकात ऐकलंय.

बाजीराव : न्यायाधीशमहाराज आणि समस्त जनताजनार्दन, हे सहस्रबुद्धे-काका. यांना काहीतरी मागायचंय. तर हे मागतील. न्यायच मागतील असं नव्हे. याना प्रचंड पैसा हवा आहे.

सहस्रबुद्धे : (आप्पारावाकडे बोट दाखवून) हा सख्या खोटं बोलतोय. आम्ही आजवर बहुत पावसाळे पाहिले. आम्ही कधी असत्य भाषण केलेलं नाही. पण आम्हांस काही हा न्याय कळत नाही. प्रत्यक्ष न्याया-सनावर सख्यासारखा एक हलक्या दर्जाचा गडीमाणूस बसलेला आहे, आणि असत्यकथन तर त्यांनंच केलेलं आहे. तर या साक्षात असत्य बोलणाऱ्या सख्यासमोर आम्ही न्याय कसा मागावा?

आप्पाराव : (भडकून) हे काय बोलतोय? आम्ही हे एवढे धिप्पाड पुरुष इथं बसलेले तुला दिसत असताना हे काय बोलणं लावलंय तू? बाज्या, या तुझ्या अक्कलमंद नाटक्याला—

बाजीराव : ते आपलं भाषण बरोबर म्हणताहेत. खरं बोलताहेत ते. एक अक्षरही खोटं बोलत नाही आहेत. तंतोतंत, इकडचा शब्द तिकडे अथवा तिकडचा शब्द इकडे न होऊ देणं यालाच खरं बोलणं म्हणतात, न्यायाधीशमहाराज.

आप्पाराव : बाजी!

प्रेक्षक : हा न्यायासनाचा घोर अपमान आहे.

आप्पाराव : होऽऽ, अपमान आहे हा आमचा.

सहस्रबुद्धे : मी या क्षुल्लक दर्जाच्या दस्यूसमोर न्याय मागणं म्हणजे साक्षात मेरुपर्वतानं मुंगीसमोर लोटांगण घालण्यासारखं आहे.

आप्पाराव : (उठू पाहतो.) हे आम्ही—हे आम्ही—हे काय चाललं आहे? (बंदूक उचलून) या संस्कृतच्या मास्तरला इथल्या इथं एखाद्या ढेकणासारखा चिरडून टाकायला आम्हांला वेळ लागणार नाही. आमच्या गावात येऊन आमचा हा—

प्रेक्षक : आप्पाराव, काढा बार, होऊन जाऊ दे.

प्रॉम्प्टर : सख्या...(न्यायासनाकडे पाहत मोठ्याने ओरडत) मी सख्या नव्हे. मी न्यायाधीशम्हाराज आहे. तुम्ही खोटं बोलता आहात, खोटं बोलताहात...खोटंऽऽ

आप्पाराव : (गोंधळून) एऽ पोथीवाल्या, तुला गचांडी देऊन खालच्या हौद्यात फेकून देऊ आम्ही.

प्रॉम्प्टर : तसं नव्हे. मी सख्याची भाषणं—हो—सख्याची...

बाजीराव : तर सहस्रबुद्धे, न्यायासनासमोर नीट उभे राहा. बोला तुमचे शब्द. सत्याला मरण नाही. सत्य मरणाला भीत नाही. सत्य ही गोष्टच मुळी—

आप्पाराव : ही वटवट बंद! (उठू पाहतो.)

बाजीराव : न्यायासनावरून उठू नका! अजून जगातले अन्याय संपलेले नाहीत.

[आप्पाराव चुळबुळत बसतो. चेहरा बराच उतरलेला.]

सहस्रबुद्धे : साक्षात न्यायमूर्ती रावसाहेबांच्या खुर्चीत हा सख्या बसलेला असेपर्यंत—

बाजीराव : तुम्हांला न्याय मिळेल.

सहस्रबुद्धे : —असेपर्यंत न्याय मिळण्याची आशा नको.

**बाजीराव** : सहस्रबुद्धेकाका, तुम्ही न्याय मागा. विक्रमादित्याच्या जमिनीत गाडल्या गेलेल्या न्यायासनावर असाच एक ढोरांचा कान्हा बसलेला होता.

**आप्पाराव** : (कडाडून) खबरदार! (रागाने थरथरायला लागतो.)

[प्रेक्षकांतून टाळ्या.]

**आप्पाराव** : टाळ्या मारता होय रे—टाळ्या? आम्ही कुणाच्या गावात आहोत? याद राखा. सगळा गाव बेचिराख करून टाकू आम्ही. काय समजलास? याचा सूड उगवल्याशिवाय राहणार नाही आम्ही!

[स्टेजवर एकदम गडबड. प्रॉम्प्टर बोलतो. सहस्रबुद्धेही. आप्पाराव पण. गौरी कावरीबावरी होऊन पुढे येते.]

**बाजीराव** : इथं अगदी प्रत्येकाचा खांब होऊन गेलाय. एक पुरातन काळचं भव्य देवालय कोसळून आता फक्त हे खांब उभे आहेत.

[बाजीराव पेला तोंडाला लावतो. गौरी किंकाळी मारते.]

**गौरी** : ते पाहा. बाजीराव, तुझ्यामागं ते पाहा, रावसाहेबांचं पिशाच्च.

[आतील टेप सुरू होते.]

**पहिला आवाज** : न्यायाधीशमहाराज...

**दुसरा आवाज** : तुम्ही खून केलात माझा!

[टेप चालू असतानाच न्यायमूर्तींचे पिशाच्च प्रवेश करते.]

**पिशाच्च** : मी प्रत्यक्ष रावसाहेब. मला न्याय द्या!

**आप्पाराव** : (प्रॉम्प्टरला) ए पोथीवाल्या, काय लिहिलंय त्यात? वाचून दाखव त्या नाटकी न्यायमूर्तीला!

**प्रॉम्प्टर** : तुम्ही दोषी आहात. मी एक सामान्य चाकर या न्यायासानावर बसलोय असं समजू नका, रावसाहेब. मी खरं तेच सांगतोय. तुम्ही दोषी आहात.

**पिशाच्च** : मी दोषी कसा? मी मेल्यावर माझी माणसं माझ्याविरुद्ध बोलताहेत. मी दोषी कसा?

प्रॉम्प्टर : मेल्यावर प्रत्येकाला वाटत असतं की, जिवंत असणारं जर तेवढं अपराधी असतं; आपण मात्र हुतात्मे. असं नसतं रावसाहेब, तुम्ही मेल्यावर हे बोलताहात.

पिशाच्च : अरे, मी प्रत्येकावर प्रेम केलं होतं. ही सुळ्—दिसतेय मला ती. सुळ्—

सुलभा : बाबा !

पिशाच्च : सुलभा, मी दोषी आहे काय ग ? मी...मी खरंच दोषी आहे ?

[गौरी भेदरलेली आहे—बाजीरावाने विष प्राशन केलेले आहे म्हणून.]

सुलभा : नाही बाबा, पण...पण तुम्ही पुन्हा ते पिशाच्चाचं रूप नका दाखवू. मला भीती वाटते तुमची ! खरंच, तुम्ही जिवंत असताना किती चांगले दिसत होता ! तुम्ही मघा फार फार ठेंगणे दिसत होता मला. तुमचे हात रक्तानं माखले होते. (भेदरून स्वतःच्या हातांकडे पाहत) रक्तानं माखलेले—

प्रेक्षक : वा ! वा ! (टाळ्या.)

सुलभा : खरंच बाबा, तुमचा एक हात फार बारीक होऊन गेला होता. एखाद्या केसाइतका. दुसरा, दुसरा...पण दोन्ही रक्तानं...नको. ते रूप नका दाखवू पुन्हा.

[बाजीराव पाठमोरा उभा.]

पिशाच्च : म्हणजे तूही मला घाबरतेयस का ? मी कुणाच्या तोंडाकडे पाहू तर ? मला काहीच आगापिछा राहणार नाही. अग मुली, मी एकदा तुझा बाप होतो. प्रत्यक्ष बापावरच अन्याय करतेयस तू ?

प्रॉम्प्टर : तुम्ही शिक्षेस पात्र आहात. तुम्हांला पुढचा जन्म या वाड्यातच मिळेल.

पिशाच्च : या वाड्यात ? म्हणजे हरकत नाही. न्यायाधीशमहाराज, मी आभारी आहे आपला.

प्रॉम्प्टर : शिक्षा ऐकल्यानंतर आभार माना ! तुम्हांला या वाड्यातल्या ताटाखालचं मांजर व्हावं लागेल.

पिशाच्च : मांजर? मांजरसुद्धा होईन मी! सुलू, मला या वाड्यात अनेक जन्म घ्यावेसे वाटताहेत. मी आनंदानं मांजर होईन.

सुलभा : मांजर? त्या पिशाच्चाचं मांजर होणार? (शहारते.)

[पुन्हा टेप सुरू होते.]

दुसरा आवाज : तुम्ही खून केलात माझा.

[दोनेक मिनिटे ही टेप सुरूच. पिशाच्च आत जाते. गौरी प्रभाच्या मागे येऊन उभी राहते.]

आप्पाराव : हे नाटक बंद करा.

[आवाज बंद होतात.]

बाजीराव : आपण न्यायासनावरून उठू नका! मी तुम्हांला आता एक गोष्ट सांगतो.

सख्या : गोष्ट सांगाच बाजीराव.

आप्पाराव : सांग बाजी! आम्हांलाही कंटाळा आलाय. सांग.

[गोष्ट ऐकण्यासाठी आरामात बसतो.]

बाजीराव : (पुढील सर्व गोष्ट हरिदासी पद्धतीने.) एकदा काय झालं? ऐका बरं का! ऐकाऽऽऽ शंकर आणि पार्वती—बरं का महाराज!—शंकर आणि पार्वती बसली होती एकांतात. विश्वरहस्याबद्दल काही चाललं होतं. तोच एका गणानं पृथ्वीतलावरून आणलं चिताभस्म!

आप्पाराव : चिताभस्म? वा! वा! आपल्याला एकदम पसंत! आम्हांला कधीकाळी भक्ती करायचीच झाली तर आम्ही फक्त शंकराचीच भक्ती करू! पुढं सांग—

बाजीराव : गणानं चिताभस्म आणल्यावर काय? शंकराची स्वारी एकदम खूष! बरं का! चिताभस्माचे ते मुलायम पट्टे स्वारी अंगावर ओढणार इतक्यात पार्वतीनं प्रश्न केलाय! पार्वती म्हणाली—म्हणाली, "देवा! प्रश्न विचारायचाय मला!" पार्वतीनं प्रश्न विचारलेला आहे महाराज! होऽऽ, पार्वतीनं प्रश्न विचारलाय—काय? काय विचारला? ती म्हणाली,

"पार्वतीपते, हे भस्म कुणाचं!"

आप्पाराव : कुणाचं म्हणजे? माणसाचं! मूर्खासारखा प्रश्न आहे झालं!

बाजीराव : नव्हे! माणसाचं हे तर झालंच. पण ते भस्म स्त्रीचं की पुरुषाचं? बोला, गोपालकृष्ण महाराज की जय!

[प्रेक्षक साथ देतात.]

आप्पाराव : हो हो, आहे बुवा! मग पुढं काय झालं?

बाजीराव : पहिल्यांदा शंकरही घोटाळलेच. पण मग त्रिशूळ बर्फात खुपसून म्हणाले, "स्त्रीचं—हे भस्म स्त्रीचंच."

आप्पाराव : असेल बुवा!

बाजीराव : पार्वती गालांतल्या गालांत हसलेली आहे आणि म्हणाल्येय, "तुम्ही तर देवा अगदीच स्त्रीलंपट! भस्मही स्त्रीचं वाटतं का तुम्हांला? हे भस्म आहे पुरुषाचं!" शंकरांनी विचारलं, "कशावरून?" पार्वती म्हणाली, "स्त्रीचं तरी कशावरून?" पार्वती म्हणतेय, हे भस्म पुरुषाचं; शंकर म्हणताहेत, हे भस्म पुरुषाचं कालत्रयी असणं शक्य नाही. हे स्त्रीचंच. झालं. तुंबळ झगडा सुरू झाला. शंकराच्या बाजूनं अर्धे गण उभे राहिलेले आहेत. आणि पार्वतीच्या बाजूनं अर्धे. मधेच नंदी उठला. त्यानं आपली भलीमोठी शिंगं हलवून डोक्याला ताण दिलेला आहे. म्हणालाय, "देवाधिदेवा पार्वतीपते कैलासनाथा! युक्ती सुचलीय मला. सांगू का? एका पुरुषाला इथं आणायचं. सर्वांसमक्ष जाळायचं. त्याचं भस्म बाजूला काढून ठेवायचं. मग एका स्त्रीला इथं आणायचं. सर्वांसमक्ष जाळायचं. तिचंही भस्म काढून ठेवायचं. या भस्माशी ते ताडून पाहायचं. त्या भस्माशी हे ताडून पाहायचं." झालं. भोळे सांबसदाशिव म्हणाले, "मी स्वतःला जाळून घ्यायला तयार आहे." पार्वती म्हणाली, "मी स्वतःला जाळून घेते." तेवढ्यात आले नारद! अहो, त्यांना यावंच लागलं. नारायण! नारायण! ब्रह्मवीणेच्या तारांचा झंकार झुम्झुम् सुरू झाला. नारायण! नारायण! नारदांची मूर्ती शंकरपार्वतीसमोर नम्रपणे

हात जोडून उभी राहिली, तर शंकरांचं तोंड पूर्वेकडे, पार्वतीचं पश्चिमेकडे. गणांचंही तेच. नंदी बापडा एखाद्या गरीब गाईसारखा मध्ये उभा! नारदांनी विचारलं, "नंदी, काय हे प्रकरण तरी काय आहे?" नंदीनं साद्यंत वृत्तांत सांगितलेला आहे. नारदांचीही मती गुंग होऊन गेली. नारदमुनींचा हात सहजच ब्रह्मवीणेवरून फिरला आणि मग बोल उठले.

*हें नव्हे भस्म स्त्रीचें अथवा पुरुषाचेंहि नव्हेच*
*हें भस्म दोघांचेंहि, जळलीं तीं चितेंत एकाच.*

[गौरीकडे बोट दाखवतो.]

**आप्पाराव** : (मान झटकतो.) असली कसली ही गोष्ट? भलतंच काहीतरी. शंकराचं खरं! ते भस्म स्त्रीचंच आहे.

**बाजीराव** : असेलसुद्धा! आमच्या आजोबांनी जे काही आम्हांला सांगितलं, ते आम्ही तुम्हांला जसंच्या तसं सांगितलं.

[लोकांच्या टाळ्या. प्रभा पुढे व्हायला पाहते, गौरी तिला मागे खेचते.]

**बाजीराव** : (तोल जातो आहे असे त्याचे त्यालाच वाटते.) सख्या, आता वेळ थोडा राहिलाय. तुझा न्याय मागून घे.

**सख्या** : (न्यायासनासमोर जातो.) मी सख्या—मी न्याय मागतोय. मी नाटकातसुद्धा नोकरच कसा राहिलो? न्यायमूर्तींची एवढी जागा मला सांगून आली होती—तीसुद्धा कशी हिरावून घेतली गेली?

**आप्पाराव** : ए पोथीवाल्या, याला याचं भाषण सांग.

**प्रॉम्प्टर** : यात काही त्याबद्दल लिहिलेलं नाही.

**बाजीराव** : जगातल्या कुठल्याच पोथीत हे लिहिलेलं नसेल.

**आप्पाराव** : मग तुझं काय काम इथं! जा चालता हो.

[प्रॉम्प्टर जातो.]

**सख्या** : पोथीत नाही तर तुम्ही मला न्याय द्या.

**आप्पाराव** : (तुच्छतेने) नोकराला कसला आला न्याय!

सख्या : मग मी ही मिशी उतरून ठेवली बगा. (मिशी उतरून खुर्चीच्या पायाशी ठेवतो.) मला न्याय मिळेल त्या दिवशीच पुन्हा ही मिशी लावीन.

[आप्पाराव मिशी डाव्या हाताने झुरळासारखी उचलून बाजूला टाकतो. बाजीराव सख्याला मागे लोटून न्यायासनासमोर उभा—पिंजऱ्यात. अंगात भिनू लागलेल्या विषामुळे बाजीरावाचा पुढील सर्व बोलताना तोल सुटू लागतो. पण तो स्वतःवर ताबा ठेवण्याचा प्रयत्न करतो.]

बाजीराव : मी न्यायासनासमोर उभा आहे. मी एक शून्य बाजीराव! भिकाऱ्यांचा एक कःपदार्थ प्रतिनिधी! अनादिकालापासून भिकाऱ्यांना एक प्रश्न पडलेला आहे. भिकाऱ्यांच्या बापांना, त्यांच्याही बापांच्या बापांना, आजोबांच्या आजोबांना; त्यांनीसुद्धा आपापल्या न्यायी माणसासमोर हा ठेवला; पण आजतागायत हा प्रश्न आत्महत्येच्या दोरीसारखा लोंबकळत राहिलेला आहे. न्यायाधीशमहाराज! प्रश्न अत्यंत साधा आहे. न्यायाधीशमहाराज, आणि समस्त जनताजनार्दन! भिकारी विचारताहेत, "आम्ही भिकारी का झालोत?" दुसरा प्रश्न असा की, "आम्ही भिकारी आहोत हे कबूल. पण म्हणून आम्ही भिक्षाच का मागायची?" नंतर ते म्हणताहेत की, "आम्ही भिकारी ठरलोत हेही आम्हांला मान्य नाही. आम्हांला लोक भिकारी म्हणतात. आणि आम्हांला भिकारी म्हणता यावं म्हणून ते आम्हांला भिक्षा घालतात. हे वाईट आहे. न्यायासनानं याचा विचार करावा! न्याय द्यावा!"

आप्पाराव : (चुळबुळतो.) आम्हांला वाटतं—आम्हांला वाटतं—आम्ही—

बाजीराव : तुम्हांला काय वाटत असेल तेही मी सांगू शकतो. न्यायासनाला कदाचित वाटत असेल की न्याय मिळाला म्हणून काही भिकारी श्रीमंत होणार नाहीत. तर याचं उत्तर असं आहे की, न्याय मिळणं हे भिक्षा मिळण्याहून आम्हांला मोठेपणाचं वाटतं. भिकारी मागताहेत म्हणून काही न्यायाची भिक्षा होणार नाही. न्यायाधीशमहाराज, आपण भिकाऱ्यांच्या प्रश्नांचा विचार करा आणि उत्तर द्या.

[आप्पारावाची चुळबूळ सुरूच. काय बोलावे याच विचारात.]

**प्रेक्षक** : आप्पाराव, त्याला उत्तर द्या!

**आप्पाराव** : त्यात काय एवढं? (चुळबूळ सुरूच.) तो असा कोण लागून गेलाय. बाजी, त्यात काय एवढं...त्यात...(गोंधळतो.)

**बाजीराव** : न्यायासनाचा गोंधळ उडालेला आहे. न्यायाधीशमहाराज, आपला गोंधळ उडालेला नाही. आपण शांत चित्तानं विचार करून उत्तर द्या!

**आप्पाराव** : जसा काही तू मास्तरच लागून गेलास! म्हणे, शांत चित्तानं विचार करून उत्तर द्या! कसले हे भिकारी? कुठं आहेत ते? (अंगाची चाळवाचाळव करतो.)

**बाजीराव** : न्यायासनानं जरा चौफेर पाहावं! त्यांना प्रत्येक ठिकाणी भिकारी दिसतील. श्रीमंत भिकारी! सुखवस्तू भिकारी! गरीब भिकारी! काही होतकरू भिकारी! काही स्वार्थी भिकारी! काही अपचन झालेले भिकारी. काही भिकाऱ्यांना आपण भिकारी आहोत हे माहीतही नाही. भिकारी श्रीमंत एखादाच! हजारो, कोट्यावधी भिकारी या जगात आहेत. न्याया-सनानं याचा विचार करावा! त्यांना न्याय द्यावा!

**आप्पाराव** : आम्ही भिकारी पाहिलेलेच नाहीत! (चुळबूळ सुरूच.)

**बाजीराव** : भिकाऱ्यांच्या वतीनं आम्ही तुमचा सत्कार करणार आहोत, त्या वेळी आम्ही तुम्हांला एक भव्य आरसा भेट देणार आहोत. कदाचित तुम्हांला त्या वेळी एका श्रीमंत भिकाऱ्याचं दर्शन होईल.

**एक प्रेक्षक** : हा न्यायासनाचा घोर अपमान आहे.

**आप्पाराव** : बरोबर आहे! हा आमचा अपमान आहे बाज्या!

[भयंकर चुळबूळ करतो. बाजीरावाला अस्वस्थतेची जाणीव व्हायला लागते.]

**दिग्दर्शक** : (प्रेक्षकांतून) न्यायासनानं त्याला बाज्या म्हणू नये. तो भिका-ऱ्यांचा सन्मान्य प्रतिनिधी आहे.

**आप्पाराव :** गप व्हा रे नाटक्या! आम्ही कुणाला काहीही म्हणू! उलट्या खोबडीचा आणि वाकड्या नाकाचा हा माणूस—याला रस्त्यावरचं शेंबडं पोरसुद्धा बाज्याच म्हणेल!

**बाजीराव :** (तोल सावरीत) अनादिकालापासून रस्त्यावर ताटकळत उभ्या असलेल्या भिकाऱ्यांना न्याय देणं हे आपलं—न्यायासनाचं सर्वप्रथम कर्तव्य आहे.

**आप्पाराव :** (अंगाची चाळवाचाळव करीत) हा न्यायासनाचा अपमान आहे.

**बाजीराव :** न्यायाधीशमहाराज, आपल्या अपमानाहून भिकाऱ्यांचे प्रश्न अधिक मोलाचे आहेत!

**प्रेक्षक :** (रुमाल उडवीत) हा न्यायासनाचा अपमान आहे.

**आप्पाराव :** होऽऽ! हाही पुन्हा आमचा अपमान आहे.

**बाजीराव :** प्रत्यक्ष न्यायासनानं भिकारी होऊ नये! कायदा गाढव आहे हा शेरा माथी मारून घेतलेल्या न्यायासनानं या वेळी तरी डोळे उघडे ठेवून न्याय द्यावा.

**आप्पाराव :** (चुळबूळ) अपमान...

**बाजीराव :** इथं एका प्रचंड दुःखाचं विडंबन होत आहे! (तोल सावरण्याचा प्रयत्न करीत) आप्पा...राव—नव्हे—नव्हे...न्यायाधीशमहाराज...(तोल जात आहे.) पडाव निघालं आहे...श्रीमंतांच्या घरी...(गौरीकडे बोट दाखवून) नक्षत्राच्या रोखानं...श्रीमंतांच्या घरचं आमंत्रण ते!

*सोड दोरी सोड दोरी श्रीहरी रे श्रीहरी*
*फाटका मी बांधतों रे गांठ त्याने अंतरीं*
*अंतरंगा रंग द्यावा...*

(लटपटतो.) दोरी सोडायचीच आहे ना? दोरी सोडायचीच आहे ना?
[तोल सावरण्याचा प्रयत्न करतो. गौरी मागच्या दरवाज्याकडून पाहते आहे. प्रभा अत्यंत व्याकूळ.]

लौकर, लौकर दोरी सोडा! फासावर चढण्यासाठी आम्ही काही आमच्या पदरची दोरी वापरणार नाही!...दोन्ही मंडपांचा खर्च तुम्हीच करायचा... सासरच्या आणि माहेरच्या! (लटपटतो.) भिकाऱ्यांना न्याय द्या!...

*त्या तिथे पलिकडे तिकडे । माझिया शवाऽऽचीं लाकडें...*

आप्पाराव : एऽऽ, काय बरळतोयस खुळ्यासारखं! नाटकी कुठला! आटोप लौकर! या खुर्चीत ढेकणं झालीत. खुर्ची तरी कसली ठेवली आहे या भामट्यांनी! (खुर्चीवरून उठतो.)

[बाजीराव हसू लागतो. उड्या मारतो. आडवातिडवा पळतो. लोक प्रचंड हसतात.]

आप्पाराव : काय झालंय तुला?

बाजीराव : (एक वेडीवाकडी उडी घेऊन) न्यायाधीश...न्या...य...दे... द्या...मला न्याय...न्याया ऽऽ मज न्याया ऽऽ न्यावाऽ (आलाप) न्याया ऽऽ

[लोक हसतात.]

दिग्दर्शक : (प्रेक्षकांतून) बाजीराव!

[लोक हसतात.]

बाजीराव : (खाली पडतो. उठण्याचा प्रयत्न करतो. कोसळतो. पुन्हा उठतो. काठीचा आधार घेतो.)...काठे ऽ ऽ उभी राहा ऽ ऽ...काठी गऽ ऽ

[लोक प्रचंड हसतात. दिग्दर्शक प्रेक्षकांतून हाक मारतो, "बाजीराव—"]

मज न्यायाऽऽ न्यायाऽ न्यायाऽ ऽ न्यायाऽ ऽ ऽ न्या ऽ ऽ याऽ ऽ

[लकेर अर्धवट राहते. बाजीराव स्टेजवर कोसळतो. लोक भयंकर हसतात.]

प्रेक्षक : शाब्बास बाजीराव! अस्सल आहे!

आप्पाराव : बाजी! बाजी!

[आप्पाराव त्याच्या कमरेला विळखा घालून उभा करण्याचा प्रयत्न करतो. गौरी तोंडावर हात घेऊन उभी. मैत्रेयाच्या भूमिकेतल्या

गोट्यावरील शेंडी दिसताच लोक ओक्साबोक्शी हसायला लागतात. आप्पाराव गोटयाचा टोप शेंडीसकट खेचून काढतो. बाजीरावाला खुर्चीत बसवतो. दिग्दर्शक करुणपणे हाक मारतो, "बाजीराव!"]

अवदा मुलीचा आवाज : काय पण बंडल मरण आहे!

पाराव : एक नंबरचा महाठक आहे!

[दिग्दर्शक येतो.]

दर्शक : थांबा! थांबा! कुणी डॉक्टर आहेत का प्रेक्षकांत?

प्पाराव : एऽ हणमंत्या, ये बाबा!

[डॉक्टर येतात. यथासांग तपासतात. मोठ्याने हसतात.]

ड क्टर : (बाजीरावाच्या कानाशी वाकून) कॉंग्रॅच्युलेशन्स! ग्रेट ॲक्टर! नाड्या, छातीचे ठोकेही बंद करून ठेवलेत! वा! वा! आपल्याला आवडलं आपलं काम! हे फक्त जाणणारेच करू शकतील. स्वतःचे प्राण कोंडून ठेवणं ही एक फार मोठी तपश्चर्या आहे. ग्रेट ॲक्टर आहे! वा!

दि दर्शक : खरंच मेला आहे हो माझा मित्र!

डॉ क्टर : (हसून) ओ यस! पुढची तयारी करायला हरकत नाही.

[हसत हसत जातात. लोक रुमाल उडवतात. टाळ्या मारतात.]

दि दर्शक : लोक हो! मी आपल्याला एक विनंती करतोय—हा खरोखरच मेलेला आहे! केवळ लोकांनी हसावं म्हणून हा इतके थिल्लर चाळे धीही करायचा नाही—माझी खात्री आहे...

प्पाराव : गप ऱ्हा रे नाटक्या! काय तुझी वटवट उगीच. मेलेला असला तरी आमच्या वाड्यावर आपोआप उभा राहील.

दिग्दर्शक : सख्या, पडदा पाड, पडदा पाड.

[सख्या पडदा पाडतो. हळूहळू गडबड बंद होते. आपण स्वतः उचलायला लागतो बाजीरावाला.]

आप्पाराव : थांब! हात लावायचा नाही त्याला! आणि लावायचाच असेल तर खांद्यावरून तुला एकट्याला वाड्यावर घेऊन यावं लागेल त्याला.

दिग्दर्शक : (डोळ्यांना रुमाल) अखेर मी एवढं करू शकलो तरी

[विषण्णपणे इतर नटांच्या मदतीने खुर्चीसकट त्याला उचलून नेतो.]

आप्पाराव : वाड्यावर न्या आमच्या. (हसतो.) आपल्याला पाहिजे माणूस. (वळून गौरीला) येणार आहेस ना? चल. बाहेर बग्गी आहे माझी!

गौरी : (विषण्ण) येणार आहे ना! पण हे तोंडावरचे रंग धुऊन येते.

आप्पाराव : आमच्या वाड्यावर साफ होतील ते.

गौरी : इथले रंग आजपासून इथंच कायमचे ठेवून येणार आहे मी!

आप्पाराव : आम्ही बाहेर बग्गीत बसतो. पाचच मिनिटं वाट पाहू आम्ही. हवी तर ये. (जातो)

[गौरी व्हायोलिनकेस घेऊन जडपणे उभी राहते.]

नाटककार : (हसतच प्रवेश करतो) च्यायला! म्हणजे हे कठीणच अ... या आमच्या दिग्दर्शकालाही वेड लागलंय. दिग्दर्शक होऊन प... मरणाचं इतकं हुबेहूब नाटक—(पोट धरधरून हसतो.)

[गौरी जडपणे व्हायोलिनकेस घेऊन निघून जाते.]

नाटककार : (पुन्हा मोठमोठ्याने हसतो.) सगळेच मूर्ख.

[मोठमोठ्याने हसत निघून जातो. स्टेजवर काही वेळ शांतता. प्रभा भीतभीत उभी. लांबून लोकांचा गलबला ऐकायला येतो. प्रभा उभीच. दंडवते पडद्याच्या एका कोपऱ्यातून हलकेच येतात. प्रभाला खूण करून निघायला सांगतात. प्रभा फक्त पाहते.]

दंडवते : म्हणजे यायचं नसेल तर तसंही चालेल. म्हणजे...

[प्रभा काहीच बोलत नाही. दंडवते निघून जातात. प्रकाश हळूहळू प्रभाच्या भेदरलेल्या मुद्रेवर साकळतो...प्रभा तशीच भेदरलेल्या डोळ्यांनी पाहत भारल्यासारखी उभी. रंगभूमी रिकामी.]

म. ग्रं.
क्र. ...